संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

२६ मे १९७३

# माणूस

वार्षिक वर्गणी पंचवीस रुपये
परदेशची वर्गणी पासष्ट रुपये

वर्ष : बारा — अंक : एकावन्न-बावन्न

## सप्रेम नमस्कार...

३० एप्रिल, ७३

□ माणूसचे अंक नुकतेच येऊ लागले आहेत. एकंदर मजकूर वाचून बरे वाटले. आतापर्यंत 'इंडिया न्यूज' मधली सारवासारवी किंवा इथल्या वृत्तपत्रातल्या एकांगी बातम्या वाचाव्या लागत.

गेली शंभर वर्षे पाश्चात्य जीवना-विषयी आपल्याकडे नाही नाही त्या थापा सांगितल्या जात आहेत. त्यांना आळा घालून सत्य सांगण्याचे धैर्य आता कोणी तरी दाखवले पाहिजे. हे कार्य करण्याची आपली इच्छा आहे काय ? दोनचार उदाहरणे देतो.

मी शाळेत असताना (१९५४–५५ चे सुमारास) पुण्याच्या वाणिज्य कॉलेजचे प्राचार्य टी. एम्. जोशी ह्यांचा पंचवार्षिक योजना, करव्यवस्था ह्या विषयावर 'किर्लोस्कर 'मध्ये लेख आला होता. जोशीसाहेब सांगत होते 'अहो इंग्लंडमध्ये ४०% प्राप्तीकर आहे. आपल्याकडे आपण कुठे एवढे कर देतो ! पंचवार्षिक योजना करायची म्हणजे करवाढ होणारच. महागाई वाढणारच.'

मी आता सात वर्षांचे हिशोब ठेवले आहेत. त्यात मी सडाफटिंग होतो तेव्हा-पासून मी लग्न केले, आम्हाला मुलगी झाली ह्या सगळ्या अवस्था आल्या. मजूर सरकारची ५ वर्षे राजवट झाली. हुजूर सरकारची २ वर्षे राजवट झाली. दोघांनीही Price Income Control करण्याचा प्रयत्न केला. परंतु Income Tax, National Health Insurance, Graduatal Insurance ह्या टाळता न येणाऱ्या करांसाठी एकूण १५% ते २०% एवढेच पैसे सरकारला द्यावे लागले. परंतु त्यामुळे वैद्यकीय मदत

माणूस साप्ताहिक : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकांत व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

फुकट असते. मुलांचे शिक्षण फुकट होते. वृद्धापकाळी सरकार पेन्शन देते. प्राप्तिकराचा दर (Rate of Taxation) ४०% आहे; पण ह्याचा अर्थ लोक पगाराच्या ४०% सरकारला देतात असा नव्हे. Tauable Income वर ४०% कर आहे.

'अहो दुसरं महायुद्ध संपलं तेव्हा जर्मनी अगदी बेचिराख झाला होता. देशाची फाळणी झाली होती. पण जर्मन माणूस रावणारा जबर. फोनिक्स पक्षाप्रमाणे त्यांचे पुनरुज्जीवन झाले. जपानचे तसेच. बघा ते कुठे आणि आपण कुठं?' अशी खुळचट तुलना आपण अनेकदा ऐकतो. खरी परिस्थिती कोणी सांगतच नाही.

महायुद्ध संपल्यावर दोस्त राष्ट्रांनी ठरवलं आठ कोटी लोकसंख्या असलेल्या जर्मनीने दरवर्षी ५८ लाख टनापेक्षा जास्त लोखंड निर्माण करू नये. (They could physically produce more but they must not) हीच तुलना हिंदुस्थानला लावायची तर १९४७ साली आपले लोखंडाचे वार्षिक उत्पादन २३० लाख टन असायला हवे होते. प्रत्यक्षात होते १० लाख टन. अरेच्या! मग जर्मनी बेचिराख झाला होता म्हणजे काय?

महायुद्धानंतर जपानच्या संरक्षणाची जबाबदारी अमेरिकेने स्वीकारली. मेली २५ वर्षे जपान बजेटच्या १% सुद्धा सैन्यावर खर्च करत नाही. हिंदुस्थानचे सरकार ५५–६०% बजेट सैन्यावर खर्च करते. मग आर्थिक विकासासाठी आपण पैसा आणणार कुठून?

अशा परिस्थितीत आपण व जर्मनीची किंवा जपानची एकाच मापाने तुलना करणे चूक. आपली २५ वर्षांत व्हावी तेवढी प्रगती झाली नाही हे खरे पण 'हम भी कुछ कम नही' असा आत्मविश्वास हवा.

असो, अशा अनेक गोष्टी सांगाव्याशा वाटतात. तुम्ही त्याला वाव द्याल काय? I see no evil, I hear no evil, I spea no evil अशी प्रतिज्ञा केलेल्या आपल्या इथल्या वार्ताहारांकडून काहीही सांगितले जाणार नाही.

—व्ही. एस. गोडबोले, बेडफोर्ड,
(इंग्लंड)

◻ श्री. दि. के बेडेकर यांना भेटण्यासाठी दि. १०–४–७३ रोजी मी त्यांचे घरी 'साहित्य सहवास' वांद्रे येथे मुद्दाम गेलो होतो. त्याच्या आजाराबाबत मला कल्पना होती. आणि म्हणूनच त्यांचेशी आजाराबाबत काही बोलावयाचे नाही असे मी मनी योजिले होते.

आधीच बेडेकरांची कुडी लहान आणि त्यातून या आजारपणामुळे ते फारच कृश झालेले दिसत होते; पण कष्टी मात्र मुळीच नव्हते. अगदी नेहमीप्रमाणे त्यांनी हसत स्वागत केले व ते खुलेपणाने बोलू लागले. मलाच अवघडल्यासारखे होत होते म्हणून मीच त्यांना म्हणालो, 'तुम्ही फार बोलू व बसूही नका. पडल्या पडल्या थोड

बोललात तरी हरकत नाही.' त्यावर ते अगदी सहजतेने म्हणाले, 'थकलो तर बोलायचा थांबेन. आत्ता मला मुळीच थकवा वाटत नाही. तुम्ही काळजी करू नका. अहो, नवी नवी औषधे निघाल्याने माणसाला मारू शकणारे असे फार थोडे रोग आता शिल्लक आहेत. त्यातलाच एक – कॅन्सर माझ्या वाट्याला आला आहे इतकेच. अर्थात माझा कॅन्सर प्राथमिक अवस्थेत असल्याने आणखी ३।४ वर्षेतरी मला मिळतीलसे वाटते. तशी ती मिळाली तर हाती असलेली काही अर्धवट कामे पूर्ण करता येतील. तो मिळाली नाहीत तर इतर कुणी ती कामे पुरी करतील इतकेच.

हे ऐकून माझ्या मनात-चर्र झालं; पण बेडेकर मात्र अगदी स्थितप्रज्ञ होते. अगदी मामुली विषयावर बोलत असल्याप्रमाणे त्यांनी मला पुढे विचारलं, 'राजाभाऊ, माणूस मेल्यापासून किती वेळाच्या आत डोळे 'आय् बँक'कडे पोचवावे लागतात? माझ्या बंधूंच्या वेळी ते जमले नाही. तसे पुन्हा होऊ नये.'

'पुण्याला फॉईल्स क्लबमध्ये विजय मर्चंट यांचे या विषयावर व्याख्यान झाले होते त्यावेळी तीन तासात डोळे बँकेकडे पोचले पाहिजेत असे त्यांनी सांगितल्याचे आठवते. पण आपण माहितगारांकडे याबाबत चौकशी करू' मी उत्तर दिले.

ते पुढे म्हणाले, 'डोळे आय बँकेला व शरीर वैद्यक विद्यार्थ्यांना अशी माझी योजना आहे. त्या बिचाऱ्यांना शवविच्छेदनाला न पोसलेली कुठलीतरी बेवारशी शरीरे मिळतात. त्यापेक्षा आपले मिळालेलं चांगलं; नाही का?'

यानंतर आणखी ५।१० मिनिटे मी केवळ शरीरानेच तेथे होतो. पुढच्या बोलण्यातील अर्थबोध मी सामावू शकत नव्हतो इतके, माझे मन बधीर झाले होते! स्वतःच्या मरणाकडे इतके डोळसपणे पहाणे मला जमेल का? हा प्रश्न मला सतत सतावत आहे.

राजाभाऊ माटे, पुणे

१० मे, ७३.

□ मध्यंतरी विश्व हिंदू परिषदेच्या दादर शिवाजी पार्क येथे झालेल्या अधिवेशनाचे जे वृत्त आपल्या अंकात प्रसिद्ध झाले ते बरेचसे विकृत होते. त्यासंबंधीच्या पुढील काही खुलाशांना प्रसिद्धी द्यावी अशी विनंती आहे

विश्व हिंदू परिषदेशी माझा काहीही संबंध नाही. मी फक्त समोरच्या समारंभाला काहीवेळ सहज म्हणून उपस्थित राहिलो होतो. माझे कायम वास्तव्य पालघर जवळच्या खेडेगावात आहे. जेथे परिषदेचे कार्य नाही.

१: महाराष्ट्रातील भीषण दुष्काळाचे परिषदेला सोयरसुतक नव्हते अशी टीका आपल्या लेखात आली आहे. अधिवेशनाच्या खर्चासाठी जमविलेल्या रकमेपैकी २५ टक्के म्हणजे २५ हजार रुपये दुष्काळ विमोचन समितीला देत असल्याचे समारोपाच्या सुरुवाती■

लाच जाहीर केले गेले.

२ : स्वामी सत्यमित्रानंदजी व चिन्मयानंदजी यांच्यावरील टीकाही अनुदार आहे. चिन्मयानंदांनी आपल्या भाषणात असे आवर्जून सांगितले की, प्रत्येक आधुनिक हिंदू घरात एक पवित्र जागा असावी. आणि जमलेल्या आधुनिक महिलांनी लगेच याची सुरुवात करावी म्हणजे काही दिवसांनी त्यांच्या मुलांवरसुद्धा त्याचे संस्कार झाल्याशिवाय रहाणार नाहीत. आज आधुनिक हिंदू घरात देवघर नष्ट झाले आहे. पण पाश्चिमात्यांनी आपल्या घरात पवित्र कोपरा Secred corner कायम ठेवला आहे.

३ : स्वा. सत्यमित्रानंदांनी सांगितले की, हिंदू समाज टिकला तर चातुर्वण्य अस्पृश्यता वगैरेचा वाद ! आज परकीय धर्मांच्या आक्रमणापुढे हिंदुस्थानात हिंदु टिकतो किंवा नाही याचीच शंका आहे. आपण स्वत: वनवासी विभागात गेलो असता त्यांच्या विनंतीवरून त्यांच्यामध्ये बसून सहभोजन केल्याचेही त्यांनी सांगितले. दोन दिवसांनी मी महालक्ष्मी येथे जत्रेसाठी गेलो असता आदल्या दिवशी स्वामीजी तळासरी येथे विश्वहिंदू परिषदेतर्फे चालविल्या जाणाऱ्या आदिवासी विद्यार्थी वसतिगृहाला भेट देण्यासाठी येऊन गेले होते, सुमारे दोन हजार आदिवासींचा मेळावा भरला होता व स्वामींनी त्या ठिकाणी आदिवासींसमवेत भोजन केल्याचे ऐकले.

४ : आपल्या लेखामध्ये सदाजीवीतलाल चन्दुलाल,कामदार यांचे विषयीसुद्धा अनुदार उल्लेख आहेत. गेल्याच आठवड्यात मी तळासरीजवळ सूत्रकार या गावी महाराष्ट्र गोपालन संघातर्फे चालू झालेला प्रकल्प बघण्यासाठी गेलो होतो. सुमारे ६०० एकर जागा सदर प्रकल्पासाठी मिळविली गेली असून तेथे कार्य चालू आहे. पुढील तीन वर्षांत येथे सुमारे ५०० जातीवंत गाई असतील. तसेच सुमारे ३०० एकर जागा लागवडीखाली आणली जाईल. यासाठी ५० आदिवासी व्यवस्थापकीय कामावर व सुमारे २०० आदिवासी मजूर म्हणून कायम असतील. या सर्वांना लागणाऱ्या धान्य,भाजीपाला,दूध व इतर वस्तूंसाठी संस्थेतर्फे दुकान चालविले जाईल. या ठिकाणी विकल्या जाणाऱ्या बहुतेक गोष्टी तेथेच निर्माण केल्या जातील व वाजवी भावाने विकल्या जातील. सर्वश्री कामदार व सदाजीवीतलाल यांनी या कामासाठी स्वत:चे तर हजारो रुपये दिले आहेतच; पण दुसरे शेकडो दाते हजारोंनी रुपये देणारे ते नित्यश: मिळवीत आहेत.

आपणाला एक विनंती की आपण स्वत: आपल्या सहकाऱ्यांसह तळासरीच्या दोन्ही कामांना आदिवासी वसतिगृह, तळासरी व महाराष्ट्र गोपालन संघ, सूत्रकार भेटी द्याव्या व नंतर त्यावर समग्र लेख लिहावा. ईस्राईल जनतेच्या जीद्दीचे आपल्याला येथे दर्शन घडेल अशी माझी खात्री आहे. कळावे.

—वि. य. बागूल, के. माहीम

[ पहा : माणूस १७ जानेवारी १९७०. विषय–विश्व हिंदु परिषदेचे तळासरी केंद्र. लेखक–श्री. ग. मा. पृष्ठे ६, ७, ८ ]

११ मे, ७३

■ दिनांक ५ मे च्या अंकातील श्री. अशोक राजवाडे यांचे 'कविसंमेलन' परीक्षण वाचले. कार्यक्रमाला हजर नसल्यामुळे त्याविषयी मतप्रदर्शन करू शकत नाही. पण या परीक्षणाच्या निमित्ताने श्री. राजवाडे यांनी व्यक्त केलेली काही मते मात्र थोडीशी विचित्र वाटली. उदाहरणार्थ 'ज्या कवितेत धग नाही ती जिवंत असू शकत नाही म्हणून आजची तरुण पिढी अशी कविता फार सिरीयसली घेत नाही.' 'केवळ रस्त्यावर आल्यावर मगच आपल्याला समाजाबद्दल काही समंजसपणे लिहिता येईल.' 'व्यक्ती आणि समाज यांच्यातले गहन नाते मान्य करणारी आणि स्पष्ट करणारी अशी कविताच श्रेष्ठ' नाहीपेक्षा 'चंद्र, सूर्य, वारे, तो आणि ती यांची गॅलरीतून केलेली कविता बोअर करते' हे समजल्यानंतर वाटले की मागच्या पिढ्यांचे अज्ञान किती सुखद होते!

केशवसुतांच्या 'तुतारी' एवढीच त्यांची 'सतारीचे बोल' मनाच्या तारा झंकारीत होती. गोविंदाग्रजांच्या 'राजहंस माझा निजला'ने उडालेल्या झोपेने तारवटलेल्या डोळ्यांवर 'गुलाबी कोडे' 'पहिले चुंबन' स्वप्नाळू धुंदी चढवीत होती. माधव ज्युलिअनच्या 'गोकलखां लढनेवाला'ने मिशीवर गेलेला हात त्यांचीच 'पिरोजा' काळजावर खेचीत होती. बालकवींची 'फुलराणी' वेड लावीत होती. निर्झराबरोबर मन नर्मदेतल्या गोट्याप्रमाणे घरंगळत जात होते. व्यवहारातल्या दुःखांच्या आचीने मनाला पडलेले ओरखडे, कंगोरे घासून पुसून जात होते. आनंदी आनंद मनात भरून ब्रह्मानंदी टाळी लागत होती.

आणि आता कवितेचीच नव्हे तर साऱ्या साहित्याचीच नवी व्याख्या ऐकू येते. केवळ श्री. राजवाडेच नव्हेत, तर आजचे अनेक तरुण, राजकारणी पुढारी नव साहित्यिक सारेच जुन्या साहित्यावर, जुन्या मूल्यांवर आवेशाने तुटून पडताहेत. समाजवादाचा किंवा दुसऱ्या कुठल्यातरी 'इझमचा' मानदंड लावून त्याचे, पुरोगामी, प्रतिगामी, दलित, नागर, ग्रामीण असे तुकडे पाडू पाहाताहेत. चंद्र, चांदण्या, प्रेम, निसर्ग, इतिहास, संस्कृती हे सारे प्रतिगामी विषय झाले आहेत. जुने साहित्य हे मृत समजले जाऊ लागले आहे. समाजवादाच्या परिभाषेत न बसणारे श्रीमंती चोचले अशी व्याख्या होऊ पाहात आहे. पण एका काळी हेच चोचले पुरविण्याकरता, दोन चार रुपयांचं एखादे कवितेचे अथवा कथेचे चोपडे घेण्याकरिता कोणी पोटाला चिमटा घेऊन आणा, दोन आणे साठवित होते. त्यांना भुकेची आग जाणवत होती. पण ती रोजचीच होती, सरावाची होती. त्यांना पाहिजे होते नेहमीहून काहीतरी वेगळे हळूवार फुंकर घालणारे. आजच्या भाषेत तो पलायनवाद आहे. पण मग केवळ दारिद्र्य, अस्पृश्यता एवढीच काय ती चिरंतन सत्य आहेत की काय? अर्थात समाजातील या उणीवा दूर करू नयेत

असे नव्हे. पण त्यासाठी इतर अनेक मार्ग आहेतकी. सर्व रोगांवरती एकच औषध ही भाषा का? कुठल्याही इझमसाठी साहित्य देखील राबवले गेले पाहिजे हा अट्टाहास कशासाठी?

ल रा, सावबा, मुंबई

## 'जातीयवादाची विषवल्ली

□ कालचा 'माणूस'चा अंक वाचला. परभणीच्या कृषी विद्यापीठाबाबतचा मजकूर वाचला व त्यातील स्पष्टवक्तेपणा कौतुकास्पद वाटला. ब्राह्मणद्वेष हा मराठ्यांच्या हाडामासात भिनला आहे ही वस्तुस्थिती आहे. उलट ब्राह्मण समाज सारा अन्याय बदलत्या परिस्थितीप्रमाणे सहन करीत आहे. याशिवाय ब्राह्मणातील फार पूर्वीचे सोवळ आणि शिवाशिवीच्या कल्पना लुप्त झाल्या आहेत. हा सुद्धा त्यांच्या बदलत्या परिस्थितीचा एक दाखला म्हणता येईल.

आमच्या मराठा समाजातील पुढाऱ्यांनी अडाणी बहुजन समाजाच्या अज्ञानाचा फायदा घेऊन आपले प्राबल्य निर्माण करण्याचा पद्धतशीर प्रयत्न गेल्या दोन तपात सतत चालवला आहे. एस. टी., साखर कारखाने, शिवाजी विद्यापीठ (कालच्या लेखावरून परभणीचे विद्यापीठ), बहुतेक पंचायत समित्या, जिल्हा परिषदा, विविध सरकारी कार्यालये यातून १९४८ नंतरची परिस्थिती तपासली तर जातीयवादी मराठ्यांच्या या विषवल्लीची वाढ कशी होत गेली हे स्पष्ट कळेल.

आम्ही छत्रपती शिवबांचे नाव सारखे घेतो. छत्रपती शिवबाजवळ हा मराठा, हा ब्राह्मण, हा अमका, हा तमका असा भेद असल्याचा ऐतिहासिक दाखला कोठेच नाही. त्यांच्या अष्टप्रधान मंडळांत आणि महत्वाच्या जागेवर ब्राह्मण वर्गातील माणसे होती. क्षत्रियांनी लढावे आणि ब्राह्मणांनी आपल्या बुद्धिमत्तेचा लाभ शासकांना द्यावा हाच त्यामागे हेतू होता.

एकीकडे सर्वांना समान संधीची घोषणा करायची आणि प्रत्यक्षात केवळ मराठ्यांची आणि मराठ्यांशी हातमिळवणी करणाऱ्याची जेथे तेथे वर्णी लावायची याचा अर्थ स्पष्ट नाही काय?

दुसऱ्यांना जातीयवादी म्हणत म्हणत आपले घोडे पुढे पुढे दामटणारा आमचा मराठा समाजच खरा जातीयवादी आहे. केंद्र सरकार इकडे लक्ष का देत नाही?

संतराम सावत, पन्हाळा
कोल्हापूर.

# राज्यकर्त्यांनी निर्मिलेला भस्मासूर

## वि. शं. पारगावकर

'मानवत येथील चार खून' आणि 'कृषी विद्यापीठ परभणी' ही श्री. निळू दामले यांची गेल्या अंकातील दोन वार्तापत्रे वाचली, आणि मन सुन्न झाले. मानवत येथे चार निरपराध जीवांची हत्या घडते, तिला सहा महिने होऊन जातात, आणखीही तीन खून होणार असल्याच्या बातम्या फैलावलेल्या आहेत आणि सर्वांत आश्चर्याची गोष्ट म्हणजे या घटनेची स्थानिक पोलिस खात्याकडून काहीच दखल घेतलेली दिसत नाही. कारण खुनी तर पोलिसांच्या कोठडीत नाहीच 'उलट संशयितांना अटक' वगैरे सारखाही काही प्रकार तेथे अजून दिसत नाही. कालच्या पुणे येथील दंगलीत पाच इसम मृत्युमुखी पडले. त्यांच्या मोबदल्यात गेल्या दोन दिवसात ७७० लोकांना अटक झालेली आहे! या दोन्हीही परिसरावर एकाच सरकारचा अंमल आहे हे अशा वेळी सांगून सुद्धा कोणाला खरे वाटेल काय?

कोणा एका म्हातारीच्या स्वप्नात म्हणे गुप्तधन आले आणि त्याने सांगितले की 'तुझ्या मुला-सुनेचा बळी दे किंवा इतर ७ लोकांचे बळी दे म्हणजे मी तुला प्राप्त होईन!' म्हातारी आपल्या मुलाचा व सुनेचा बळी देणे कसे शक्य आहे? शेवटी या धनप्राप्तीसाठी तिघांचाचा कट सुरू झाला आणि मानवतसारख्या गावी अत्यंत शांतपणे सात बळी घेण्याचे कार्य सुरू झाले. त्यातले चार [illegible] मिळविले गेले. आणखी तीन, आमच्या सरकारच्या आणि त्याच सरकारचे हस्तक असलेल्या पोलिस खात्याच्या कृपेने, सहजच घेतले जातील याविषयी मुळीच शंका बाळगण्याचे कारण नाही!

दिवसा ढवळ्या खून होतात. आणखीही खून होणार आहेत अशी वदंता ऐकू येते आणि तीनुसार खून होत जातातही. तरी पोलिसखाते आपले स्वस्थ. सरकार देखील चूपचाप. ही काय लोकशाही आहे? गेली पंचवीस वर्षे लोकशाहीच्या नावाखाली या सरकारने धुमाकूळ घातलेलाच फक्त दिसत आहे. आम्ही अमूक योजना राबविली आणि तमुक बाबतीत अशी प्रगती केली

या गोष्टी फक्त आकडे तोंडावर फेकून सिद्ध करण्याचा केविलवाणा प्रयत्न सरकार सतत करून राहिले आहे.

या राज्यकर्त्यांना देशात लोकशाही हवी होती ती केवळ जनतेचे हित त्यांना अभिप्रेत होते म्हणून नव्हे, तर स्वतःचे राज्य निर्माण करता यावे, नवी संस्थाने उभारता यावीत म्हणून हवे होते, असे आज पंचवीस वर्षानंतर नाइलाजाने म्हणावे लागत आहे. आजची जी आहे ती लोकशाही नसून नेतेशाही आणि विकृत हुकूमशाहीचे एक चमत्कारिक मिश्रण आहे.

खेड्यापासून ते मुंबईपर्यंत आणि मुंबईपासून ते दिल्लीपर्यंत जे नेतृत्व कार्यवाहीत आहे, त्यात फक्त दोन टक्के लोक कर्तबगार व सचोटीचे आहेत. ८०% चा भरणा गुंडांचा, स्वार्थीचा, होयबांचा आणि रांगड्या लोकांचा भरलेला आहे. आणि ही परिस्थिती केवळ जनतेच्या अज्ञानाचा गैरफायदा घेऊन निर्माण केली गेली आहे.

आजच्या विसाव्या—विज्ञानाच्या, ज्ञानाच्या, तंत्रज्ञानाच्या शतकात या देशाचे भवितव्य अक्षरशत्रू, अज्ञानी, स्वार्थी, गुंड आणि एका विशिष्ट जातीच्याच लोकांच्या हातात राहावे आणि या लोकांनी फक्त स्वतःची उखळे पांढरी होईपर्यंत गरीब जनतेला लुटीत रहावे हीच का महात्मा गांधींची सुराज्याची आणि स्वराज्याची स्वातंत्र्याची कल्पना होती? टिळक आणि सुभाषचंद्र बोस असल्याच सुराज्याची स्वप्ने पाहात मेले? विनोबांनी आत्मयज्ञ पेटविला आहे आणि त्यात शेकडो लहानमोठे कार्यकर्ते निस्वार्थ बुद्धीने आपल्या आहुती टाकीत आहेत ते याच सुराज्यासाठी का?

ज्यावेळी देशातला बुद्धिमान वर्ग निराश होतो, कर्तबगार लोकांच्या संधी लुबाडल्या जातात, वशिलेबाजीने मूर्तिमंत अज्ञानच अधिकाराच्या खुर्चीवर आरूढ होतं, जातीय वाद निर्मूलनाच्या नावाखाली विखारी जातीवादाच्या वाढीसाठी खतपाणी घातले जाते तेव्हा देशाचे भवितव्य निश्चित धोक्यात आल्याशिवाय राहात नाही.

विरोधी पक्ष या सरकारच्या नावाने गेली पंचवीस वर्षे खडे फोडीत आहे. ती पक्षीय राजकारणाची हाकाटी म्हणून घटकाभर सोडून देऊ. पण खरी परिस्थिती अशी आहे की या देशातली सामान्य जनताच आता हैराण झालेली आहे. तिची प्रगतीची, भरभराटीची आणि उन्नतीची आशा मावळली आहे. स्वराज्य किंवा अधिकारपद हातात नसताही जनतेच्या सेवेसाठी जीवन वेचणारे नेते आता इतिहास जमा झालेले आहेत. आता जनतेला अक्षरशः नागवणारे नागवे नेतृत्व या देशात थैमान घालीत आहे.

विद्यापीठातून, न्यायसंस्थांतून देखील आता गुंडगिरीला सुरुवात झालेली आहे. एकीकडे जातीय वादाचे निर्मूलन करण्याचा देखावा निर्माण करून अलिगड विद्यापीठ बंद केले जाते आणि दुसरीकडे परभणीच्या कृषी विद्यापीठात उच्च आणि पहिल्या दर्जाची पदवी असणाऱ्या,

पण आपणाला नको असणाऱ्या जातीतला म्हणून त्याला नोकरीपासून दूर ठेवले जाते. आणि विशिष्ट जातीच्या नालायक लोकांचा भरणा तेथे केला जातो; आणि विशेष म्हणजे त्याबद्दल कोणालाही कसलीही खंत वाटत नाही. अगदी देशाचे नाईक श्री. वसंतराव नाईक यांनाही या गोष्टींचा खेद होत नाही. म्हणजे नाईक हे महाराष्ट्रातले सर्वोच्च नेतृत्व. त्याची ही स्थिती. मग खेड्यापाड्याच्या आणि तालुक्या जिल्ह्याच्या नेतृत्वाला तर या पाठीमागचे गांभीर्य ओळखण्याची किंवा तसे ते जाणवण्याची देखील अक्कल नसणाऱ्यांची परिस्थिती काय ?

ज्या देशात जातीय राजकारण खेळून नेतृत्व टिकवण्याची परंपरा सुरू असते त्या देशाला उज्वल भविष्यकाळ केव्हाच प्राप्त होणार नाही याची या आजच्या राजकारणी आणि तथाकथित जनतेच्या नेत्यांनी मनाशी खूणगाठ बांधून ठेवावी.

आज बहुसंख्य गरीब जनता ही हलाखीत कसे तरी दिवस काढीत आहे ती जनता बहुजन समाजातलीच आहे. जिचे नेतृत्व करण्याचा टेंभा हे आजचे नेते मिरवितात त्या जनतेचं कोणतं हित करून यांनी पुण्य पदरी बांधलं आहे ? वरचेवर नवे बागाईतदार, नवे उसमळेवाले, नवीनवी को-ऑपरेटिव्ह संस्थाने, नवेनवे लक्ष भोजन घालू इच्छिणारे अन्नदाते, नवेनवे करबुडवे मंत्री निर्माण होत जातील. आणि बहुसंख्य गरीब जनतेच्या हातात नरोटी येईल. हे दिवस फार दूर नाहीत. आणि असे झाल्याशिवाय क्रांती होणार नाही. आणि क्रांती झाल्याशिवाय हे अडमुठे सरकार बदलणार नाही. ही गोष्ट विरोधीपक्षाच्या हातात नाही तर फक्त जनतेच्याच हातात आहे. अर्थात् या देशातील जनता ही गुरू नानक यांची, संत तुलसी आणि संत तुकारामाची अनुयायी असल्यामुळे फार सोशिक आहे, बरोचशी दैववादी आहे आणि तितकीच सत्शील आहे. परंतु परिस्थितीचे चटके या गुणांनाही भाजून काढल्याशिवाय राहाणार नाहीत. शेवटी राज्यकर्त्यांनीच निर्माण केलेला हा भस्मासूर केव्हा तरी जनतेच्याच रूपाने सरकारच्या डोक्यावर हात ठेवल्याशिवाय राहणार नाही.

● ● ●

# ‘बंद’ निमित्ताने–

१५ मे मुंबई बंद !

२५ मे पुन्हा मुंबई बंद !

डाव्या कामगार चळवळीत हे सवते सुभे का ?

आजारी गिरण्यांप्रमाणे कामगार चळवळीलाही
काही जुनाट आजार चिकटला आहे का ?

या आजारातून बाहेर येण्याचा उपाय कोणता ?

कामगार चळवळीची उद्दिष्टे कोणती असावीत ?

क्रांतीची जबाबदारी हा वर्ग पेलू शकतो का ?

–अनेक प्रश्न, अनेक शंका.
यावरची उत्तरेही अनेकानेक.

यापैकी काही येथे एकत्रित केली आहेत–
२५ मे मुंबई बंद निमित्ताने.

या मुलाखती ‘ मागोवा ’ मासिकाच्या
मे दिन विशेषांकात प्रसिद्ध झालेल्या असून
‘मागोवा’च्या सौजन्याने त्या येथे पुनर्मुद्रित केलेल्या
आहेत.

या स्वतंत्र संपादकीय योजकतेबद्दल
मागोवा मित्रमंडळाचे मनःपूर्वक अभिनंदन.

–संपादक

# मुलाखती

: १ :

## एका कामगाराच्या चष्म्यातून
# मुंबईतील ट्रेड युनियन साहेब

फ्रेडरिक डिसूझा

'सीमेन्स इंडिया लि.' जर्मनीच्या सहकार्याने स्थापन करण्यात आलेली भारतातील एक मोठी कंपनी आहे. मुंबईमध्ये तिचे ३ कारखाने व कचेऱ्या आहेत. मुख्य उत्पादन विजेच्या साधनांचे आहे. मुंबईच्या शाखेत एकंदर ५००० कामगार व कर्मचारी आहेत. वरळीच्या शाखेत जेथे मी कामगार म्हणून आहे तेथे सुमारे १५०० कामगार आहेत

पहिल्यांदा मी ट्रेड युनियन चळवळीविषयी माझी मते मांडणार आहे. वाचकांनी कृपया एका सामान्य कामगारांची ही मते आहेत–युनियनच्या पुढाऱ्याची नव्हेत–हे ध्यानात घ्यावे. जेव्हा एखादा वर्ग–जाणीव असलेला कामगार आजूबाजूची परिस्थिती जाणण्याचा प्रयत्न करतो तेव्हा त्याला ट्रेड युनियन चळवळीत काही विशेष क्रांतिकारकत्व सामावलेले आहे असे भासत नाही. ट्रेड युनियनचे पुढारी–कामगारवर्गाचे तथाकथित नेते–यांनी चालवलेली ट्रेड युनियन चळवळ पाहून सामान्य कामगारास अशी शंका येते की अंधाऱ्या खोलीत मुळातच नसलेली वस्तु शोधण्याचा ते प्रयत्न करीत आहेत.

### वर्ग जाणीवेचा अभाव

खरे म्हणजे कामगार थोडेफार हबकून गेले आहेत. आपण काय करतो आहोत, का करतो आहोत हेही त्यांना कळेनासे झाले आहे. कामगार वर्गाची भूमिका काय आहे ? तिचे अंतिम साध्य काय आहे ह्याचा त्यांना गंधही नाही आणि त्याहून वाईट, भयानक गोष्ट म्हणजे कित्येक जणांना अजूनही असे वाटते की, आपला मालक हाच खरा अन्नदाता आहे. भांडवलशाही म्हणजे काय ? सत्ताधीश वर्ग कसा आहे ? समाजवाद म्हणजे काय ? समाजवाद भांडवलशाहीहून वेगळा कसा, ह्याची

त्यांना किंचितही कल्पना नाही. ह्या निष्काळजीपणामुळेच ते संधिसाधू, बुद्धिभेद करणाऱ्या, 'गरिबी हटाव' 'समाजवाद' वगैरे घोषणांना बळी पडतात.

मुंबई या भारतातील एका प्रमुख पुढारलेल्या शहरात आपण काय पाहतो ? तर येथील कामगारवर्ग अजूनही जात–धर्म, धार्मिक श्रद्धा ह्या गोतावळ्यातून बाहेर निघाला नाही. ह्या गोष्टीवरून त्यांच्यात आपापसात झगडेही होत आहेत, त्यांची एकी दुभंगली गेली आहे. कामगारवर्गाची ही भयंकर हानी आहे. अशा भावनांना चिथावणी देण्याचे कार्य शिवसेना व जनसंघासारख्या हुकूमशाही व जातीयवादी संघटना करीत आहेत. असे करून कामगारवर्गांची चळवळ निष्प्रभ करायची व आजूबाजूच्या परिस्थितीने पिडलेल्या, निराश झालेल्या, लोकांच्या प्रक्षोभाचा उपयोग करून त्यांच्यातच आपआपसात झगडे लावून द्यायचे हेच त्यांना हवे असते. कामगार चळवळ जो एका जागी साचून राहिली आहे व वरवरच्या आर्थिक लढ्यात गुरफटून गेली आहे त्याचे प्रमुख कारण लोकांवरील हुकूमशाही (फॅसिस्ट) प्रवृत्तीचा पगडा होय.

मध्यमवर्गीय वातावरणातून आलेल्या व ट्रेड युनियन चळवळीत असलेल्या कामगारांवर राजकीय झगड्यापेक्षा आर्थिक झगड्याचा प्रभाव पडल्याचे आपणाला आढळेल. आर्थिक लाभाकडे असे कामगार तुलनेने अधिक लक्ष देतात. कामगारवर्गाच्या राजकीय इप्सिताबद्दल त्यांना विशेष वाटत नाही. शहरातील खालच्या थरातून आलेले व ग्रामीण भागातील कामगार यांना थोडेफार स्थैर्य लाभले आहे. हे स्वतःला फारच नशिबवान समजतात. म्हणून आर्थिक झगड्याविषयीही काही करावयास ते काकू करतात !

बरेचसे 'डावे नेते' असे म्हणतात की कामगार ट्रेड युनियनच्या नेत्यांकडे बोनस, पगार वाढ इत्यादी आर्थिक मागण्या घेऊन येतात. पण त्यांनी राजकीय लढ्याविषयी दिलेला आदेश पाळीत नाहीत. सहाजिकच त्यांना असे वाटते की कामगार वर्गातील क्रांतिकारत्व आता समाप्त झाले आहे ! डाव्या नेत्यांच्या ह्या आरोपात काय तथ्य आहे ? वरवर पहाता तो खरा आहे असे वाटते. कारण आपण बघतो की त्यांच्याविषयीच्या दुःखवेदना व कारखान्यातील समस्या यांच्याशी निगडित असलेल्या सभांमध्ये कामगार विशेष जागरूकतेने भाग घेत नाहीत. पण आपण एक म्हण विसरता कामा नये, ती म्हणजे बऱ्याच वेळा 'दिसते तसे नसते.' कामगारवर्गाविषयी खरी गोष्ट कळण्यास आजूबाजूच्या परिस्थितीचा वस्तुनिष्ठ दृष्टिकोनातून अभ्यास केला पाहिजे.

## ऐतिहासिक कारणे

ट्रेड युनियनची चळवळ मृतप्राय होण्यास कोणती वस्तुनिष्ठ परिस्थिती कारणीभूत झाली ? ह्या ऱ्हासास कोण जबाबदार आहे ? कामगार वर्गाची

चळवळ जागृत, क्रांतिकारक राहण्यासाठी काय परिस्थिती असावी लागते? अनेक गोष्टी ह्या ऱ्हासास जबाबदार आहेत. चळवळीच्या ऐतिहासिक विकासवाढीतूनच ही कारणे दाखविता येतात.

सध्याच्या कामगार वर्गावर भांडवलशाहीच्या राजकीय कल्पना व इच्छांचा पगडा बसला आहे. त्याचे झगडे केवळ आर्थिक प्रश्नांशी निगडित असतात. १९२५ च्या काळात कम्युनिस्ट पार्टीतील तरूण कार्यकर्त्यांनी कामगारांना राजकीय शिक्षण देऊन त्यांना राजकीय लढ्यात सहभागी करून घेण्याचे कार्य केले. परंतु १९४२ नंतर त्यांच्यात (पार्टीच्या कार्यकर्त्यांत) माझ्या मते अजूनही १९२५ नंतर अशा प्रकारचे कार्य करण्याचा प्रयत्न कोठेही झाला नाही. सर्व झगडे हेतुपूर्वक अथवा अजाणता आर्थिक मागण्यापुरते मर्यादित राखले जातात. आर्थिक लढ्यातून राजकीय जाणीव किती तयार होते ह्याचा अनुभव काय दर्शवितो? आर्थिक लढ्यामधून मालक व कामगार व सरकार ह्यांचे संबंध कळतात. पण त्यामुळे भांडवलशाही जुलूम व पिळवणुकीवर कशी आधारलेली आहे? तिचे उच्चाटन का व कसे झाले पाहिजे? समाजवादी समाज कसा निर्माण करायचा? कामगार वर्गाचे शासन म्हणजे काय? इत्यादी बद्दल काही उलगडा होत नाही. मालक कामगार संबंध, आर्थिक लढे ह्यापेक्षा वेगळ्याप्रकारे ही जाणीव कामगार वर्गात निर्माण केली पाहिजे.

१९४२ नंतर ब्रिटीशांच्या मदतीने राज्यकर्त्या कॉंग्रेस पक्षाने अनेक कायदे करून कामगारवर्गाच्या शक्तीचे खच्चीकरण करण्याचा प्रयत्न केला. प्रत्येक गोष्टीत ब्रिटीश सरकार वारंवार हस्तक्षेप करू लागले, कामगारांच्या मनात कोर्टकायदा ह्याविषयी भीती निर्माण होऊ लागली व कामगार वर्गाची चळवळ साहजिकच कोर्टकचेऱ्यात रुतून बसू लागली. स्वतःचे मत, स्वतःच्या गरजा, स्वतःच्या मागण्या स्वतःच ठरवायचा त्यांचा हक्क कमी झाला. सर्वात वाईट गोष्ट म्हणजे 'डावे' म्हणविणाऱ्या नेत्यांनी सुद्धा ह्या गुंतावळ्यातून बाहेर पडायचा प्रयत्न केला नाही. ते स्वतःच त्या भांडवलदारांनी केलेल्या जाळ्यात फसून अडकून बसले. बरेचसे 'डावे नेते' कायदेपंडीत (वकिलीच्या क्षेत्रातील) होते व आहेत. ह्यावरून वर मांडण्यात आलेल्या ऐतिहासिक घडामोडींविषयीच्या सिद्धांताला पुष्टी मिळते.

## ट्रेड युनियन्सचे 'साहेबीकरण'

अशा प्रकारे त्या सापळ्यात सापडल्यानंतर व्यवस्थापनात कामगारांचा प्रत्यक्ष सहभाग, संप, घेराव, सभा, निदर्शने, कामगारांच्या मागण्या इत्यादींना ओहोटी लागली. आधुनिक प्रतिगाम्यांच्या, क्रांतिविरोधी कारवायांमुळे तरुण उत्साही कामगारवर्ग ट्रेड युनियनच्या चळवळीकडे आकर्षित झाला नाही. काही मोठ्या ट्रेड युनियनच्या पुढाऱ्यांच्या पकडीत इतर लहानसहान

अनेक ट्रेड युनियन एकत्र येऊ लागल्या. साहजिकच अशा ट्रेड युनियनच्या नेत्यांचा युनियन संघटनांवरील प्रभाव खूपच वाढला. कामगार चळवळीतील 'कोर्टबाजी' व वर उल्लेखलेली गोष्ट ह्यामुळे बऱ्याच ठिकाणी ट्रेड युनियनचे पुढारी व प्रत्यक्ष कामगार ह्यांच्यात दुरावा निर्माण झाला. ट्रेड युनियनची चळवळ अशी गाळात रुतून जाऊ लागली की ट्रेड युनियनचे काम हा एक 'बिन भांडवली व्यवसाय' बनला आहे !

अनेक ट्रेड युनियनचे नेतृत्व एका युनियनच्या नेत्याच्या हाती असणे, कायद्यांशी, नियमांशी संबंधित बाबींवर कायदेपंडितांचे वर्चस्व असणे (उदा. कोर्टात सर्व केसेस लढविण्याचे काही वकील नेत्यांची मक्तेदारी निर्माण होणे), ह्यामुळे अधिकारशाही व बऱ्याच प्रमाणात नोकरशाहीची वाढ झाली. युनियनचे नेते कामगारांशी अधिकाऱ्यांसारखे वागतात. (ह्याला सध्याचे तथाकथित कम्युनिस्ट पुढारीही अपवाद नाहीत.) थोडक्यात म्हणजे युनियनच्या पुढाऱ्यांच्या मर्जीनुसार कामगारांना वागावे लागते. एखादा सामान्य कामगार असे म्हणतो– 'आम्हाला दोन 'साहेब' आहेत. एक कारखान्याचा मॅनेजर व दुसरा युनियनचा पुढारी ! युनियन निर्माण व्हायच्या आधी पहिल्याचे पाय पुसावे लागत होते तर आता दोघांचेही पुसावे लागतात.'

'डावे' नोकरशहा कामगार–वर्गांच्या क्रांतिकरतेबद्दल कितीही टेंभा मिरवीत असले तरी प्रत्यक्षात नोकरशाही ही कामगार–वर्गावरील त्यांच्या संपलेल्या श्रद्धेचे प्रतिक आहे. प्रत्यक्ष कार्यातून त्यांनी हे स्पष्ट केले आहे. व्यवस्थापनाच्या नेतृत्वात एखादा कामगार वर येऊ लागला तर ते भांबावून जातात. अशा कामगाराला ते 'अतिउत्साही' म्हणून हिणवतात. आम्ही हे पूर्णपणे जाणून आहोत की क्रांती ही एका वा सर्व कारखान्यातच होणार नाही आहे, अथवा ती एका दिवसातही पूर्ण होणार नाही. असे असूनही ते एखाद्या जबाबदार प्रामाणिक कामगारास वाव देत नाहीत. अशा उत्साही कामगारांच्या कामामुळे–प्रभावामुळे–आपले आसन डळमळीत होईल असे त्यांना वाटते. त्यामुळे चळवळीच्या शेवटी लढ्याचा मार्ग सोडून मालकांशी वाटाघाटी, तडजोड करणे ते पसंत करतात. ह्याची परिणती हमखासपणे लाचलुचपतीत होते आणि खरोखरही ती होत आहे. युनियनमधील सर्वात वाईट गोष्ट ही आहे की, प्रत्यक्ष कामगार, कामगारांनी निवडून दिलेले कार्यकर्ते व बाहेरील युनियनचे पुढारी ह्यांच्यातील संबंध फारच वरवरचे असतात. ट्रेड युनियनमधील नोकरशाही वातावरणात त्यांच्यातील खरे सख्य नाहीसे होते.

## अंतर्गत लोकशाहीचा अभाव

आता आपण बहुतेक कारखान्यात निवडणुका कशा पद्धतीने घेतल्या जातात हे पाहू. सर्व साधारणपणे युनि-

पृष्ठ ४३ वर

# आ ले पा क

■ इंदिरा गांधींनी एका व्याख्यानात सांगितले : माझे आजोबा मी गेल्या जन्मी बकरी असावी, असे म्हणत

मुंबईतील खाटिकांची दाद मागण्यासाठी खा. (म्हणजे खासदार; खाटिक नव्हे.) राजा कुळकर्णींनी कशी बरोब्बर त्या गेल्या जन्मीच्या बकरीकडे धाव घेतली !

■ मॅजेस्टिक प्रकाशनातर्फे 'मराठी साहित्य आणि स्त्री लेखिका' या विषयावर झालेल्या साहित्यिक गप्पात पद्मा गोळे म्हणाल्या : आजही स्त्री लेखिकांकडे पुरुष वेगळ्या आणि विचित्र दृष्टीने पाहतात.

मराठीतील स्त्री लेखिकांकडे पुरुष पाहातात हेही कमी नाही, असे काहीजणांना वाटते.

■ उपरिनिर्दिष्ट साहित्यिक गप्पातील 'मराठी साहित्यातील स्त्री' या विषयावरील चर्चेत माधव मनोहर म्हणाले : स्त्रियांना आपली बलस्थाने कोणती हे अजून उमजलेलं दिसत नाही.

म्हणून तर त्यांना अबला म्हणतात. याला एक ठळक आणि भारदस्त अपवाद म्हणजे देवयानी चौ' बळ !'

■ जॉर्ज फर्नांडिस एका मुलाखतीत म्हणाले : इंदिरा गांधी दुटप्पी म्हणून अधिक धोकेबाज आहेत

जॉर्ज फर्नांडिस किती तटस्थपणे विचार करतात; कारण आम्हाला आपले वाटते की इंदिरा गांधी यशस्वी म्हणून अधिक धोकेबाज आहेत.

■ शंकर रंगनाथन या तज्ञाने असा इशारा दिला आहे की सध्या ज्या वेगाने जंगलांची तोड होत आहे त्या वेगानेच ती होत राहिली तर चालू शतकाचे अखेरीस भारत हे एक मानवनिर्मित सहारा वाळवंट होईल.

तसे खरोखरच झाले तर आम्ही उंटावरून शेळया हाकू !

■ व्यावसायिक संचातील 'अवध्य' या नाटकाच्या महाराष्ट्र टाईम्समधील परिक्षणात म्हटले आहे : झरोक्यातून दिसणारी संभोगसूचक दृश्ये फसवी आणि अळणी वाटली.

अहो ती दृश्ये संभोगसूचक आहेत ना ? ती खरीखुरी आणि मिट्ठास वाटली असती म्हणजे तिकडूनसुद्धा या परीक्षणवाल्यांनी टाहो फोडलाच असता.

■ याच परीक्षणात एके ठिकाणी म्हटले आहे : नीलिमा पोवळे हिचे (त्या दृश्यातील) काम मात्र अगदी शाळकरी वाटले.

हे कॉम्लिमेंट आहे असेच मराठी

मासिके-साप्ताहिके बारकाईने वाचणाऱ्या माझ्यासारख्या वाचकांना वाटेल.

■ 'हिरवळीवर' या सोबतमधील सदरात क्रीडानंद लिहितात : आता या महिलांनी क्रिकेट पाहता पाहता चक्क विकेटवरच पदार्पण केले आहे. या महिलाही आता चक्क क्रिकेट खेळायला लागल्या आहेत.

महिलांच्या क्रिकेटमध्ये अंपायरची लुडबुड नसेल अशी आमची समजूत आहे.

■ 'माणूस'मध्ये गेले ८१९ महिने चालू असलेले 'आलेपाक' हे सदर आता थांबवावे म्हणतो; कारण पाचक पदार्थांच्याही अतिसेवनाने अजीर्ण होऊ शकते हा आहारशास्त्रीय सिद्धांत तुम्हाला तसाच मलाही ठाऊक आहे. ●

## लंडन वाचनालय

लंडन वाचनालय ही ब्रिटनमधील एक आदरणीय वास्तू आहे. लंडनमध्ये उभे असलेले हे वाचनालय १३० वर्षांचे आहे. लंडन वाचनालयाचे नाव काढले की ब्रिटिश अभ्यासकाचे मन कौतुकादराने भरून येते. हे वाचनालय खासगी आहे. जगातील हे सर्वात मोठे खासगी वाचनालय. सभासद आहेत सुमारे पाच हजार; प्रत्येक सभासद वर्षाला सुमारे एक हजार रुपये वर्गणी भरतो. या या वर्गणीवर एका वेळी त्याला १५ पुस्तके घेता येतात. वाचनालयात साडेसात लाखावर पुस्तके आहेत. काही पुस्तके १६ व्या शतकातील आहेत. या अवाढव्य संग्रहातील कोणतेही पुस्तक सहज सापडेल अशी व्यवस्था वाचना-


# आणि ड्रॅगन जागा झाला

लेखक : अरुण साधू

किंमत . चवदा रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे

लयात केली आहे.

या वाचनालयाची आर्थिक स्थिती बिकट झाली असल्याची वार्ता मागे आली होती. पाठोपाठ साहाय्यकर्त्या प्रयत्नांचीही हकीगत बाहेर येत आहे. वाचनालयासाठी अर्थसाहाय्य उभे करावे म्हणून एक समिती स्थापन झाली असून समितीने २० लाख रुपयांचा निधी उभारण्याचा संकल्प केला आहे. समितीला तिच्या कार्यात यश लाभो, अशीच इच्छा कोणीही करील.

थॅकरे, चार्ल्स डिकन्स, टेनिसन, व्हर्जिनिया वुल्फ, विन्स्टन चर्चिल, टी. एस्. इलियट अशा थोर लेखकांनी लंडन वाचनालयाचे साहाय्य वेळोवेळी घेतले आहे. या पूर्वपुण्याईमुळे लंडन वाचनालयाला प्राप्त संकटातून तरून जाणे शक्य होईल असे वाटते. ●

## नरकनाथ निक्सन

लेखन स्वातंत्र्य म्हणजे काय? म्हणजे राज्यकर्त्यांना (प्रसंगी विनाकारण) शिव्या देण्याचा अनिर्बंध अधिकार. लोकशाही राज्यव्यवस्थेत असा अधिकार लेखकांना असतो म्हणे. साम्यवादी आणि एकतंत्री राज्यपद्धतीत मात्र या अधिकाराला तिलांजली देऊनच लेखनलीला करावी लागते.

मि. हॅरॉल्ड विल्सन ब्रिटनचे पंतप्रधान असताना बी. बी. सी. वरील एका समीक्षकाने त्यांना 'अर्धवट' म्हटले होते. मध्यंतरी एका मजूरपक्षीय खासदाराने प्रिन्स ऑफ वेल्सला 'गांवढळ' ठरवले होते. अमेरिकन वृत्तपत्रे–लेखकमंडळी शिव्या देण्यात मोठी तयार आहेत. लिंडन जॉन्सन राष्ट्राध्यक्ष असताना एका लेखकाने लिहिलेल्या नाटकात जॉन केनेडींची हत्या केल्याचा सरळ आरोप राष्ट्राध्यक्ष जॉन्सनवर केला होता.

आता कोणा फिलिप रॉथ नावाच्या लेखकाने 'अवर गँग' नावाचे एक पुस्तक लिहिले असून त्यात राष्ट्राध्यक्ष रिचर्ड निक्सनची यथेच्छ कुचेष्टा केली आहे. या पुस्तकाचा नायक आहे ट्रिकी डिक्सन. डिक्सनची हत्या होते; तो नरकात जातो; तेथे नरकनाथ (The Devil) म्हणून त्याची निवड होते. एका ठिकाणी हा नरकनाथ उद्‌गारतो: 'ज्यात गोष्टी झपाट्याने आणि नाट्यपूर्णतेने बदलत आहेत अशा काळात आपण वावरतो आहोत....नरकात आपल्याला नवी राज्ययंत्रणा निर्माण करायची आहे. त्यासाठी नवी अर्धसत्ये, नवे अत्याचार आणि नवा अप्रामाणिकपणा आवश्यक आहे. संपूर्णतया अधःपतित विश्वाचे आपले स्वप्न साकार करायचे असेल तर नव्या हिकमती, नवे डावपेच लढवावे लागतील; अशिवाबरोबर नवी बांधिलकी सिद्ध करावी लागेल.'

या पवित्र भारतवर्षात आम्ही शिवाची उपासना करतो; शिवाची नव्हे!

● ● ●

# मुक्काम महाड

- जि. प. कर्मचारी अधिवेशन
- श्री. घनःश्याम तळवटकर सत्कार
- संयुक्त शिवजयंती

एप्रिलच्या शेवटच्या आठवड्यात आणि मे महिन्यात पहिल्या आठवड्यात मह्या आड असलेल्या महाडात चैतन्य फुलून आले होते. राजकीयदृष्टया जागृत असलेल्या महाडात बारीकसारीक घडामोडी नेहमीच्याच. किंबहुना कुठल्याही गोष्टीला राजकीय रंग चढवून ती खेळवण्यात महाडकर तय्यार. शिवाय महाडचे रेस्टहाऊस बऱ्यापैकी असल्याने मंत्री-उपमंत्री यांची ये-जाही महाडला बरीच !

पण परवाचे चैतन्य निराळे होते. त्याला राजकीय रंग नव्हतेच असे म्हणता येणार नाही...पण ते रंग जरा फिकट होते.

दिनांक २८ आणि २९ एप्रिल रोजी महाडच्या वि. ह. परांजपे मंदिरात महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद कर्मचारी संघटनेचे अकरावे अधिवेशन भरले होते. महाराष्ट्राच्या २६ जिल्ह्यातून जवळजवळ पाचशे कर्मचारी कार्यकर्ते या अधिवेशनाला हजर होते. अधिवेशनाच्या उद्घाटनाला मंत्री हवाच ! ते कार्य कुलाबा जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार बॅ. अंतुले यांनी ठरल्या वेळेनंतर दीडतासांनी येऊन उरकले ! (उरकलेच, कारण उद्घाटनाचे भाषण ठोकून मंत्रीमहाशय सभा अर्धी सोडून पुढल्या कार्यक्रमार्थ मध्येच निघूनही गेले ! ) मुख्य पाहुणे ग्रामविकास राज्यमंत्री नामदार शंकरराव पाटील— शासनातर्फे अशा अधिवेशनात ज्या घोषणा करायच्या असतात त्या करण्याकरता मागे थांबले होते. ना. नरेंद्र तिडके आकस्मिक कारणामुळे येऊ शकले नव्हते.

महाराष्ट्राच्या इतर जिल्ह्यात कमी अधिक प्रमाणात दुष्काळ असल्यामुळे महाडसारख्या निदान अन्नोदकाची कमताई नसलेल्या शहरी हे अधिवेशन भरविण्यात संयोजकांनी साक्षेप दाखविला होता. औचित्य साधले होते.

सरकारी, निमसरकारी वा तत्सम धंद्यात सेवा करणारी मंडळी स्वतःला 'कर्मचारी' का म्हणवून घेतात मला समजत नाही. 'कर्मचारी' हा शब्द उच्चारल्याबरोबर मला उगीचच 'आचारी', 'व्यभिचारी' 'दुराचारी' असले शब्द आठवतात! या विविध प्रकारच्या कर्मचाऱ्यांच्या वैशिष्ठ्यपूर्ण कॅटॅगरीज निर्माण झाल्या आहेत. रेल्वेवाले, पोस्ट व टेलीग्रॅफ खात्यातले, रेव्हिन्यूतले, जिल्हा परिषदेतले-हे कर्मचारी कुठेही ओळखावेत. त्यांचे वागणे, बोलणे, चालणे यांचा एक ढाचाच बनला आहे. ही मंडळी आपापले वेगळेपण आवर्जून जपताना दिसतात.

लोकशाहीचे नव्हे सत्तेचे विकेंद्रीकरण करण्याकरता (इति बॅ. अंतुले!) जिल्हा परिषदा १९६२ साली अस्तित्वात आल्या. सुरुवातीला रेव्हिन्यूचीच माणसे जिल्हा परिषदांकडे वर्ग करण्यात आली. पण त्या मंडळींना फारच लोकनियुक्त असलेले हे शासन मानवत नव्हते म्हणून म्हणा वा जिल्हा परिषदांच्या कामांचा ढाचाच वेगळा होता म्हणून म्हणा-ती मंडळी हळूहळू परत आपापल्या खात्यात गेली. पण आता गेल्या अकरा वर्षांत जिल्हा परिषदांचा असा वेगळा कर्मचारी वर्ग उभा राहिला आहे आणि त्यांच्या दीड लाखांच्या संख्येत १०-१२ हजार मंडळीच रेव्हिन्यू खात्यातली व अन्य खात्यातली उरली आहेत.

संघटनेचे सरचिटणीस श्री. ओंकार यांनी आपल्या कार्याचा आढावा घेताना या गोष्टीचा आवर्जून उल्लेख केला आणि 'ही माणसे आमच्यात नकोत' असे मंत्रीमहाशयांना तोंडावर बजावले. जि. प. कर्मचाऱ्यांना सरकारी नोकराप्रमाणे संरक्षण मिळाले पाहिजे. महागाई भत्यातील वाढी त्वरित मिळाल्या पाहिजेत; घरभाडे मिळाले पाहिजे, हिल स्टेशन भत्ते मिळाले पाहिजेत, त्यांच्यासारख्या सर्व सोई उपलब्ध झाल्या पाहिजेत- या त्यांच्या मागण्या ऐकताना, मला एका गोष्टीचे नवल वाटत होते की जि. प. कर्मचारी 'सरकारी नोकरांप्रमाणे-आम्हाला अमुक-मिळाले पाहिजे-तमुक मिळाले पाहिजे' हे काय मागताहेत? ही मंडळी सरकारी नोकर (Public Servants) नाहीत का? मलाच आश्चर्य वाटले असे नव्हे, तर अधिवेशनाचे उद्घाटक ना. बॅ. अंतुले यांनाही ती गोष्ट म्हणजे 'न्यूज' होती! तसे असेल तर त्याकरता मी जरूर प्रयत्न करीन. तुम्ही माझ्याकडे या असे आश्वासन त्यांनी लगेच देऊन टाकले!

अधिवेशनात सादर केलेल्या अहवालावरून आणि इतर वक्त्यांच्या भाषणातून एक गोष्ट जाणवली की या संघटनेने गेल्या ११ वर्षांत सरकारला एकदाच संपाची धमकी दिली. प्रत्यक्षतः संप केव्हाच केला नाही. सरकारी कर्मचाऱ्यांच्या संपातही ही मंडळी सामील झाली नाहीत. तरीही त्यांच्या मागण्या बहुतांशी पुऱ्या झाल्या आहेत. पेशन्स ठेवून मागण्यांचा पाठपुरावा करीत, महिन्याचे पंधरा दिवस सचिवा-

लयातील वेगवेगळया शाखात फिरत राहाणाऱ्या श्री. ओंकार यांच्या कार्याचा अनेकांनी गौरव केला. प्रत्यक्ष ग्राम-विकास मंत्रीही तसे म्हणाले. अशी युनियन विरळा !

ग्रामविकास मंत्र्यांनी युनियनच्या अनेक मागण्या मान्य असल्याचे सांगितले. एक दोन गोष्टींवर आपण विचार करू असे म्हणाले, पण महाराष्ट्र डेव्हलपमेंट सर्व्हिस नामक एक निराळी 'सेवा' १५-८-७३ पासून अस्तित्वात येईल. सगळे आय्. ए. एस्. कार्यकारी अधिकारी व डेप्यूटेशनवरची मंडळी परत पाठविली जातील अशी त्यांनी घोषणा करताच साऱ्या कर्मचाऱ्यांनी टाळयांच्या गजरात तिचे स्वागत का केले समजले नाही.

महाराष्ट्र विकास सेवा अस्तित्वात येऊन जि. प. कर्मचारी सरकारी नोकर ठरतील का ? म. वि. सेवेचा सवता सुभा उभा करून फलित काय ? 'महाराष्ट्र विकास सेवा' हे निराळे नाव, आताच्या जि. प. कर्मचाऱ्यांना दिले म्हणून जिल्हा परिषदांचा आजचा गलथान कारभार सुधारेल आणि त्या अधिक विकासोन्मुख बनतील असे आहे का ? या म. वि. सेवेतर्फे ग्रामीण विकासाचा डोळा असणारी, समाज-सेवेची आवड असणारी, ग्रामीण प्रश्न समजावून घेऊन त्यातून विकासमार्ग चोखळणारी, विशिष्ट प्रकारे प्रशिक्षित अशी मंडळी तयार झाली, तरी ग्रामीण गुंड नेतृत्वाचे जे वर्चस्व या सर्व कार्यावर असते, त्याला ही सेवा तोंड देऊ शकेल का ?

प्रश्नचिन्हे अनेक. उत्तर येईल ते, असेच म्हणायला हवे. अधिवेशनाला आलेली सारीच मंडळी कर्मचारी बांधवांचे प्रश्न सोडविण्याकरता आली होती असे म्हणणे म्हणजे त्यांच्यावर अन्याय होईल ! त्यात हौशे, गवशे, नवशे साऱ्यांचाच भरणा होता. त्यांच्या आपापसातल्या संभाषणांचा कानोसाच याची साक्ष देईल.

: इतक्या दूर आलो तर म्हटलं रायगड बघून घ्यावा. म्हणून काल इथे बिस्तरा टाकला आणि पोबारा केला !

: आम्ही महाबळेश्वर–प्रतापगड करून आलो

: होय ? किती लांब आहे. तासा-दोन तासाचा रस्ता

: या रटाळ भाषणांनी आणि चर्चेनं जीव अगदी उबून गेला बाई. पिक्चर पण रद्दी निघाले.

: तुमच्याबरोबर इतकी लांब आले हेच चुकलं माझं. सारखे तुम्ही त्या मंडपात काय बसून राहाता ? फिरायलाही आला नाहीत.

: कसलो अधिवेशनं अन् कसले प्रश्न ! या पुढारी लोकांना आमचीच लाल म्हणवून घ्यायचं असतं म्हणून ही अधिवेशनं !

: जि. प. कर्मचारी संघासारखं गांडू नेतृत्व दुसऱ्या कुठल्याही संघटनेला लाभले नसेल ! मंत्र्यांच्या पुढे पुढे करायला मिळावं म्हणून ही सारी सोंगं.

: ओंकार, पण तळमळीचा माणूस आहे हं !

: रामजीवन की जगजीवन चौधरी कोण रे ?

: अरे तो आमदार आहे. आपल्या संघटनेचा अध्यक्ष तो.

: तो अगदी फुकट वाटला !

: शंकरराव पाटील म्हणाला तसे करील का रे ?

: मंत्र्यांची आश्वासने-सीरिअसली घेतोस काय लेका !

: अंतुले बाकी विनोदी बोलले हं !

मोर्चे, निदर्शने, संप ही शेवटची हत्यारे आहेत. प्रश्न वाटाघाटीनेच सुटतात अशी श्रद्धा बाळगणारी ही युनियन. त्यामुळेच शासन या युनियनच्या मागण्यांना चांगला प्रतिसाद देत असावे. मागण्या पदरात पाडून घेणे एवढेच ध्येय न मानता, जि. प. कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता वाढावी, जनताभिमुखता वाढावी, बेलगाम ग्रामीण नेतृत्वाला वेसण घालण्याची शक्ती त्यांच्यात यावी म्हणूनही या संघटनेने प्रयत्नशील राहावे असे कुणीही म्हणेल ! ◻

रविवार दि. २९ एप्रिल १९७३ रोजी आणखी एक मोठा समारंभ महाडच्या डॉ बाबासाहेब आंबेडकर कॉलेजमध्ये घडून आला. हा होता सत्कार समारंभ. महाडचे कॉलेज, लक्षावधी रुपयांचा तोटा सोसून गेली १२ वर्षे चालविण्याचे महान कार्य करणाऱ्या पी. ई. सोसायटीच्या सरचिटणीसांचा सत्कार करण्यात आला. त्या कार्यक्रमाचे अध्वर्यू होते. प्राचार्य शि. ना. रामटेके, माननीय श्री. के. बी. तथा घन:शाम तळवटकर सत्कार समितीचा अध्यक्ष या नात्याने हा गृहस्थ गेले दोन महिने राबत होता. या समारंभात श्री. तळवटकर यांना एक मानपत्र देण्यात आले. एक गौरव अंक प्रकाशित करण्यात आला. एक हजार एक रुपयांची थैली देण्यात आली. विविध संस्थांतर्फे हार समर्पण, शालश्रीफल, सुवासीनींनी ओवाळणे वगैरे इतर सत्कारही होतेच. पण या सत्काराचे वेळी २७ सालच्या चौदारतळे सत्याग्रहात ज्या व्यक्तींनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना साथ दिली त्यांचाही सन्मानपत्र व श्रीफल देऊन सत्कार करण्यात आला. यातले बरेचसे सन्मानित त्या लढ्यात खरोखर सहभागी नव्हते अशी कुरकुर काही कोपऱ्यातून ऐकू आली, पण सारेच सन्मानित स्वातंत्र्यसैनिक, खरोखर स्वातंत्र्य लढ्यात होते का ? याचे पुरावे जसे मिळणे कठीण तसाच हा प्रकार होता असे म्हणायला हवे.

समारंभाचे अध्यक्ष होते श्री. भय्यासाहेब आंबेडकर. ते सपत्नीक आले होते. इतर अनेक पाहुण्यात सोसायटीच्या सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्य, उप प्राचार्यांचा समावेश होता. पण ध्यात नजरेत भरले ते मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू श्री. आर. पी. नाथ. तेही सहकुटुंब आले होते. भदंत के. आनंद थेरा नामक एक बुद्ध भिक्षूकही समारंभास उपस्थित होते.

समारंभाला अपेक्षेबाहेर गर्दी झाली. महाविद्यालयाचे सभागृह अपुरे पडले. अनेकांना बाहेरच तिष्ठत उभे राहावे

लागले. मैदानावर मंडप घालून समारंभ तिथे आयोजित करायला हवा होता. 'प्राचार्य रामटेकेंना श्री. तळवटकर हे ल्हानसहान नेते वाटले काय ?' अशी जाहीर प्रतिक्रियाही श्री. सुमंत गायकवाडांनी व्यक्त केली. पण 'समारंभानंतर सर्वांना गोड जेवण द्यायचे ठरले होते. त्यामुळे ही गर्दी शेवटपर्यंत ओसरली नाही' अशीही मल्लीनाथी एका पुढाऱ्यांनी केली !

सत्कार समारंभातली भाषणे ही नेहमीच उत्सवमूर्तीच्या गुणवर्णनपर असतात. पण त्यातही हृदयाला जाऊन भिडले ते प्राचार्य म. भि. चिटणीसांचे भाषण. श्री. तळवटकर हे त्यांचे विद्यार्थी 'शिष्यादिच्छेत् पराजयम्' या तऱ्हेचे भाव त्यांच्या भाषणात प्रतीत झाले.

कुलाबा जिल्ह्यातील, श्रीवर्धन तालुक्यातील हरवित नामक एका खेडेगावातील कृष्णा भिकाजी तळवटकर नावाचा एक महार जमातीतला मुलगा. वयाच्या ८ व्या वर्षी आपल्या वडिलांबरोबर मुंबईस येतो. स्वत: मॅजेस्टीक हॉटेलात लिफ्टमन असूनही त्याचे वडील त्याला शिकवतात. ४२ साली मॅट्रिक पास करतात. वडिलांच्या अकाली निधनामुळे पुढे शिकण्याची जिद्द असूनही त्याला नोकरी पत्करावी लागते. पण ४६ साली डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मुंबईत सिद्धार्थ कॉलेज काढल्यावर त्या सकाळच्या महाविद्यालयात पुढे शिकण्याची संधी त्याला मिळते. ती पकडून ५० साली तो बी. ए. होतो. ५२ साली एम्. ए. होतो. ५३ साली पी. ई. सोसायटीच्या कॉमर्स कॉलेजचा रजिस्ट्रार होतो. ५५।५६ सालापासून सोसायटीच्या सर्वच कॉलेजिस्चे रजिस्ट्रारपद मिळवतो. पुढे ५८ सालापासून सोसायटीचा जनरल सेक्रेटरी होतो. सामाजिक, धार्मिक आणि राजकीय नेतृत्वही समाजाला देऊ शकतो. काव्य, नाट्य, कथा अशा अनेक साहित्यक्षेत्रात लेखणी चालवू शकतो, माणसे जोडू शकतो. उंच वयातही एल्. एल्. एम्. पदवी मिळवतो. जे. पी. होतो. ही सारीच कर्तृत्वाची कमान विलोभनीय आहे यात शंका नाही. १९५३ साली डॉ बाबासाहेबांनी श्री. तळवटकरांना लिहिलेल्या पत्रात लिहिले होते– 'I am an old man now. Soon some one must come forward to take my place. It is only then, the institutions I have created will last' डॉक्टरसाहेब श्री. तळवटकरांकडे ज्या आशेने पाहात होते त्या गोष्टी अंशत: सिद्ध करण्याचे कर्तृत्व, निष्ठा आणि जिद्द तळवटकरांनी दाखविली आहे. पी. ई. सोसायटीच्या व्यापा-तापाबरोबर इतर अनेक संस्थांचा संसारही तळवटकर पाहात असतात.

: रिपब्लिकन पक्ष, सर्व दलितांचा ना ? मग आज तो फक्त बुद्ध-मंडळींचाच का मानला जावा ? इतर दलितांवरील अन्याया-बलात्कारांची दखल त्याने का न घ्यावी ? या प्रश्नाला त्यांनी उत्तर दिले–

: ज्या वृद्ध मंडळींच्या हाती रिपब्लिकन पक्षाचे नेतृत्व गेले त्यांनी डॉक्टर बाबासाहेबांनी ठेवलेली पक्षाची व्याप्ती आकुंचित केली. हा नेतृत्वाचा खुजेपणा आहे हा जायला हवा. डॉक्टर-साहेबांनी महारांची संघटना बांधली, ती सुरुवात म्हणून.सर्व दलितांना त्यांना एका झेंड्याखाली आणायचे होते, तेच रिपब्लिकन पक्षाचे उद्दिष्टच आहे, पण माणसे कमी पडतात.

: मुंबईत मागे रिपब्लिकनांनी काँग्रेसशी हातमिळवणी केली, परवाच्या महापालिका निवडणुकीत शिवसेनेशी दोस्ती केली याला काही अर्थ आहे का ?

: हे पाहा त्रिवलकर, कुठल्याही अल्पमती पक्षाला मोठ्या पक्षाची शेज-सोबत, निवडणुकीपुरती तरी करावीच लागते. त्याचा अर्थ आम्ही त्यांच्या मतांशी सहमत असतो असे नव्हे.

: पण यांचे फलित काय ?

: तसे फलित विचारलेत तर शून्य ! मागच्या वेळी आम्ही काँग्रेसशी हात-मिळवणी केली – आमची मते त्यांच्या उमेदवारांना मिळाली. पण त्यांची मते आमच्या उमेदवारांना मिळाली नाहीत. जे तेव्हा झाले, तेच परवा शिवसेने-बाबतही झाले. त्यांनी आमची मते खाल्ली; आम्हाला त्यांची मिळाली नाहीत. परिणाम – दोन्ही वेळी आमच्या उमेदवारांनी जोरदार आपटी खाल्ली ! त्याला इलाज नाही. आमच्या पक्षाला एकसंध राखील असे समर्थ नेतृत्व बाबासाहेबांनंतर लाभलेच नाही हेच आमचे दुःख आहे.

: तसे नेतृत्व कुणीतरी द्यायला हवे नाही का ?

: हवे हे खरे. पण ती विद्वता, ते कर्तृत्व जन्मायला हवे. जिद्दीने, निष्ठेने, संघटनेतून साकारायला हवे.

सत्काराला उत्तर देतानाही श्री. तळवटकर म्हणाले, 'मी खूप मोठा आहे, कर्तृत्ववान् आहे असे अनेकांनी सांगितले मलाही क्षणभर संदेह पडला की खरेच मी मोठा आहे की काय ? पण मनाने त्याचा लगेच उलगडा केला. मातेच्या ममतेने माझ्याकडे पाहाणाऱ्या या मंडळींच्या दृष्टीचा तो गुण आहे. ही मंडळी उदारमनस्क आहेत, प्रेमळ आहेत म्हणून माझ्यातील गुणांच्या राईचा त्यांना पर्वत दिसतो. या उद्गारात फॉर्म्यॅलिटीपेक्षा प्रांजलपणा होता.

महाडातील तिसरी घटना ४ मे ७३ ची. त्या दिवशी शिवजयंती होती. प्रतिवर्षी शिवजयंती साजरी होते ती रायगडावर, यंदाही तो तिथे साजरी झाली–शिवसेनाप्रमुख श्री. बाळासाहेब ठाकरे यांच्या उपस्थितीत. बाळासाहेब मुंबईहून आले ते तडक रायगडी गेले. तिथला कार्यक्रम उरकून ते परत मुंबईला रवाना झाले. महाडात थांबले नाहीत; पण आपले भाषण संपवून बाळासाहेबांनी गड उतरल्यावर मागे राहिलेल्या त्यांच्या काही अनुयायांनी तिथे थोडा अनुचित प्रकार केल्याचे कानी आले, तेव्हा दुःख झाले. शिव-सैनिक म्हणविणाऱ्यांनी जिल्हा परिषदेने रायगडी उभी केलेली बाग ओरबाडावी, फुले कुस्करावीत. बागेचे रक्षक, जि. प. चे कर्मचारी या गोष्टीला प्रतिबंध करू

गेले तर त्यांना त्यांनी अद्वातद्वा बोलावे, शिवीगाळ करावी. 'आमच्याच बापाची ही मालमत्ता आहे. तुम्ही कोण आम्हाला अडवणार?' ही भाषा वापरावी आणि तीही शिवजयंतीच्या दिवशी, ही गोष्ट निंद्य आणि गर्हणीय आहे. ती खरी की खोटी याची शहानिशा बाळासाहेबांनी करावी आणि संबंधित अनुयायास समज द्यावी, असे कुणालाही वाटल. शिवस्थानी, शिवसैनिकांनी अनाचार करावा ही गोष्ट खपवून घेतली जाऊ नये.

शिवजयंतीच्या दिवशी महाडात आनंद, जल्लोष ओसंडून वाहात होता. पुढले वर्ष शिवराज्याभिषेकाचे त्रिशतसांवत्सरिक म्हणून साजरे होणार आहे. त्या अनुषंगाने यंदाची शिवजयंती महाडात थाटाने साजरी झाली. श्री. भिकोबा मालुसरे यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करून त्या समितीतर्फे ४ मेला महाडात एक मोठा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. गावातील सात-आठ तरुण मंडळांनी शिवचरित्रातील विविध प्रसंगाचे फ्लोट्स् तयार केले होते. रोहिडेश्वरी स्वराज्य शपथ एकात साकार झाली होती तर दुसऱ्यात कल्याणच्या सुभेदाराची सून महाराजांपुढे उभी केली जाते तो प्रसंग उभा केला होता. आग्र्याहून सुटका, राज्यभिषेकानंतरची महाराजांची हत्तीवरून निघालेली मिरवणूक, असे ७।८ प्रसंग; काहीत मूर्तीरूपाने तर काहीत प्रत्यक्ष रंगविलेल्या पात्रांच्या रूपाने, उभे करून त्या फ्लोट्स्ची शहरातून वाजत गाजत मिरवणूक निघाली. दुपारी १ पासून सायंकाळी ८ वाजेपर्यंत गावातील विविध भागातून मिरवणूक गेली. खालू, ढोल, लेजीम, बँड, तुताऱ्या, रणशिंगे अशी विविध वाद्ये, प्रत्येक फ्लोटपुढे वाजत होती. महाडच्या मुस्लीम मोहल्यातून मिरवणूक जात असता काही मुस्लीम बांधवही मिरवणुकीत लेजीम खेळायला सामील झालेले दिसले. दोन वर्षांपूर्वी ७ मेला, महाडच्या हिंदू-मुस्लीम दंगलीत एकमेकांना जाळायला आणि भोसकायला निघालेली हिंदू-मुस्लीम मंडळी यंदा शिवजयंतीच्या मिरवणुकीत भान विसरून एकत्र नाचताना पाहून खूप बरे वाटले.

रात्री आठ वाजता गाडीतळावर उभारलेल्या भव्य रोस्ट्रमजवळ मिरवणुकीचे सभेत रूपांतर झाले. या सभेत नवशक्तिकार श्री. पु रा. बेहेरे यांचे व्याख्यान ठरले होते. पण नवशक्तीतील संपामुळे बेहेरे येऊ शकले नाहीत. मग बिरवाडीच्या जनसंघीय मालुसऱ्यांनी सभेची सांगता केली. तीन उत्कृष्ट फ्लोट्सना पारितोषिके दिली. शिवजयंतीनिमित्त बैलगाड्यांची शर्यतही सकाळी आयोजित झाली होती.

या साऱ्यावर हजारो रुपये खर्च झाले. दुष्काळी परिस्थितीत हे योग्य होते का? असा सूर गावात काही लोक काढीत होते. पण तो प्रांजल सूर होता की त्याला पक्षीय वास होता हे सांगणे कठीण. पण शिवजयंती, सुविहितपणे साजरी झाली यात मात्र शंका नाही.

—प्रा. रा. म. बिवलकर

# तालुका वसई 'आदर्श' शा. मा.

पंढरीनाथ चौधरी, विरार

वसई तालुक्यातील अनेक प्राथमिक शिक्षक हे ग्रामपंचायतीपासून विधानसभेच्या निवडणुकीच्या प्रचार कार्यात भाऊसाहेबांची व आता माईसाहेबांची मर्जी सांभाळण्यासाठी लुडबूड करतात. त्यामुळे त्यांचे विद्यार्थ्यांना शिकवण्याकडे सहाजिकच दुर्लक्ष होते व विद्यार्थ्यांचे आणि पालकांचे नुकसान होते. आज वसई तालुक्यातील अनेक प्राथमिक शाळांचे प्राथमिक प्रमाणपत्र परीक्षेचे निकाल समाधानकारक लागत नाहीत. त्यामुळे ज्या ठिकाणी माध्यमिक शाळांमधून प्राथमिक शिक्षणाची सोय करण्यात आली आहे, अशा शाळांत फी भरून अनेक पालक आपली मुले पाठवितात. वसई, अर्नाळा, नाळे, विरार, शिरवली, सोपारा, निर्मळ या ठिकाणी आदर्श शिक्षक म्हणून ज्यांचा गौरव जिल्हा परिषदेतर्फे झालेला आहे, अशा शिक्षकांच्या शाळांच्या गेल्या ३।४ वर्षांच्या निकालाकडे दृष्टिक्षेप टाकला तर अनेक उद्बोधक गोष्टी समजून येतील. शाळेच्या या असमाधानकारक निकालाविरुद्ध पालकांनी ओरड सुरू केल्यावर जिल्हा परिषदेचे शिक्षण खाते व तालुका पंचायत समिती यांना आता जाग आली आहे. परंतु वसई तालुक्यातील अनेक शिक्षकांना हे माहित आहे, की भाऊसाहेब, माईसाहेब किंवा गल्लींमधील काँग्रेस पुढारी यांची मर्जी सांभाळून राहिले व निवडणुकीमध्ये मदत केली म्हणजे आपले कोणी काही करू शकत नाही, सोयीच्या ठिकाणी बदली मिळू शकते. या लाचार वृत्तीमुळे व वशिलेबाजीमुळे विद्यार्थ्यांना शिकविण्याचा प्रश्न येतो कोठे? निवडणुकीत पोस्टर्स लावण्यापासून मतदारांना कार्ड वाटण्याची कामे केली म्हणजे मग शाळेत हजर राहिलेच पाहिजे असे नाही.

वसई तालुक्यात कुटुंब नियोजन कार्यासाठी शिक्षकांचा प्रामुख्याने उपयोग केला जात असे. प्रचार सभेसाठी हुकमी श्रोते म्हणजे शिक्षक! त्यांना अशा सभांना सक्तीने हजर रहावे लागे. काही कुरबुर केली तर गैरसोयीच्या व लांबच्या ठिकाणी बदली करण्याची धमकी उघडपणे दिली जात असे. वसई तालुका पंचायत समितीने शिक्षकांच्या बदल्या करण्यापलिकडे शिक्षण क्षेत्रात गेल्या १० वर्षांत कोणतीच भरीव कामगिरी केलेली नाही. भारत-पाक युद्धाच्या वेळी प्रकाशबंदी असताना प्रचार सभांसाठी शिक्षकांना सक्तीने बोलावण्यात येई. दुपारी ३।४ वाजता सभा असली तरी सभापती, माईसाहेब, रावसाहेब हे नेहमीच उशिरा

येत. मग सभा दीड दोन तास उशिरा सुरू होई. मुंबईत किंवा खेडेगावात दूरच्या ठिकाणी राहणाऱ्या शिक्षकांना– विशेषत: स्त्री शिक्षकांना प्रकाशबंदी मुळे खूपच त्रास होत असे. परंतु याबद्दल तक्रार करण्याची सोय नाही. विरोधी सूर काढला किंवा तक्रार केली तर ताबडतोब बदली, कुटुंब नियोजन कार्यासाठी वसई तालुक्यात शिक्षकांची अक्षरश: वेठेबिगार केली जात असे. याविरुद्ध काही समाजसेवकांनी आवाज उठविताच ठाणे जिल्ह्यात सर्वत्र जोरदार खळबळ उडाली व प्राथमिक शिक्षक संघटना खडबडून जागी झाली; सभापती, माईसाहेब यांचे हस्तक व भविष्य काळात आदर्श शिक्षक म्हणून गौरव व्हावा ही आशा बाळगून असणारे, समाजसेवकांना ही सर्व माहिती कोण पुरवितो या कडे डोळ्यात तेल घालून लक्ष ठेऊ लागले. असे कोणी सापडले नाहीत तेव्हा संशयावरून अनेक गरीब व निरपराधी शिक्षकांच्या बदल्या गैर-


# संध्याकाळ

वेधक आत्मकथन

गजानन जागीरदार

मूल्य : दहा रुपये

राजहंस प्रकाशन


सोयीच्या जागी करण्यात आल्या व शिक्षकांमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण करण्यात आले. या निर्माण झालेल्या वावटळीमधून प्राथमिक शिक्षकांचा जाच मात्र थोडा कमी झाला व कुटुंब नियोजनाचा शिक्षकां-मागील ससेमिरा थांबला.

सकस आहार योजनेच्या नावाखाली शाळांतून तयार करून वाटण्यात येणारा उपमा किंवा सुकडी यामुळे शिक्षकांमागे एक नसता उद्योग लागून राहिला आहे. त्यामुळेही शिकवण्याकडे दुर्लक्ष होत असते.

गैरसोईच्या जागी आपली बदली होऊन आपली गैरसोय होऊ नये म्हणून शिक्षक अतिशय दुबळा बनला आहे. आचार्य दोन्दे, आचार्य भिसे गुरुजी, साने गुरुजी यांनी महाराष्ट्रामधील प्राथमिक शिक्षकांची संघटना उभारली, शिक्षकांना त्यांच्या हक्काची जाणीव करून देऊन त्यांच्यामध्ये स्वाभिमानी वृत्ती निर्माण करून त्यांना ताठ मानेने चालण्यास शिकविले, परंतु जिल्हा परिषदेकडेच शिक्षण खाते राहिल्यामुळे शिक्षणाचा दर्जा सुधारण्याऐवजी अंतर्गत व स्थानिक राजकारणाचा दबाव शिक्षकांवर येऊ लागला. वसई तालुका हा महाराष्ट्र राज्याचे महसूल मंत्री श्री. वर्तक यांचा मतदार संघ. त्यांची भावजय सौ. तारा वर्तक या जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा. त्यांची दहशत इतकी जबर, की महागाईने बेजार झालेला गरीब बिचारा शिक्षक त्यांच्या मर्जीविरुद्ध वागून आपल्यावर बदलीची

नसती आफत ओढवून घेत नाही. उलट बढत्या मिळविण्यासाठी, आदर्श शिक्षक म्हणून स्वत:चा गौरव करून घेण्यासाठी भाऊसाहेब, माईसाहेब, सभापती यांच्याच तालावर प्राथमिक शिक्षकांना नाचावे लागते.

वसई तालुक्यातील माजी सभापतीने जेष्ठता क्रम बाजूला सारून आपल्या मर्जीमधील एका शिक्षिकेची आपल्या गावी मुख्याध्यापिका म्हणून नेमणूक करून घेण्यासाठी जीवाचा आटापिटा केला. त्या शिक्षिकेचा आदर्श शिक्षिका म्हणून लौकरच गौरव होणार असल्याचे समजते. शिरवली या गावी एका पूजेच्या ठिकाणी 'शाळेच्या वाटेवर कोण ग उभा' या ध्वनिमुद्रिकेने धमाल उडविली. ही ध्वनिमुद्रिका त्या व आजुबाजूच्या पंचक्रोशीत इतकी लोकप्रिय झाली, की त्या बद्दल सर्वत्र चविष्टपणे चर्चा चालू आहे त्या गावचा एक कॉंग्रेसचा स्थानिक पुढारी कडक इस्त्रीचे कपडे घालून शाळेच्या वाटेवर व शाळेत बराच वेळ दररोज घोटाळत असतो. या ध्वनिमुद्रिकेमुळे लोक या स्थानिक पुढाऱ्याला पाहून या गाण्याची ओळ गुणगुणताना आढळतात.

वसई शहरामधील एका शाळेतील श्री. अनंतराव म्हात्रे या शिक्षकाचा आदर्श शिक्षक म्हणून गौरव केला तो कोणत्या कारणासाठी, याबद्दल तालुक्यातील लोकांना व अनेक शिक्षकांना प्रश्न पडलेला आहे ? ते शिकवित असलेल्या वर्गाचे गेल्या ४।५ वर्षात काय निकाल लागले ? आज खेडयापाडयात व ग्रामीण भागात ध्येयवादी शिक्षक नाहीत म्हणून शिक्षणाची उपेक्षा होत आहे, असे वसई तालुका शिक्षक संघटनेने एका पत्रकात म्हटले आहे. तेव्हा श्री. म्हात्रेंसारख्या आदर्श शिक्षकांनी काही वर्षे ग्रामीण भागात शिक्षणाचे कार्य करून आपला वेगळा आदर्श निर्माण करणे आवश्य आहे.

आचार्य दोन्दे, आचार्य भिसे गुरुजी, साने गुरुजी यांच्या ध्येयवादाने प्रेरित झालेले आज अनेक प्राथमिक शिक्षक खेडयापाडयात व ग्रामीण भागात वर्षानुवर्षे विद्यादानाचे कार्य करीत आहेत. अशा या ध्येयवादी शिक्षकांचा त्यांच्या आयुष्यामध्ये कधीच सत्कार होणार नाही. त्यांना शहराचे दर्शनही कधी घडणार नाही, कारण त्यासाठी आवश्यक असलेली लाचारी वृत्ती या शिक्षकांमध्ये नसते. त्यामुळे त्यांच्या हयातीत आदर्श शिक्षक म्हणून गौरव होण्याचे त्यांच्या भाग्यातच नाही.

अर्नाळा प्राथमिक शाळेतील प्रमाणपत्र परीक्षेचा गेल्या २–३ वर्षात शून्य निकाल लागतो, या बद्दल अर्नाळा ग्रामपंचायतीने एक ठराव करून चिंता व्यक्त केली आहे. अर्नाळा ग्रामपंचायतीमध्ये कॉंग्रेस पक्षाचे बहुमत आहे. अर्नाळा मराठी शाळेचे मुख्याध्यापक श्री. भा. दा. पाटील हे कॉंग्रेसच्या निवडणुकीत सक्रीय भाग घेत असताना, अर्नाळा ग्रामपंचायतीने आपल्या विरुद्ध ठराव पास करावा याबद्दल ते आता संताप व्यक्त करीत आहेत. कारण

पृष्ठ ३८ वर

मार खाऊन खाऊन अर्धमेली झालेली घाटंजीची जनता
उत्तरे मागत आहे या प्रश्नांची....

# मौजे घाटंजी

प्रा. पां. शं. माईणकर

विदर्भाच्या दक्षिणेकडे यवतमाळ जिल्ह्यातील एक गाव–शहर म्हणावे तर फार मोठे नाही आणि खेडे म्हणावे तर फारसे लहानही नाही असे. नाव घांटजी. घाटी आणि आंजि ही दोन छोटीशी खेडी दोन बाजूंना कुशीत घेऊन निर्धास्तपणे पहुडलेले. वस्ती तशी जुनीच. आता पंचायत समितीची स्थापना झाल्याने आणि चार दोन इवलाली सरकारी कार्यालये निघाल्यामुळेच काय ती या गावात तुमानींची येजा सुरू झाली तेवढीच. नाही म्हणायला गावाने आता एक महाविद्यालयही उभे केले आहे. स्वतःच्या पायावर गाव तसं सुखी समाधानी. लोकात अशिक्षितांचा भरणा जास्त. पण जातीचे मात्र कष्टाळू. जमीन काळीची. पाऊस बेताचा हवामान एकदम बेश. खूप कष्ट करा नि ज्वारी–तुरीची वर्षा-दोन वर्षांची बेगमी खुशाल एकाच हंगामात करून ठेवा नगदी पैशासाठी कापसाची गाडी भरा नि जिनात जा. आणि येताना वर्षभराची मीठ, मिरची, कपडालत्ता, सणवार लग्नकार्य यांची सोय करून या. तुम्ही थकाल पण घाटंजीच्या जमिनीची कूस थकणार नाही. तिला आशीर्वाद लाभला आहे. गावाला प्रदक्षिणा करणाऱ्या वाघाडी नदीचा. केव्हाही जा, वाघाडीच्या खळखळ वहाणाऱ्या प्रवाहाचा धीरगंभीर आवाज हेच गीत तुम्हाला वारवार ऐकवील आणि म्हणूनच यवतमाळ जिल्ह्याच्या एका कोपऱ्यात पडलेले आणि राजरस्त्यापासून तुटलेले हे गाव सदैव आपल्याच मस्तीत दंग असते. एखाद्या दुसऱ्या लहानमोठ्या दुष्काळाला घाबरून जाण्याची या गावाला सवयच नाही आणि आपल्या कुटुंबात शोभतील अशीच लहान मोठी गावे घाटंजीने आपल्या सभोवार वसविली आहेत. खापरी, मुर्ली, बेलोरा, कुमारी, नुक्ती, आकपुरी, चोखुंड, करमना, राजुरवाडी, कोंडजई, रोहटक–नाव तरी किती घ्यायची ? प्रत्येक खेडे तसे लहानच

पण चारी ठाव जेवल्यानंतर ढेरीवर हात फिरवीत, मस्त ढेकर देत लोडाशी टेकावे त्याप्रमाणे विसावलेले.

मंगळवार हा घाटंजीचा नेहमीचाच घाईगर्दीचा दिवस. आठवडी बाजार याच दिवशी असतो. बाजाराला निवांतपणा मिळावा म्हणून शाळा सकाळीच घाईगर्दीत सुरू होतात आणि बंदही होतात. दुसऱ्या दिवशी मोठा बैलबाजार भरतो. पंचक्रोशीत घाटंजी प्रसिद्ध आहे ती या बैलबाजारामुळेच. बाजारातील एकेक जोडी पाहून घ्या. नजर उचलावीशी वाटणार नाही.

याच घाटंजीत एक अघटित घडले. २४ एप्रिल १९७३, मंगळवारचा दिवस. जवळपासच्या अनेक गावांचे मजूर रणरणत्या उन्हात बाजाराला आले होते. डाळदाणा घेऊन दिवस बुडायच्या आत गावाला नेहमीप्रमाणे परत जाण्यासाठी. पण बाजारात धान्याचा पत्ता नव्हता. तांदूळ तर आधीच कित्येक दिवसापासून गायब झालेला. गव्हाचे भाव अस्मानाला टेकले होते. ज्वारी होती थोडीशी. निकृष्ट पण तिचेही भाव १–३०, १–४० पर्यंत चढलेलं. तुरीची डाळ २–६०, २–७० किलो. गरीब मजुरांच्या डोळ्यापुढे भर दिवसा काजवे चमकायला लागले. सरकारी धान्य दुकानांनी तर आधीच कानावर हात ठेवलेले. गहू, मागू नका. तांदूळ माणशी २५० ग्रॅम. ज्वारी संपली, मिलो यायचा आहे. ही उत्तरे. सर्वत्र काळजीचे चिंतेचे वातावरण. आतापर्यंत तर निभले. पण यापुढे कसे निभणार आता! प्रत्येकाचा चेहेरा जणू काही काळजीने दुसऱ्याला विचारीत होता? आता कसं? आता कसं?

आणि इतक्यात कोणीतरी सांगितलं. उद्या सभा आहे. रात्री याच ठिकाणी. जांबुवंतराव धोटे येणार आहेत, बोलणार आहेत.

दुसरा दिवस उजाडला. बुधवार दिनांक २५ एप्रिल १९७३. रात्री धोटयांची सभा. संध्याकाळपर्यंत ही ऽऽ गर्दी. लोक भुकेलेले–भाषण ऐकण्यासाठी. काय सांगणार धोटेबाबा ते ऐकायला आलेले. सभेची वेळ झाली. पण धोटयांचा पत्ता नाही. इतक्यात पुन्हा कुणीसं सांगितलं. 'जांबुवंतराव यणार नाहीत–त्यांना अटक झाली आहे.' झालं. सयमाचा बंधारा तुटला. आतापर्यंत कशीबशी आवरून ठेवलेली जनता अनावर झाली. नेते प्रयत्न करीत होते जनतेला काबूत ठेवण्याचा; पण तीन-चार हजार जनतेच्या भाऊगर्दीत एक-दोन नेत्यांचा आवाज कुठपर्यंत पोहोचणार! सभेच्या व्यवस्थेकरिता आधीच एक लॉरीभर स्पेशल रिझर्व्ह पोलीस दुपारीच घाटंजीत येऊन दाखल झाले होते. आल्यापासून विनाकारण स्वस्थ बसावे लागल्यामुळे त्यांचेही हात फुरफुरत असावेत. आपल्या नेत्याचे भाषण होऊ शकत नाही हे माहीत झाल्यानंतर जनता चवताळेल आणि मग तिला आवरणे कठीण जाईल असे जणू काही त्यांना स्वप्नच पडले आणि एस. आर. पी. चे पंचवीस-तीस जवान

एकदम लाठ्या सरसावीत जमावावर तुटून पडले. झाले. आता मात्र जमावाचा संयम पार तुटला. धान्य मिळत नाही. नेत्याचे भाषण ऐकायला यावे तर तेही नाही. आणि वर विनाकारण लाठ्या खाव्या लागतात. आता आपल्या भावनावर ताबा ठेवणे जनतेला अशक्य झाले. आणि जनतेवर लाठ्या चालविणाऱ्या पोलिसावरच कायदा हातात घेऊन जनतेने दगडविटांचा मारा सुरू केला. एस. आर. पी. चे जवान पोलीस स्टेशनकडे आश्रयार्थ पळत सुटले. सुसाट जनतेने पाठलाग सुरू केला. पोलीस-स्टेशनवर दगडफेक सुरू झाली. इतक्यात डी. वाय. एस. पी. ची गाडी आली. जमावाने तिच्यावर आपला मोर्चा वळविला. मोटारीच्या काचा फुटल्या इतर मोडतोड झाली. डी. वाय. एस. पी. नाही मार बसला. आता जमाव कोणाच्याच काबूत राहिला नव्हता. जमावाचे मानसशास्त्र स्वतंत्र असते. प्रत्येकजण जणू काही नेत्याच्या अविर्भावात वागू लागला आणि हा अनावर झालेला जमाव हळूहळू पुढे सरकू लागला. दुकानावर दगडफेक सुरू झाली. ज्वारीची मागणी होऊ लागली. तेल कुठे मिळेल हे शोधले जाऊ लागले. यापूर्वीच सर्व दुकानदारांनी घाईगर्दीने आपापली दुकाने बंद केली होती. कोणी घरी जाऊन निवांत बसले होते. कोणी दुकानाच्या पायऱ्यावरच रेंगाळत होते. तर कोणी मिळालेल्या सुट्टीचा सदुपयोग करण्यासाठी गोविंद टॉकीजमध्ये सिनेमा पाहत बसले होते. त्यांना कल्पना नव्हती पुढील संकटाची. अद्यापीही एस. आर. पी. चे बहाद्दर जवान हातातील लाठ्या सावरीत पोलीस-स्टेशनमध्ये गप्प होते. दुसरे करणार काय ? अनावर जनतेचा लोंढा हाऽऽ मोठा तर पोलीस सारे पाच पंचवीस. अनावर झालेला समुदाय आता हमरस्त्यावर फिरू लागला. दुकानांची मोडतोड होऊ लागली. रस्त्यावर असलेल्या तेलाच्या टाक्या फोडण्यात आल्या. तांब्या पितळेच्या भांड्यात, टिनाच्या डब्यात, आणि काहीच नाही मिळाले तर मातीच्या गाडग्या मडक्यातही तेल भरभरून घेऊन जाऊ लागले. घाटंजीच्या रस्त्यांनाही भरपूर तेल, कधी नाही ते मनसोक्त पाहायला मिळाले. अद्यापीही नवीन पोलीस कुमक आली नव्हतीच. मग जमावाला जास्तच हुरूप आला. दुकाने फोडण्यापर्यंत मजल गेली हे दुकान कोणाचे ? खिमजीमामाचे. मग फोडा फोडा ओरड होऊ लागली. खिमजीमामा दारात उभे राहिले. हात जोडून म्हणाले,

'बाबांनो, उद्या मी स्वस्त भावात ज्वारी नक्की विकीन. कृपा करून माझे दुकान लुटू नका.' जमावातील चार-दोन माणसांचा विवेक कायम होता. खिमजीमामांच्या शब्दावर विश्वास ठेवायला जमाव तयार झाला. फारसे नुकसान न करता जमाव पुढे निघाला. खिमजीमामांनी मनातल्या मनात परमेश्वराचे शंभरदा आभार मानले. इतक्यात बातमी आली—जमनादास

बन्सीलाल यांचे दुकान फोडण्यात आले आणि लुटले जात आहे. आवाज वाढू लागला. फोडा, लूटा. फुटले, उघडले, घ्या, लूटा. जे मिळेल ते सारे. सुपारी, हळद, साबण, उदबत्या, गुळाच्या भेल्या, खोबऱ्याच्या वाट्या, धान्य, जे मिळेल ते. तिजोरीवरचा तो ट्रँन्झिस्टर, त्या चिल्लर नाण्यांच्या थैल्या. घ्या. सारे आपलेच आहे. हे बिराळे साहेब. घाटंजी पोलीस-स्टेशनचे प्रमुख. पोलीस खात्याला शोभून न दिसणारा शांत स्वभाव असलेला हा मृदु अधिकारी. पण अनावर जमावामध्ये बिनदिक्कतपणे एकटा घुसला. हा अधिकारी स्वतःच्या जीवावर उदार होऊन जमावात घुसला नसता तर कदाचित हे आणि त्यामुळे इतर आजूबाजूची दुकानेही आगीच्या भक्षस्थानी पडली असती. बिराळेंच्या या असामान्य धैर्याचे कौतुक व्हायला हवे. दुसरे दुकान झाले. आता तिसरे. विठ्ठलभाई गढिया. भर वस्तीत ल मोठयाचे दुकान. दुकानदाराचे चिरजीव मगनभाई अत्यंत ढोळसपणे वागले. दुकानावर चालून येत असलेल्या अनावर जमावाला त्यांनी सांगितल. 'थांबा, नासधूस करू नका, मी दुकान उघडतो, लाईट लावतो, तुम्ही काय पाहिजे ते न्या.' आणि खरोखरच त्यांनी दुकान उघडले. लाईट लावले मग काय हवे आणखी? जो येई तो हाताला लागेल ते नेऊ लागला. दहा मिनिटे झाली, पंधरा झाली, वीस झाली. इतक्यात कोणीतरी ओरडत आले. 'पोलीस आले' आणि खरोखरच भराभर पोलीस आले. म्हणजे आता पोलिसांची ताजी कुमक आली होती. आता पोलीसांनी दंडा हातात घेतला. घाटंजीच्या जमावाने थोडया वेळापूर्वी दगडविटा भिरकावून त्यांना पळवले होते. आता नवीन कुमक आल्यामुळे पोलिसांची शक्ती वाढली होती. आता अक्षरशः पोलीस जमावावर तुटून पडले. पण आता जमाव होताच कुठे? एक दोन हवेतील बार ऐकू येतात न येतात आणि पोलीस येत आहेत अशी बातमी येते ना येते तोच सर्व लोक जीव घेऊन पळाले होते. जमावामुळे पाचच मिनिटांपूर्वी गजबजलेले रस्ते पार निर्मनुष्य झाले होते. आता घाटंजो एस. आर. पी. ने पुरी ताब्यात घेतली होती आता घाटंजीत राज्य होते फक्त एस. आर. पी. च्या जवानांचे. जो सापडेल त्याला एस्. आर. पी. ची लाठी प्रसाद देऊ लागली. अपराधी-निरपराधी, तरुण-वृद्ध, लहान-मोठा, अपंग, आंधळा वगैरे कोणत्याच गोष्टींचा विचार करण्याची आवश्यकता एस्. आर. पी. ला वाटली नाही. लूटमार करणारे गुंड या वेळपर्यंत पार दूर गेले होते. आणि निरपराधी जनता मात्र भरडली जात होती. किती लोकांनी या रात्री घाटंजीत बेदम मार खाल्ला याची गणतीच करता येणार नाही. हा दत्तू कोमटी केस पार पांढरे झाले आहेत याचे; पण रक्त ओकेस्तोवर याला मार खावा लागला. हे मोहनसिंग. गावचे पोलीस पाटील. घरासमोर सॅनिटरी इन्स्पेक्टर बावते ह्यांचेशी बोलत उभे होते तर

एस्. आर. पी. च्या लाठ्या बसल्याच यांच्या हातावर, पाठीवर हे वामनराव रोकडे. नाकासमोर पाहून चालणारा म्हणून प्रसिद्ध. पण त्यालाही प्रसाद मिळालाच. हे उत्तरवार पन्नाशी ओलांडली आहे त्यांनी पण पांडे कॉन्स्टेबलनी त्यांच्यावर होत असलेला लाठींचा वार स्वतःच्या अंगावर ढाली-प्रमाणे झेलला म्हणूनच तडाख्यातून सुटले. घाटंजीने असा मार दिल्याच्या गोष्टी आतापर्यंत फक्त ऐकलेल्याच होत्या. पण आता त्या घाटंजीला प्रथमच पहायला नव्हे अनुभवायला मिळाल्या. एस्. आर. पी ने घाटंजीचा सूड घेतला हेच खरे. घाटंजी घाबरली, पार हादरली.

त्या रात्री घाटंजी झोपली नाहीच. जखमांनी केवळ तळमळत राहिली. दुसऱ्या दिवशी धरपकडीस सुरुवात झाली. झालेला लुटमारीचा नेमका हिशोब नावनिशीवार दुकानदारांकडून पोलिसांना मिळाला. आणि पोलिसांनी झडत्यांचे सत्र सुरू केले. धरपकड सुरू झाली. वॉरंटे निघू लागली. पुष्कळसे लोक वॉरंट निघेल या भीतीनेच गाव सोडून पळून गेले. काही लोक केवळ भीतीपायी पळून गेले. गुजाबाई भोईणीच्या मुलाचे नाव पोलिसांच्या यादीत आहे असे कोणीतरी त्याला सांगितले. तेव्हापासून घावरून तो निघून गेला त्याचा अद्याप पत्ता नाही आणि गुजाबाईच्या डोळ्यांचे पाणी तेव्हापासून ठरत नाही. अजूनही एस्. आर. पी. चा घाटंजीवरील राग शमलेला नाही. पोलीस-स्टेशनात अद्यापिही लोकांना बोलाविले जात आहे, त्यांना दमदाटी केली जात आहे, यथेच्छ मारझोड होत आहे आज घाटंजी खरीखुरी अर्धमेली झाली आहे.

१ मे उगवला, वऱ्हाड बंदचे आयोजन या दिवशी केले होते, पण घाटंजीत कोणत्याही कामाचे त्राण उरले नव्हते. मोर्चा नाही, हरताळ नाही, सभा नाही.


# पांढऱ्या डागांवर मोफत इलाज

पांढऱ्या डागांवरील औषधाचा महत्त्वपूर्ण शोध. अनेक वर्षांच्या कठोर प्रयत्नानंतर आम्ही अनेक आडाखे बांधून पांढऱ्या डागांवरील औषधे तयार करण्यात यशस्वी झालो आहोत. एकदा औषध घेतल्यावर आपणांस त्याच्या गुणांची खात्री पटेल. ह्यापासून हजारो लोकांनी लाभ घेतलेला आहे. आजही बरेचजण याचा लाभ घेत आहेत. प्रचारार्थ औषधाची एक बाटली नमुना म्हणून दिली जाते. पांढऱ्या डागांपासून मुक्त झाल्यावर आपल्यासारख्याच या रोगाने पछाडलेल्या रोग्यांना औषध घेऊन रोगापासून मुक्त होण्यासाठी अवश्य सांगा.

**प्रेम ट्रेडिंग कंपनी (S. N.) M. पो. कतरी सराय (गया)**

काही नाही. सर्व व्यवहार अगदी नेहेमी-प्रमाणे. एस. आर. पी ने घाटंजीला अद्दल घडविली. वर्ष सहा महिने तरी घाटंजी या धक्क्यातून वर येईल असे वाटत नाही.

मलूल मेलेल्या चेहेऱ्याने आज घाटंजी आपले दैनंदीन व्यवहार करीत आहे. १ मे च्या मंगळवारच्या बाजारात जनतेला १–२० भावाने ज्वारी मिळालीही. अशीच तिची गरज भागविली गेली तर तिची जखम भरून यायला मदत होईलही. पण एक प्रश्न मनात येतो, का झाले हे सारे ? कोणाची चूक आहे ही ? भाषण ऐकण्यासाठी जमलेल्या खेड्यापाड्यांतील भोळ्या-भाबड्या अशिक्षित जनतेची, जनतेच्या नेत्यांची, भाषणाकरिता येऊ न शकलेल्या जांबुवंतरावांची, की त्यांना मधेच अटक करणाऱ्या सरकारची ? ज्या निरपराध व्यापाऱ्यांची दुकाने या गडबडीत लुटली गेली त्यांचा तरी यात काय दोष ?

आपली राज्यघटना सांगते, ' भारत हे एक लोक कल्याणकारी राज्य आहे. मग कल्याण कोणाचे साधावयाचे ? जनतेचे, मंत्र्यांचे, सरकारचे, एस. आर. पी. चे, व्यापाऱ्यांचे की लुटालुट करणाऱ्यांचे ? कोणाचे ?'

' जनतेचे कल्याण ' हे आमचे ब्रीद-वाक्य आहे असे सांगणाऱ्या सरकारला आपल्या जनतेची दोन वेळची भूक जर भागवता येत नसेल तर कल्याणकारी राज्याचा वारंवार उद्घोष करणे तरी बंद व्हावयास हवे. जनतेने शासनाला ६०–६५ पैसे किलो भावाने विकलेली ज्वारी जर त्याच जनतेला दुप्पट भावाने विकत घ्यावी लागत असेल तर हा शासनाचा सरळ सरळ पराभव आहे, असा निष्कर्ष जर जनतेने काढला तर सरकारच्या नाकाला मिरच्या झोंबा-वयास नकोत. गडबड, जाळपोळ, लुटालूट केली तरच आपल्याकडे सरकारचे लक्ष वेधते व नंतरच आपले प्रश्न सोडविले जातात असा जर सरकारच्या धोरणाबद्दल जनतेचा ग्रह झाला असेल तर त्यात दोष कोणाचा ? गावात भरपूर धान्य असते ते नेमके कोठे असते हेही माहीत असते; पण पैसे देऊनही ते मिळत नाही. अशा वेळेस जर जनतेने वाममार्गाचा अवलंब करून आपली भूक भागविण्याचा प्रयत्न केला तर त्याची जबाबदारी कोणावर राहील आणि त्यात दोषी कोणाला धरावयाचं ?

आणि स्वार्थी हेतुने समाज कंटकांनी आणि गुंडांनी केलेल्या एखाद्या समाज विघातक कृत्यांच्या जबाबदारीला कारणीभूत कोण आहे वगैरे गोष्टींची शहानिशा न करताच संपूर्ण जबाबदारी जनतेवर टाकून, संपूर्ण जनतेला त्याबद्दल दोषी धरून, त्या निरपराध जनतेचा प्रतिशोध घेण्याचा, बदला घेण्याचा प्रयत्न करणे लोककल्याणकारी राज्याच्या घटनेत बसते काय ?


मार खावून खावून अर्धमेली झालेली घाटंजीची जनता उत्तरे मागत आहे या प्रश्नांची.

□ □ □

मुंबई जेव्हा 'बेस्ट' कर्मचाऱ्यांच्या बेमुदत संपाच्या विळख्यात सापडली होती; तेव्हाची गोष्ट! 'बेस्ट' बस आणि लोकल-रेल्वे ह्या तर मुंबापुरीतील नागरी व औद्योगिक जीवनाच्या रक्तवाहिन्या! लोकांना लोकल रेल्वेमधून कसेबसे उभे राहून कामाला जाता येई, तेही या काळात सहज शक्य होईना. कसं व्हावं? नित्य बसने कामाला जाणायेणारा वर्ग देखील लोकल गाड्या-

जमतेम अर्ध अंग झाकणारं फटकुरं काय ते तिच्या अंगावर होतं. त्या फूटपाथवर बहुधा कुणी निराश्रित राहात नसत. तिथून एका हाकेच्या अंतरावर पोलीस-चौकी होती आणि कडेला कुंपणाच्या आत खेळाचं मैदान होतं. यामुळं म्हणा किंवा अन्य काही कारणामुळं म्हणा सर्वव्यापी निराश्रितांपासून तो फूटपाथ मुक्त होता.

अशात ही जरठ म्हतारी इथं कशी



कडेच धाव घेत होता. आल्या दिवसाला कसंबसं तोंड द्यायचं एवढंच एक ध्येय प्रत्येकापुढं होतं... सर्वसामान्य नागरिकांच्या जीवनातील दुष्करता अशावेळी वाढणारच; त्याला काय इलाज?...

सुधाकर नेहमीप्रमाणं एका सकाळी ऑफिसला जायला निघाला. रस्त्यावर त्याला फुटपाथवर एकाकी म्हातारी पडून असलेली दिसली. अक्षरशः जमिनीवरच झोपलेली होती तो!

अन् कुठून आली? तिला इथं कोण टाकून गेलं असेल?... ही कदाचित् आजारीही असेल! एक ना दोन प्रश्न आणि विचार एका क्षणात सुधाकरच्या मनात येऊन गेले. ऑफिसला जाणारे त्याच्यासारखे अनेक स्त्री-पुरुष लोकल-गाडी पकडण्याच्या घाईत एखादा दृष्टीक्षेप त्या म्हातारीकडं करून पुढं निघून जात. सुधाकर त्या वृद्धेपाशी क्षणभर घोटाळला आणि आपली गाडी

चुकण्याच्या भीतिनं पुढं निघून गेला.

दुसऱ्या दिवशी सकाळी पुनः तिथून जाताना सुधाकरला ती म्हातारी त्याच ठिकाणी पण एका कुशीवर पडून असलेली दिसली. ते पाहून त्याचं मन कळवळलं. त्यानं थांबून तिला दोन-तीन हाका मारल्या. ती कोण ? कुठून तिथं आली ? तिचं इथं कुणीच नाही काय ? असे काही प्रश्न त्यानं तिला विचारले. त्या म्हातारीनं डोळे किलकिले करून त्या म्हातारीपाशी टाकलेलं नाणं मात्र दिसलं नाही. झिम् झिम् पाऊस सुरू झाला होता. तिला उचलन टॅक्सीत घालावं आणि चेंबूर अथवा महालक्ष्मी येथील "बेगर्स होम"मध्ये नेऊन दाखल करावं, असा विचार सुधाकरच्या मनात आला पण दुसऱ्याच क्षणी त्याला आपली चूक लक्षात आली. टॅक्सी कशी मिळणार ?... "बेस्ट' कर्मचाऱ्यांशी आपली सहानुभूति व्यक्त करण्यासाठी

# महानगर आणि म्हातारी

इंद्रसेन डोंगरे

निमिषमात्र त्याच्याकडं पाहिलं. तेव्हा त्याला थोडी आशा वाटली. परंतु ती काही बोलली नाही ! आपला क्षीण हात उचलून तिनं आपल्या तोंडावरील माशा हाकलण्याचा प्रयत्न केला. जेव्हा त्याच्या एकाही प्रश्नाला तिनं उत्तर दिले नाही. तेव्हा तो तिच्या पुढ्यात पंचवीस पैशाचं नाणं टाकून नाईलाजानं पुढं निघून गेला.

संध्याकाळी घरी परततांना त्याला बॉम्बे टॅक्सीमेन युनियनने देखील संप चालू केला होता ! त्यानं आजच वर्तमानपत्रात एक बातमी वाचली होती की प्रसूतिगृहाला जाण्यासाठी कसलंच वाहन न मिळू शकल्यामुळं एका गर्भार स्त्रीला घरात अडून मृत्यु आला होता ! ! ती आठवल्यावर सुधाकरला आजच्या इतक असहाय पूर्वी कधीच वाटलं नव्हतं.

अशा निराश मनःस्थितीतच त्याच्या

मनात एकांत कल्पनेचा एक काजवा चमकून गेला. त्यासरशी तो त्वरीत पोलीस चौकीकडे गेला. चौकीत जाऊन थेट डयूटीवरील पोलीस सब-इन्स्पेक्टला भेटला. क्रीडांगणापाशी पडलेल्या त्या असहाय, निराश्रित म्हातारीबद्दल त्याला सांगून त्यानं तिला दवाखान्यात ·किंवा एखाद्या बेगर्सहोममध्ये नेण्यासाठी पोलीस व्हॅन किंवा जीप मिळेल काय म्हणून विचारणा केली. ह्याचं सारं ऐकून घेतल्यावर त्या पोलीस अधिकाऱ्यानं त्याच्याकडं अशा काही अविर्भावात पाहिलं की तो वेडा नाहीतर खुळा तर नाही ना! "तुम्ही मुंबईत किती दिवस आहात", "कुठं राहता" वगैरे काही प्रश्न विचारल्यावर त्याला जवळ जवळ एक "लेक्चर" सुनावलं. आपला वेळ "बर्बाद" केल्याबद्दल कानउघडणीही केली

पोलीस-चौकीतून बाहेर पडतांना ज्याप्रमाणं त्याच्या मनात निराशेचा घनांधःकार माजला होता. तसाच बाहेर चराचराला व्यापून टाकणारा अंधार सर्वत्र पसरला होता! संपकाळात अखंडपणे तेवत असलेल्या रस्त्यावरील बत्त्यांच्या अधिकच फाकलेल्या प्रकाशात ती म्हातारी आता त्याला दुरूनही दिसत होती! पावसाची भुरभुर चालूच होती. जड पावलांनी तो म्हातारीच्या अंगावरून आपल्या घरी निघाला; पण आपल्या हातातील उघडलेली छत्री घेऊन त्याला पुढं जाववेना त्यानं ती छत्री त्या म्हातारीवर अलगद ठेवली. त्यामुळं निदान पावसापासून तरी तिचा बचाव होईल! या समाधानात सुख मानून तो घरी निघून गेला.

त्या रात्री त्याला निःशब्दपणे जेवताना पाहून शांतानं विचारलं, "आज असे गप्प-गप्प का?" कारण रोज सहसा जेवता जेवता त्याची दिवसभरातील घटनांवर काही ना काही मल्लीनाथी चालू असायची.... शांताला—त्याच्या पत्नीला—ती ऐकायची जणू सवयच झाली होती.

"तसं काही नाही!" सुधाकर तुटकपणे म्हणाला. तेव्हा शांताला त्यानं म्हातारीबद्दल सांगितलेली हकीगत आठवली. त्याला तिच्याबद्दल किती खंत वाटत होती हेही तिला आठवलं. तशी तिनं प्रश्न केला,

"आजसुद्धा ती म्हातारी तशीच पडून आहे का तिथं?"

आपल्या पत्नीलाही त्या म्हातारीबद्दल हुरहूर लागलेली पाहून सुधाकरला मनातून जरा बरं वाटलं. जेवण आटोपून त्यानं तिला त्या संध्याकाळची सांद्यंत हकीगत सांगितली. या विषयावर दोघं बराच वेळ बोलत राहिले. बोलताना सुधाकरला एक कल्पना सुचली,

"त्या म्हातारीला आपल्या इथं आणलं तर...?"

"आपल्या इथं?—घरात?" शांतानं त्याचा प्रश्न पूर्ण होतो नाही तोच गोंधळून विचारलं.

"इथं म्हणजे आपल्या या बिल्डिंगच्या तळमजल्यावरच्या जिन्याखाली—जिथं गडी अन् चौकीदार वगैरे लोक

दुपारच्या वेळी विश्रांती घेतात ना तिथं!"

"कल्पना वाईट नाही!..." शांता विचारमग्न होत म्हणाली, "पण समजा ती बाई अचानक मेली; तिचा एखादा खरा-खोटा नातेवाईक उपटला अन् त्यानं तिच्या मृत्युबद्दल आपल्यावर काही कुभांड रचलंबिचलं तर?"... शांतानं उपस्थित केलेली शंका सुधाकरलाही पटली.

शनिवारी सकाळी देखील म्हातारी निपचीत पडून होती. फक्त यावेळी तिच्या आसपास बरीच नाणी पडलेली दिसत होती. शिवाय, उशालगत एका केळीच्या पानावर वरणभात वाढून ठेवलेला होता. आणि एका प्लॅस्टिकच्या प्यालयात पाणी. मात्र सुधाकरनं आदल्या रात्री उघडून म्हातारीवर ठेवलेली छत्री तिथून अदृश्य झालेली होती....त्या दिवशी दुपारी अर्ध्या दिवसाचं ऑफिस संपवून घरी परतताना सुधाकरला म्हातारीच्या आसपास लोकांनी टाकलेली नाणी दिसली नाहीत! केळीच्या पानावर वाढलेलं जेवण देखील तिथं नव्हतं. पानावर घोंगावणाऱ्या माशा तेवढ्या होत्या. ते पाहून अनेक प्रश्नांनी सुधाकरच्या मनात डोके वर काढले. कुणी नेले असतील इथले सारे पैसे? ज्यांनी छत्री नेली त्यांनीच?...हिला तर स्वतःच्या हातानं अन्न खाण्याचीही शक्ती नाही! मग केळीच्या पानावर वाढलेला वरणभात कुणी खाल्ला? का या म्हातारीचंच कुणी आलं नसेल ना? तिचं इथं कुणी असेल तर त्याचं हीच्याकडं असं दुर्लक्ष का?...ही वृद्धा इथं अशी किती काळ पडून राहाणार? यातील एकाही प्रश्नाचं उत्तर त्याच्यापाशी नव्हतं किंवा ते मिळण्याची सुतराम शक्यता नव्हती....

रविवारी सकाळी शांता आणि सुधाकर उपासनामंदिरात जायला निघाले. ते जरा लवकरच बाहेर पडले. शांताला त्या म्हातारीला जाता जाता बघायचं होतं. नाहीतरी तिच्यामुळं गेले दोन-तीन दिवसात त्या दोघांना बरेच मानसिक क्लेश व चिंता सहन करावी लागली होती....परंतु हाय! शांताची म्हातारीला पाह्यची इच्छा कधीच पूर्ण व्हायची नव्हती. म्हातारीचं अचेत कलेवर फूटपाथवर आत्ताही पडून होतं. मृत्यूनंतर त्याला खरं महत्त्व प्राप्त झालं होतं. बेवारशी प्रेत म्हणून पोलीस रीतसर पंचनामा करीत होते. एवढंच नव्हे, तर त्या विभागातील विरोधी पक्षाच्या आमदाराने तिच्या 'केस'-मध्ये विशेष लक्ष घातलेलं होतं आणि तो पंचनाम्याच्या वेळी जातीनं हजर होता. साहजिकच तिथं गर्दीही बरीच जमली होती!...

शांता आणि सुधाकर सुन्न मनानं प्रार्थना-पोथीला निघून गेले. गच्च भरलेल्या उपासना मंदिरात पालकांनी (पास्टरनी) "तुम्ही गरीबांतील एकाला केले तर ते मला केले" या प्रभू येशू ख्रिस्ताच्या प्रसिद्ध वाक्यावर जोरदार प्रवचन केलं. उपासना समाप्त झाल्यावर सर्व लोक पालकांशी आणि

परस्परांशी हस्तांदोलन करून हळूहळू बाहेर पडले; आपापल्या मार्गानं निघून गेले.

दुसऱ्या दिवशी विधानसभेत विरोधी पक्षाच्या त्या आमदारानं म्हातारीच्या मृत्यूबाबत जोराचा आवाज उठविला. तिचा मृत्यू म्हणजे 'भूकबळी 'च होता. असं त्यांनी ठासून प्रतिपादन केलं. तेव्हा विधानसभेत बरीच खळबळ माजली, कल्याणकारी राज्यात भर राजधानीत हे कसं घडावं, याबद्दल बरीच चर्चा झाली...नतर स्थानिक वर्तमानपत्रांनी 'महाराष्ट्राच्या राजधानीत भूकबळी' म्हणून बराच गलगा केला! परंतु लांबत चाललेल्या 'बेस्ट' व महापालिका नोकरांच्या संपामुळे तो गलगा दोन दिवसात शांत झाला! -इतर प्रश्नात बुडून गेला!!... ◻ ◻ ◻

---

## वसई तालुका – आदर्श शा. मा. : पृष्ठ २७ वरून

आदर्श शिक्षकाच्या यादीमध्ये त्यांचेही नाव आहे. आता प्राथमिक शाळा प्रमाणपत्र परिक्षेत विद्यार्थी नापास होतात हा काही मुख्याध्यापकांचा दोष नाही. आदर्श शिक्षक म्हणून आपला गौरव व्हावा या खटपटीत व गावातील भानगडीत लक्ष घालण्यासाठी त्यांना वेळ पुरत नाही. मग ते शिकवणार कधी? जरूर पडल्यास विद्यार्थ्यांनी अभ्यास करावा व पास व्हावे. ते नापास होतात हा काही मुख्याध्यापकांचा दोष नाही. तर अशा शिक्षकांना हाताशी धरून स्थानिक राजकारण खेळणाऱ्या वरच्या पुढाऱ्यांचा हा दोष!

वसई तालुक्याच्या जंगलपट्टी भागातील शिरवली हे गाव आदर्श समजले जाते. आदर्श शिक्षक म्हणून या गावच्या मुख्याध्यापकांचाही गौरव झालेला आहे, परंतु या शाळेचा मराठी प्राथमिक प्रमाणपत्र परिक्षेचा निकाल कधीच समाधानकारक लागलेला नाही.

विद्यार्थ्यांना शिकविण्यापेक्षा स्थानिक राजकारणात लुडबुड करणाऱ्या शिक्षकांमुळे वसई तालुक्यातील प्राथमिक शिक्षणाबाबत सावळा गोंधळ चालला आहे तेव्हा शिक्षण खाते जिल्हा परिषदेकडून काढून घेऊन सरकारने हाती घ्यावे हाच यावर एकमेव उपाय आहे.

◻ ◻ ◻



# बंडवाले नानासाहेब

## छोटे तरी महत्त्वाचे

का. धों. देशपांडे




कऱ्हाडचे समाजभूषण श्री. पु. पां. उर्फ बाबूरावजी गोखले यांचे ' बंडवाले नानासाहेब ' हे पुस्तक छोटे असले तरी महत्त्वाचे आहे. १५ ऑगस्ट १९७२ म्हणजे भारतीय स्वातंत्र्याचा रजत महोत्सवी दिन होय. व त्याच दिवशी हे पुस्तक प्रसिद्ध करून श्री. बाबरावजींनी ही अत्यंत उचित व मंगल अशी भेट समाजाला दिली आहे.

दुसरे महत्त्व असे की १८५७ च्या पहिल्या भारतीय स्वातंत्र्ययुद्धाच्या या प्रणेत्याचे एकही मराठी चरित्र आजपर्यंत उपलब्ध नव्हते. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी देखील आपल्या जगप्रसिद्ध ' अठराशे सत्तावनच्या स्वातंत्र्यसमरात ' 'श्रीमंत नानासाहेबांच्या आयुष्याची सविस्तर माहिती प्रसिद्ध होण्याची सुसंधी महाराष्ट्राच्या इतिहासाच्या नशिबात असेल काय ?' अशी पृच्छा केली आहे. अर्थात त्याला हे पुस्तक म्हणजे संपूर्ण समाधानकारक उत्तर नव्हे पण त्या दिशेने टाकलेले हे महत्त्वाचे पाऊल आहे.

श्रीमंत नानासाहेबांनी हा जो उठाव घडवून आणला तो केवळ आपल्या वतनवाडीपुरता असा संकुचित दृष्टीचा होता असे एक प्रतिपादन आहे, तर तो भारतीय राष्ट्रवादाचा ज्वलंत हुंकार होता अशी दुसरी बाजू अतिशय त्वेषाने मांडण्यात येते. नानासाहेबांचे पेन्शन बंद करून त्यांच्या मनात असलेल्या परकी सत्ताविषयक द्वेषाला इंग्रजांनी तात्कालीक कारण पुरवले असे मला वाटते. राष्ट्रविषयक कल्पना आज जेवढी टोकदार आहे तेवढी त्या काली नव्हती तरी पण या पुस्तकातील पान ३५ वरील पेशव्यांचा जो जाहीरनामा दिला आहे यावरून या भावनेच्या खूपच जवळ श्रीमंत नाना गेले होते हे सिद्ध होते. उदाहरणार्थ जाहीरनाम्यातील हा उल्लेख पहा '...तेव्हा ज्या कोणाला काही कर्तृत्व करावेसे

वाटत असेल, त्यांनी आपल्या लोकांची संघटना करून या (इंग्रज) लोकांना परलोकवादी केले पाहिजे.'

### नवी मनोरंजक माहिती

'या पुस्तकातील बरीच माहिती नाविन्यपूर्ण व इतिहासाच्या दृष्टीने मनोरंजक वाटेल. नानासाहेबांच्या उपनयनाची निमंत्रणपत्रिका, बाजीरावाचे इच्छापत्र, नानांच्या आर्थिक व्यवहाराचा पान १९ वरील उल्लेख, कानपूरच्या उठावात अजीजन या वेश्येने केलेली मदत व ही मदत अशी तशी नव्हे तर तिने स्त्रियांची एक तुकडीच उठाववाल्यांच्या मदतीला दिली होती. श्रीमंतांच्या राज्यारोहणानंतर राज्याची लावलेली त्यांनी नवी व्यवस्था असे कितीतरी तपशील चटकन लक्ष वेधून घेतात. हिंदू-मुसलमानांची अभूतपूर्व अशी एकी या स्वातंत्र्यसमरात झाली होती त्याबद्दलचे हृद्य असे कितीतरी प्रसंग येथे दिसतात.

श्रीमंत नानासाहेबांच्या संदर्भात स्वातंत्र्यसमराचा वृत्तांत अतिशय प्रभावी शब्दात दिल्यानंतर नानासाहेबांचा व त्यांच्या अंतानंतर पेशवाईचा नेपाळातील वृत्तांत दिला आहे. हे या पुस्तकाचे खास वैशिष्ठ्य म्हणावे लागेल. नानासाहेबांचा शेवट २३ ऑक्टोबर १८५९ रोजी नेपाळात झाल्यावर नानांच्या मातुश्री, पत्नी, भावजय, सूना इत्यादी महिला नेपाळातच राहिल्या. त्यांना त्यावेळचे नेपाळचे अधिपती महाराजा जंगबहादूर यांनी जबाबदारी पत्करूनही कसा आश्रय दिला, त्यांच्या राहण्याची व्यवस्था, दिनचर्या वगैरे हकीगत मन वेधून घेते.

नानाचा मृत्यू हे तात्कालीन गूढ होते. त्यांच्या अस्तित्वासंबधी निरनिराळ्या समजुती कशा होत्या, नानासाहेबांचे निरनिराळे तोतये कसे निर्माण झाले हा वृत्तांत वाचण्यासारखा आहे. विशेषतः जमनादासासारखे तोतये केवळ नानांच्या सुरक्षिततेसाठी व त्यांनी आपले अपुरे कार्य पुरे करावे, तशी त्यांनी संधी मिळावी म्हणून फाशी गेले हा निष्कर्ष अंतःकरणाला चटका लावणारा त्याचप्रमाणे नानांची जनमानसातील प्रतिमा व्यक्त करणारा आहे.

या सबंध पुस्तकाची भाषा अतिशय प्रभावी व ओजस्वी अशी आहे हे येथे आवर्जून सांगावयास हवे. काही ठिकाणी तर स्वातंत्र्यवीरांच्या स्वातंत्र्यसमराचीच आठवण होते. इतिहास हा तटस्थवृत्तीने लिहावा अशी एक प्राध्यापकी फॅशन हल्ली रूढ होत चालली आहे. आपल्या इतिहासातील अत्यंत स्फूर्तीप्रद प्रसंग हे जर तशाच पद्धतीने लिहिले तर लगेच तो इतिहासकार पक्षपाती, विकृत वगैरे होतो असे या लोकांना वाटते. या वृत्तीतून लिहिलेले इतिहास हे अत्यंत रुक्ष होतात असा अनुभव आहे. तसे काही या पुस्तकाच्या बाबतीत झाले नाही ही अभिनंदनाची गोष्ट आहे.

पुस्तकाच्या लहान स्वरूपामुळे अपूर्णतेची मात्र सारखी जाणीव होती. तसेच मजकूर अनेक लहान लहान प्रकरणात विभागल्यामुळे सलगतेत एक प्रकारचा

व्यत्यय आल्यासारखे वाटते. मात्र तीर्थक्षेत्रे रक्तक्षेत्रे झाली अशासारखी त्यांची शीर्षके चटकन लक्ष वेधून घेतात.

हे पुस्तक वाचल्यावर एक महत्त्वाची उणीव दूर झाली असे वाटले तरी अजूनही पुष्कळ लिहिता येण्यासारखे आहे हेही पण लक्षात येते. श्रीमान बाबूरावजींनीच ते काम करावे असे नम्रपणे सुचवावेसे वाटते ¤

' बंडवाले नानासाहेब '
पुरुषोत्तम पांडुरंग गोखले.
इंद्रायणी साहित्य प्रकाशन, पुणे ३०.
पृष्ठे–८० किंमत– २–५० रुपये.

# संस्कारांचे महत्त्व ठसविणारी– ज्ञानदीक्षा

वा. भा. जोशी

केवळ मूलभूत गरजा भागल्या म्हणजे माणूस सुखी होईल ही समजूत चुकीची आहे. माणसाचे वैशिष्ठ्य केवळ शरीरात नसून ते त्याच्या प्रगत मनावर व विचारावर अवलंबून आहे. मनाचा विकास हा संस्कारावर अवलंबून असतो. संस्कारशून्यतेमुळे आज युवाशक्ती दुर्बल, विकृत आणि निव्वळ पशुत्वाचा अविष्कार करणारी झाली आहे. होत आहे. राष्ट्रातील तरुण-तरुणी

युवास्यात् साधु युवाध्यायकः
आशिष्ठो द्रढिष्ठो बलिष्ठः ।

असे असतील तर त्या राष्ट्राचे तारुण्य निर्दोष नि अबाधित राहील. ह्या भूमिकेवरून किंजवडेकरशास्त्री यांनी मोठ्या तळमळीने व्रतबंधसंस्काराचे महत्त्व शास्त्रीय पण सामाजिक प्रबोधनाचे दृष्टीकोनातून विशद केलेले आहे.

## उपनयन–एक राष्ट्रीय संस्कार !

संचयपर्व, उपनयन, मुलींचेही उपनयन आणि वयोमर्यादा, यज्ञोपवीत आणि ज्ञानदीक्षेचा संस्कार कसा करावा ? ह्या सहा प्रकरणांतून शास्त्रीबुवांनी उपनयन संस्काराची चिकित्सा करून महत्व पटवून देण्याची अगदी शिकस्त केली आहे.

अर्थात हे भाष्य करताना शास्त्रीबोवांनी डोळसपणे आपल्या अवतीभोवती पसरलेल्या विद्यमान सामाजिक परिस्थितीचेही मार्मिकपणे अवलोकन करून काही कोपरखळ्याही मारल्या आहेत ! फार काय मधून मधून प्रवचनकारही येथे डोकावताना दिसतो तर विविध उदाहरणांतून लेखकाचा बहुश्रुतपणाही वाचकास अधिक काही सांगून जातो.

महर्षी आश्वलायनांनी सांगितलेली ४८ उपनयनसूत्रे उद्धृत करून उपनयन प्रयोगही मुळातूनच दिलेला आहे. (पृ. ७७-८३) उपनयन संस्कारात आज शिरलेली अनावश्यक आडंबरे मात्र काढून टाकलीच पाहिजेत, हे आवर्जून सांगून प्रस्तुत संस्कार हा सोळा संस्कारात अधिक महत्त्वाचा, असे प्रतिपादन केले आहे.

उपनयनाचा काल, त्याची वयो-

मर्यादा, त्याची उद्दिष्टे आणि शैक्षणिक उद्दिष्टाला अनुसरून सर्वांना उपनयनाचा अधिकार कसा आहे, हे सांगून शास्त्रीबोवांनी यज्ञोपवीताचा अर्थ आणि त्याबद्दल असलेले समज गैरसमज यांचा उद्बोधक परामर्श घेतला आहे.

जानवे घालतानाचा आज प्रचलीत असलेला मंत्र कसा हास्यास्पद आहे, हे मुळातूनच वाचावयास हवे. (५७) 'कर्पूर गौरं करूणावतारं' हा मंत्र म्हणून आरतीपूर्वी कापूर पेटवणे, हे जसे (तो मंत्र व कापूर या बाबतीत) हास्यास्पद तसाच हा प्रकार !

## पाल्हाळ आणि विषयांतर !

ऋग्वेद आणि विविध ग्रंथातील भरपूर सूत्रांचा आधार घेऊन लेखकाने उपनयन संस्काराची चर्चा केली असली तरी कित्येकदा विवेचनातील पाल्हाळ जाणवल्यावाचून राहात नाही. आधुनिकतेवर जाता जाता शेरेबाजी करण्याचीही आपली हौस शास्त्रीबोवांनी पुरवून घेतलेली दिसते. पण त्यामुळे मूळच्या मुद्यापासून दूर जावयास होते, त्याचे काय ?

'मुलींचे उपनयन' हे प्रकरण ह्या दृष्टीने पहाण्यासारखे आहे. वेदकाली स्त्रिया वेदाध्ययनापासून तो यज्ञयागादी श्रौतस्मार्त कर्मे करीत असत. स्त्री पुरुषाप्रमाणेच स्वसंरक्षणक्षम नि अकुतोभय असे. हे सांगून शास्त्रीबुवा लिहितात, 'स्त्री दाक्षिण्याच्या नावाखाली स्त्रीत्वाचे सर्व फायदे मात्र व्यवस्थित पदरात पाडून घ्यावयाचे आणि वर पुन्हा समान हक्काची भाषा बोलावयाची असला सुशिक्षित ढोंगीपणा तरी त्यावेळच्या स्त्रिया करीत नसत. आज सरकारी कचेऱ्यांतून बऱ्याच मुली काम करण्यासाठी नेमल्या जातात. करू देत बिचाऱ्या काम. पण त्या केवळ काम एके काम करीत नाहीत. कादंबरीवाचन, सिनेमातील नट नटयांच्या नसलेल्या गोत्रप्रवरांची गंभीर विचिकित्सा, कोणत्या उपाहारगृहात कोणता पदार्थ चांगला मिळतो याची रसपूर्ण चर्चा इ. इ. महत्त्वाची अनेक कामे त्यांना असतात. नम्र विनती ही की अशी महत्त्वाची कामे उरकत असतानाच त्यातूनही थोडा वेळ काढून वेदकालीन स्त्रियांच्या जीवनाचा त्यांनी थोडासा परिचय करून घ्यावा असे काही त्या करतील तर, तर मग काम न करता घेत असलेल्या पगाराबाबतही आम्ही काहीसुद्धा म्हणणार नाही.' (३६)

उपनयनाच्या शास्त्रीय चिकित्सेला असला फालतूक खमंगपणा आणताना मूळ विषयाचे गांभीर्य ढळते, हे भान लेखकाने ठेवावयास हवे हं ते. महत्त्वाचा नवा विचार किंवा संस्काराचे महत्त्व ठसविताना 'होमीपाथीच्या' गोळीसारखी भूमिकाच रास्त ! कडू पण हितकर औषधाला साखरेचे वेष्टन असेल तरच सर्व सामान्यांस त्याचे आकर्षण वाटणार. न पेक्षा——

——पण शास्त्रीबोवांना हे आम्ही सांगावे, असे नव्हे ! ◻

ज्ञानदीक्षा
ले. श्रीपादशास्त्री किंजवडेकर
सोमाणी स्मारक ज्ञानट्रस्ट,
२१५ शिवडी, मुंबई,
पृ. १०२ कि. रु. ६

## मुलाखती

पृष्ठ १४ वरून

यन कमिटीचे सभासद बिनविरोध नेमले व निवडले जातात. जनरल बॉडीच्या सभेत सध्याचे कमिटीचे सभासद एखाद्या नव्या सभासदाप्रमाणे जनरल बॉडीसमोर हजर होतात. कामगारांना सांगितले जाते की हेच नव्या कमिटीचे सभासद व त्यांचे प्रतिनिधी होत. कोणाची काही हरकत आहे का? हरकत अर्थातच कोणी घेत नाही. हजर असलेले कामगार 'मंजूर आहे' असे ओरडतात. ज्यांना स्वतःच्या हक्काबद्दल काही जाणीव नाही व ज्यांना नेत्यांनी पूर्णपणे अंधारात ठेवलेले असते ते त्यांना हवे तसे मत देऊ शकत नाहीत. ट्रेड युनियनला मान्यता देण्यासाठी गुप्त मतदान पद्धत त्यात नाही. म्हणून 'काळया कायद्याला' विरोध करणारे नेते अशा प्रकारे निवडून गेलेले असतात! असे काळे कायदे नष्ट होण्यासाठी खऱ्याअर्थी क्रांतिकारक, जहालपणा असलेली संघटना योग्य प्रकारे निर्माण करणे हाच उपाय आहे. 'मंजूर आहे!' अशा धर्तीच्या संघटना नकोत.

वरील आशय थोडक्या शब्दात मांडायचा झाला तर असे म्हणता येईल की कामगार वर्गाच्या चळवळीस नोकरशाही, अधिकारशाही व इतर अनेक दुर्गुणांची कीड लागली आहे. कामगार हा त्याच्या मध्यमवर्गीय पुढाऱ्यांपेक्षा अधिक लढाऊ कृती करणारा असतो. प्रतिगाम्यांचा समूळ नाश करण्यासाठी सर्वांना लाल झेंड्याखाली एकत्र आणू पाहणारी खऱ्या अर्थी क्रांतिकारक अशी एकही चळवळ सध्या अस्तित्वात नाही.

### कामगार क्रांतिकारक नाहीच?

आतापर्यंत आपण सध्याच्या पक्ष व संघटनाचे दोष पाहिले पण ह्या पैकी बऱ्याच दोषांची मुळे खुद्द भांडवलशाहीच्या वाढीतच सामावली आहेत. स्वातंत्र्यानंतर भांडवलशाही अधिक वेगाने वाढू लागली आणि आता तर भारतभर पसरली आहे. सरकारी क्षेत्राच्या (पब्लिक सेक्टर) वाढी बरोबर तिला अधिकाधिक स्थैर्य प्राप्त झाले आहे खाजगी क्षेत्र सरकारी क्षेत्राच्या वृक्षावरील बांडगुळाप्रमाणे आहे. थोडी फार जाणीव असलेल्या खाजगी क्षेत्रातील संघटित कामगारांना सरकारी क्षेत्रात गेल्यावर त्यांच्या विकासाबरोबरच अधिक लाभ मिळू लागले. मोठमोठ्या उद्योगात, ज्या योगे भांडवलदार वर्ग प्रचंड प्रमाणावर फायदे उपटतो, तेथे संघटित कामगाराला तो थोड्याफार आर्थिक सवलती देऊ शकतो. पगार गोठविणे अथवा कमी करणे वगैरे तातडीचे निर्दयी मार्ग त्यास हाताळावे लागत नाहीत. स्वातंत्र्यापूर्वीच्या काळामध्ये, उदा. १९२५, २८, ३७ साली, कामगारांना भांडवलदारांच्या सरकारी यंत्रणेशी समोरासमोर सामना द्यावा लागला. आताच्या कामगारांना तसा अनुभव नाही. भांडवली रचनेवरील अरिष्ट टाळण्यासाठी आता भांडवलेदार वर्ग थोड्याफार

मागण्या मान्य करण्याच्या व सवलती देण्याच्या तयारीत असतो. त्यामुळे ज्या लोकांना गरिबी व पिळवणूक यातील फरक व संबंध लक्षात येत नाही ते म्हणू लागले आहेत की कामगारवर्ग क्रांतिकारक राहिला नाही. (म्हणजे मार्क्सवादाचे दुर्दैव !) त्यातूनही खरी गोष्ट अशी आहे की, एवढ्या सवलती मिळवूनही कामगारांची परिस्थिती पूर्वीपेक्षा सुधारली आहे असे नाही. त्यांचे प्रत्यक्ष उत्पन्न गेल्या १५ वर्षात सहा टक्क्यांनी घटले आहे.

चांगल्या पगारामुळे मध्यमवर्गीय बनलेले कामगार काही फॅक्टऱ्यांमध्ये आहेत ही गोष्ट नाकारता येणार नाही. जेव्हा औद्योगिक क्षेत्रातील काही भाग इतर भागांपेक्षा जास्त प्रगत होतो तेव्हा अशी स्थिती तयार होते. उदा. प्लॅस्टिक उद्योगधंदे किंवा रासायनिक उद्योगधंदे अशा कामगारांमधील क्रांतिकारत्व मारले गेले आहे, परंतु त्यांची संख्या अत्यल्प आहे.

४० वर्षापूर्वीच्या कामगारांपेक्षा आजचा कामगार सुखी नाही, उलट त्याची स्थिती खालावतच चालली आहे. झोपडपट्ट्यांची शहरांमध्ये वाढ होत आहे. बेकारीमुळे भिकाऱ्यांची संख्या वाढत आहे. उपासमार वाढत आहे. श्रीमंत लोकांच्या घरातील पाळीव कुत्र्यांची मात्र केवढी निगा राखली जात आहे. चालू समाजव्यवस्था अत्यंत निर्दयतेने पण तितक्याच सहजपणे अधिकाधिक लोकांना रस्त्यावर उघड पाडत आहे, भीक मागायला लावत आहे, उपाशी मारत आहे.

कामगारवर्गात आज पुष्कळ फूट पडलेली आहे. त्याचप्रमाणे वेगवेगळ्या संघटना व पक्ष यांच्या प्रतिमासुद्धा काळवंडल्या आहेत. कामगार चळवळीच्या बऱ्यावाईट इतिहासाचा हा परिणाम आहे. कामगारांना राजकीय शिक्षण देऊन त्यांच्या नेतृत्वाखाली जर क्रांतिकारक संघटना उभ्या केल्या तरच ह्या कोंडीतून सुटका होणार आहे. ●

---

: २ :

# सर्व श्रमिक संघ

## यशवंत चव्हाण

: कामगार चळवळीमध्ये तुम्ही केव्हा व कसे आलात ?

कोल्हापूरला असताना ३६ ३७ साली विद्यार्थी चळवळीत भाग घेतला. त्या नंतर ३८-३९साली मुंबईला आलो. कम्युनिस्ट पार्टीचा सभासद झालो. तेव्हापासून आजपर्यंत कामगार चळवळीतच आहे.

: त्या वेळी कार्याचे स्वरूप कसे

होते ?

मुंबईत आल्यानंतर गिरणी कामगार युनियनमध्ये काम करण्यास सुरुवात केली. प्रत्यक्ष कामगारांशी जास्त संबंध ठेवण्यावर आमचा विशेष भर होता. त्या काळात राजकीय चळवळीने संपूर्ण वातावरण भारावून गेल्यासारखे झाले होते. आमचे अनेक कार्यकर्ते त्या काळातच तयार झाले आहेत.

१९४२ मध्ये युद्ध विषयक धोरणावर मतभेद होऊन पक्षाने आम्हाला बाहेर काढले. त्यावेळी 'नवजीवन संघटना' स्थापन झाली.

: तुम्ही अलग युनियन काढण्याचा प्रयत्न केला काय ? सर्व श्रमिक संघ केव्हा अस्तित्वात आला ?

'रायव्हल' युनियन काढण्याचा कधीच प्रयत्न केला नाही, तेव्हाही नाही व आताही नाही. पार्टीतून बाहेर पडल्यानंतर गिरणी कामगारातच कार्य करत होतो अगदी ५८–५९ पर्यंत. असलेल्या युनियन्स मजबूत करा असा प्रचार व असंघटित कामगारांची संघटना बांधणे ह्यावर आमचा विशेष जोर होता. ५८–५९ नंतर आम्ही युनियनमध्ये पदाधिकारी नव्हतो.

गिरणी कामगारांव्यतिरिक्त इतर धंद्यातील कामगारांची संघटना बांधण्यास आम्ही सुरुवात केली. इंजिनिअरींग, प्रिंटिंग, केमिकल वगैरे एक दोन मोठे युनिटस् आल्यावर व आर्थिक स्थैर्य आल्यानंतर १९६० साली सर्व श्रमिक संघाची स्थापना झाली. त्या वेळी सभासद संख्या १००० होती, आज १५ हजाराच्या वर सभासद आहेत. बॉम्बे सेन्ट्रल, भांडुप, कुर्ला व ठाणा अशी संघाची चार केन्द्रे आहेत.

: सर्वसाधारण युनिटस्मध्ये (फॅक्टऱ्यांमध्ये) सभासद संख्या एकूण कामगारांच्या किती टक्के असते ?

छोटया युनिटस्मध्ये १०० टक्के असते. मोठयांमध्ये ५०–६० टक्क्यांपर्यंत असते.

: तुम्ही (म्हणजे पार्टी) युनियनच्या कमिटीच्या कारभारात हस्तक्षेप करता काय ? तुमचे पूर्णवेळ कार्यकर्ते कशा प्रकारे कार्य करतात ?

आम्ही कमिटीच्या कारभारात कधीच ढवळाढवळ करत नाही. ट्रेड युनियन ही कामगार वर्गाची संघटना असून तिला एक वर्गीय संघटना या नात्याने स्वतंत्र अस्तित्व असते असे आम्ही मानतो. आमच्या युनियन्समध्ये शिवसेनेपासून सी. पी. एम. पर्यंत सर्व पक्षांच्या विचारसरणीचे कामगार असतात व सर्व निर्णय लोकशाही पद्धतीने घेतले जातात. आमचे पूर्ण वेळ कार्यकर्ते कमिटयांच्या निर्णयांना बांधलेले असतात. कमिटीच्या परवानगीशिवाय मॅनेजमेंटशी बोलणी इत्यादी गोष्टी कधीच करत नाहीत. ही कामगारांची संघटना आहे व कामगारांनीच ती चालवायला हवी असे आम्ही नेहमी सांगत असतो.

: हल्ली बरेच कामगार एका युनियनवाल्याकडून दुसऱ्या युनियनवाल्याकडे जात असतात. तुमच्याकडे अशा प्रकारे किती आल्या ? व किती टिकून

रहातात ? कुठल्या कारणास्तव सोडून जातात ?

आमच्याकडे असलेल्या ९० टक्के युनियन्स दुसऱ्यांकडून आलेल्या आहेत. आतापर्यंत साधारण १० टक्के सोडून गेल्या. जाण्याचे एक कारण युनियनचे बालवय हे असावे; कधी एखाद्या युनिटकडे दुर्लक्ष होते, क्वचित प्रसंगी ऐन जरूरीच्या वेळी लक्ष दिले जात नाही, अशा वेळी कामगार सोडून जातात. कधी कधी आमचे कामगारांशी जमत नाही, बरोबर संधान, दुवा सांधला जात नाही, अशा वेळी कामगार दुसरीकडे जातात.

: आपली कापड कामगार संघटना ही एक वेगळी युनियनच नव्हे काय ?

नाही ! कापड कामगार संघटना ही तशी युनियन नव्हेच. तो आमच्या पार्टीचा एक प्लॅटफॉर्म आहे. गिरणी कामगार युनियन ही गेल्या कित्येक वर्षांपासून मृतावस्थेत आहे. सभासद संख्या शून्य आहे. त्यात प्राण ओतण्याच्या प्रयत्नांनाही यश आलेले नाही. अशा परिस्थितीत अशा प्रकारचा प्लॅटफॉर्म काढणे आवश्यक वाटले. गिरणवार कमिट्या निवडून युनियन बळकट बनवा अशी आमची हाक आहे. रायव्हल युनियन उभारण्याचा हा प्रयत्न नव्हे. तसा आमचा 'सर्व श्रमिक संघ' देखील आयटकशी संलग्नित आहे. आम्ही ॲफिलिएशन फी दोन वर्षे भरलेली नाही. पण आयटकने संघाला निःसंलग्न केलेले नाही.

: कामगारांचे प्रश्न कोणत्या प्रकारे सोडवले जातात ? संप की वाटाघाटी ? कोर्टामध्ये जाण्याचे टाळता काय ? सामुदायिक सौद्याबद्दल आपले काय मत आहे ?

सामुदायिक सौदा हा कामगारांचा हक्क आहे. द्विपक्षीय वाटाघाटी आम्हाला तत्व म्हणून मान्य आहेत. व त्या प्रकारे प्रश्न सोडवण्यावर आमचा भर असतो. परिस्थिती आता पूर्वीपेक्षा बरीच वेगळी आहे. बहुतेक सव ठिकाणी युनियनस् आहेत व एकच असते. एका फॅक्टरीमध्ये दोन युनियनस् असणे अशा प्रकारची फाटाफूट क्वचित आढळते. तेवढी एकीची भावना जवळ जवळ सर्वत्र आहे. तिचे अस्तित्व व ताकद मालकांनीही ओळखलेली आहे. सातत्याने होणाऱ्या भाववाढीमुळे त्रस्त झालेला कामगार लढण्याकरता तयार होतो. दीर्घकालीन संपाच्या ऐवजी निदर्शने, घेराव इत्यादी दबावाचे मार्ग वापरण्याचे प्रमाण वाढत चाललेले दिसते. आमच्या बाबतीत वाटाघाटींनी प्रश्न सुटण्याचे प्रमाण साधारण २५ टक्के आहे. २५ टक्के प्रसंगी कोर्टात निकाल होतो व उरलेल्या अर्ध्या प्रसंगी संपासारख्या लढ्याचा मार्ग हाताळावा लागतो. कशा प्रकारे प्रश्न सोडवावा हे सर्वस्वी परिस्थितीवर व कामगार संघटनेच्या मजबूतीवर अवलंबून असते. काही वेळा लढ्याची तयारी नसेल, संघटना ऐक्य मजबूत नसेल तर कोर्टात जावे लागते.

: मॅनेजमेंट बरोबरच्या वाटाघाटी सर्व कामगारांना खुल्या असाव्यात (ओपन) या बद्दल आपले काय मत

आहे ? वाटाघाटीत कामगार भाग घेतात काय ?

वाटाघाटी सर्वांना ओपन असाव्या हे तत्वत: मान्य आहे. पण क्वचित प्रसंगी डावपेचाच्या दृष्टीने सर्व गोष्टी सर्वांना सांगणे बरोबर नसते. वाटाघाटीच्या वेळी उपस्थित रहाण्याबद्दल कामगार फारसे उत्साही नसतात.

: समझोत्यामध्ये 'संप करणार नाही' अशी अट कधी मान्य करता का ?

सहसा अशा अटी मान्य करत नाही. कधी कधी कामगारांची एकजूट मजबूत नसल्यास व काही फायदा होत नसेल तर अशा अटी मान्य करतो. पण प्रसंग आल्यास संप करण्याचे टाळत नाही. असे संप केलेही आहेत.

: क्लोज्ड शॉपबद्दल आपल्याला काय वाटते ?

युनियनमध्ये शंभर टक्के कामगार सभासद होणे हे केव्हाही चांगलेच. पण युनियनच्या सामर्थ्यातून हे झाले पाहिजे. मालकाशी संगनमत करून नव्हे

: एक धंदा–एक युनियन हे आपल्याला मान्य आहे काय ?

तत्वत: योग्य आहे. गिरणी धंद्याच्या बाबत ते शक्यही आहे. पण सर्वत्र ते लागू करणे शक्य नाही. उदाहरणार्थ 'इंजिनिअरिंग धंदे' अशा एकाच नावानी संबोधल्या जाणाऱ्या धंद्यांमध्ये एकसूत्रीपणा अजिबात नसल्यामुळे त्या ठिकाणी एकच युनियन असणे कठीणच आहे.

: कामगारांना राजकीय शिक्षण देण्याबाबत आपण प्रयत्न करता ? युनियनच्या कामांमधून आपल्याला पूर्ण वेळ कार्यकर्ते मिळाले आहेत काय ?

राजकीय शिक्षण देण्याचा आमचा प्रयत्न चालू असतो. पण एकंदरीत कामगारांच्या राजकीय विचारांची पातळी इतकी खाली आहे की प्रयत्नांना यश मिळणे कठीण असते. फॅक्टरी मिटिंगमध्ये अधून मधून राजकीय विषयांवर चर्चा होत असते. ट्रेड युनियनमध्ये काम करणाऱ्या आमच्या २५ पूर्ण वेळ कार्यकर्त्यांपैकी १२–१३ कामगारवर्गातून आलेले आहेत. पण हे सर्व १९४० ते ५० काळातच आले. त्या काळानंतर एकही पूर्ण वेळ कार्यकर्ता युनियनमधून मिळाला नाही. एकतर कामगारांच्या राजकीय जागृतीची पातळी कमी आहे. आर्थिक कारणांमुळे असलेली नोकरी सोडण्यास कोणी तयार होत नाही. शिवाय फॅक्टरीच्या युनिटमध्ये नोकरी करत असलेला कामगार जास्त चांगल्या प्रकारे काम करू शकतो. परंतु आता परिस्थिती बदलत आहे.

–कामगार कायद्यांच्या स्वरूपाबद्दल आपल्याला काय वाटते ? येत असलेल्या 'काळ्या कायद्या'बद्दल आपण काय केलेत ?

कायद्याचा मुख्य रोख लढाऊ संप, निदर्शने व लढाऊ कामगार संघटना विरुद्ध आहे. या कामगार संघटनांचे दात कसे काढता येतील, त्या दृष्टीने कायदे करण्यात आलेले आहेत.

काळ्या कायद्याविरुद्ध सफळयात

प्रथम आम्हीच आघाडी उघडली; सुरुवातीपासूनच म्हणजे काळ्या कायद्याचे बिल संमत व्हायच्या पूर्वीपासूनच आम्ही त्याला विरोध करत आहोत.

—कायद्याबद्दल कामगारांच्या काय कल्पना आहेत ?

कायद्यांच्या वर्गीय स्वरूपाबद्दल कामगारांना जाणीव नाही. कायदा हा नि:पक्षपाती आहे अशी सर्वसाधारण समजूत आहे. परंतु कोर्टात होणाऱ्या भयंकर दिरंगाईमुळे कोर्टात जाण्यास ते उत्सुक नसतात.

—आता इतर कामगार संघटनाबद्दल आपल्याला काय वाटते ते सांगाल काय ? 'आयटक' बद्दल आपले काय मत आहे ?

चांगली परंपरा असलेली ही संघटना आता निष्प्रभ झाल्यासारखी आहे. त्यातील क्रांतिकारत्व नष्ट झालेले आहे, तिचा जनतेतील पाठिंबाही बराच कमी झालेला आहे.

आणि सी. आय. टी. यू. ? पूर्व परंपरेचा आधार मिळाल्यामुळे ही वाढू शकली. पण ह्या संघटनेतही क्रांतिकारकत्वाची धार नाही व ही संघटना फार संकुचित पंथवादी आहे.

एच. एम. एस. ? ही संघटना मरणाच्या वाटेवर आहे.

एच. एम. पी. ? हीची पण तीच अवस्था आहे.

शिवसेना ?

शिवसेनेला कामगार चळवळीत अजिबात स्थान उरलेले नाही, शिवसेना मालकधार्जिणी आहे हे कामगाराच्या पूर्णपणे लक्षात आलेले आहे.

आणि इंटक ?

ह्या संघटनेत अंतर्गत भांडणे व मतभेद खूप आहेत. कामगारात फूट पाडणे आणि मवाळ व मालकधार्जिण्या कामगार संघटना उभ्या करणे ह्या करता निर्माण केलेली ही संघटना आता सरकारच्या दृष्टीने फारशी कामाची राहिलेली नाही. आज परिस्थिती अशी आहे की ही संघटनादेखील कामगारांमुळे संपासारख्या लढ्यांमध्ये ओढली जाते.

—असो. आज जो कामगारचळवळीचा विचका झालेला दिसतो. त्यांची कारण मीमांसा आपण कशी कराल ?

कामगार चळवळीचा विचका झालेला आहे असे अगदी मला मुळीच वाटत नाही. कामगार चळवळ छान चालली आहे ! व संघटनांमध्ये वरच्या पातळीवर फार भांडाभांडी असली तरी खाली वाहणारे प्रवाह निरोगी व आशादायक आहेत. कामगारांची लढाऊ प्रवृत्ती वाढत आहे व येत्या काळात ही प्रवृत्ती क्रांतिकारक रूप धारण करू शकेल अशी आशा करण्यासारखी आज परिस्थिती आहे. ●

: ३ :

# हिंद मजदूर पंचायत

## बाळ दंडवते

मुंबईतील चाळीस हजार महापालिका कामगारांपैकी सुमारे १८००० चतुर्थ श्रेणीच्या कामगारांच्या 'म्युनिसिपल वर्कर्स युनियन'चे श्री. बाळ दंडवते हे जनरल सेक्रेटरी. गेली अनेक वर्षे त्यांनी या आर्थिक दृष्टचा (व सामाजिक दृष्टचाही) कनिष्ठ वर्गाचे प्रश्न, दुःखे व अडचणी फार जवळून पाहिल्या व अतिशय जिव्हाळ्याने त्यांचे प्रश्न सोडविण्याचे प्रयत्न केले.

त्यांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नावर आम्ही बोलायला सुरुवात केली मात्र आम्हाला पुढे फार प्रश्न विचारण्याची तसदीही न देता त्यांनी आपले विचार आणि अनुभव सांगण्यास सुरुवात केली.

'पारंपारिक (मार्क्सवादी) विचारसरणीनुसार व गेल्या शतकातील पाश्चात्य देशामध्येही कामगार चळवळीमागे एक विशिष्ट अर्थ अभिप्रेत होता. परंतु या देशातील आजची कामगार चळवळ या ऐतिहासिक उद्दिष्टापासून फार दूर गेली आहे.' आधी बाळ दंडवते यांनी विवेचनास सुरुवात करून कामगार चळवळीच्या मूळ आशयासच हात घातला.

'आज कामगार संघटनांद्वारे आणि चळवळीद्वारे कामगारांच्या तात्कालिक गरजा भागवणे आणि थोड्या फार प्रमाणात त्यांना संघटित करणे याहून फार मोठे उद्दिष्ट राहिले आहे असे मला वाटत नाही. यापलिकडे जाऊन 'समाजक्रांतीचे हत्यार' म्हणून आजची कामगार चळवळ कोणतेही भरीव कार्य करू शकेल अशी परिस्थिती आज नाही.'

प्रश्न : ही परिस्थिती उद्भवण्याची तुमच्या मते कारणें कोणती असावीत ?

कारणे अनेक आहेत, एक म्हणजे अतोनात गरिबी आणि बेकारी यामुळे कामगारवर्गाची लढ्याची शक्ती अतिशय कमी आहे. बेकारी आणि निमबेकारी कित्येकदा कामगारलढ्याची धार बोथट करीत असतात.

दुसरी गोष्ट म्हणजे आज आमच्या कामगारामध्ये वर्गीय एकी, ज्याला एकजुट किंवा बंधुभाव म्हणतात, ती एकंदरीत कमी. त्यामुळे संघटित कामगारही मोठ्या प्रमाणावर एकत्र येऊन जोरदार लढा देऊ शकत नाहीत.

याशिवाय आपला देश फार अवाढव्य. त्यात कित्येक भाषा, कित्येक जाती आणि तितकेच पक्ष. त्यामुळे एक ना धड नि भाराभर चिंध्या अशी आपल्या-

कडे परिस्थिती. प्रत्येक पक्षाचा दावा असा की त्यांनी जी समाज व्यवस्था आणायची आहे तीच अंतिम असल्याने प्रत्येक क्षेत्रात त्यांच्या पक्षीय भूमिका धरूनच कार्य केले पाहिजे.

यामुळे कामगार चळवळीमध्ये सर्व संमत अशी धोरणे, कार्यपद्धती आणि लढ्याचा कार्यक्रम कधी होऊच शकला नाही. याचे पर्यवसान आजच्या कामगार चळवळीतील फाटाफुटीत झाले.

किंबहुना दोन जवळच्या डाव्या संघटनांमध्येही कार्यक्रमामध्ये मतैक्य होत नाही. या सर्वांचा परिणाम काय ? गिरणी कामगार युनियनच्या संपाच्या वेळी आमची भूमिका बघ्याची तर बेस्टच्या संपामध्ये डांगे आणि त्यांचे साथी बघे !

मला वाटते या सर्व पार्श्वभूमीवर ही परिस्थिती एक प्रकारे अपरिहार्य आहे. नव्हे काय ?

प्रश्न : सध्याच्या कामगार संघटना आणि नेते यामध्ये कोणते दोष असावेत ?

दोष कामगार संघटना, नेते आणि कामगारांच्या मध्येही आहेत. खऱ्याखुऱ्या अर्थाने जागृत आणि लढाऊ कामगार आणि संघटना यांचा आपल्याकडे अभाव आहे. कामगारांचा जवळ जवळ प्रत्येक लढा हल्ली आर्थिक व इतर मटिरियल मागण्यांसाठी होते.

सहिष्णुता आणि परिस्थितीशी जुळते घेण्याची वृत्ती (समन्वयवाद) हा आपल्या देशाचा परंपरागत गुणधर्म. तो कामगारांमध्ये उतरल्यास नवल नाही. गरिबी आणि बेकारी यामुळे अल्पसंतुष्टता वाढीस लागली. ज्यांच्या जवळ काहीच नाही त्याला थोडे फार मिळाल्यावरही समाधान वाटते.

विशेषत: संघटित क्षेत्रातील कामगार थोड्याफार जास्त मिळकतीवर खूष व संतुष्ट रहातात. त्यांचे राहणीमान इतर कामगारांपेक्षा किंचित वरती असल्याने ते अधिक जागृत असण्याऐवजी बेफिकीर बनले. एकंदरीत, आजचा कामगार थोडा लढा करतो; परंतु थोडासा फायदा मिळाला, वेतनवाढ मिळाली की खूष रहातो.

कामगार वर्गाची लढाई ही एका विशिष्ट तत्वासाठी लढाई आहे, हे आजचा कामगार समजत नाही. झटपट चार पैसे मिळवण्याची वृत्ति आज बळावली आहे. आज मी थोडा त्याग करीन, थोडे कष्ट सहन करून एक प्रखर लढाई करीन, जेणेकरून माझा उद्याचा कामगार सुखी होईल, त्याला अधिक हक्क प्राप्त होतील ही भावना, जी एकोणिसाव्या शतकात पाश्चिमात्य कामगार लढ्यातून प्रतीत होते, अगर क्रांतिपूर्व रशियामध्ये कामगारात निर्माण झाली होती, ती आज भारतात दिसत नाही.

आमचे सरकारही याच वृत्तीचे प्रतीक आहे. मांजर उंदराला कधी एकदम ठार करीत नाही असे म्हणतात. त्याला खेळवून खेळवून ते त्याचा छळ करते. या देशातील भांडवलशाहीची राज्य करण्याची पद्धत थोडीफार अशीच आहे. कामगारवर्गाला एक-

दम खच्चो करायचे नाही, जेणेकरून क्रांतिकारक स्फोट होईल. मामला खूप बिघडू द्यायचा नाही. लढा तीव्र व स्फोटक होण्याचा संभव दिसताच थोडे-फार फायदे, भाकरीचे तुकडे तोंडावर फेकल्यासारखे देऊ करायचे. फायद्याचा मलिदा मात्र स्वतःकडे ठेवायचा. युनियन किंवा तत्सम संघटनांची पद्धत काही याहून फारशी वेगळी नाही, कोणत्याही आर्थिक मागणीसाठी लढा द्यायचा. परंतु तो फारसा प्रखर होऊ द्यायचा नाही. थोड्याफार मागण्या पदरात पडल्या की चळवळ थंड.

एकंदरीत भांडवलशाही, युनियन पक्षनेते, दोघांचेही स्थान पक्के ठेवायचे, फारसे डळमळीत होऊ द्यायचे नाही. सारे काही सुव्यवस्थित, अगदी ठरल्यासारखे. मी मारल्यासारखे करतो, तू रडल्यासारखे कर हा प्रकार !

प्र तुमच्या परवाच्या म्युनिसिपल कामगारांचा संप व त्याची पार्श्वभूमी याबद्दल थोडीफार माहिती द्याल का ?

उ. परवाचा महापालिका कामगारांच्या संपाच्या इतिहासामध्ये मी मघा सांगितलेले, कामगार संघटना, राजकीय पक्ष आणि सरकार यांचे गुणधर्म पुरेसे प्रतिबिंबित झालेले तुम्हाला दिसतील.

मान्य केल्याप्रमाणे म्युनिसिपल कामगारांना बोनस मिळावा हे जरी या संपाचे प्रासंगिक निमित्त होते तरी केवळ महापालिका कामगारांपुरती ही चळवळ मर्यादित नव्हती. एक मोठे व्यापक तत्त्व आणि कक्षा या लढ्यामागे अंतर्भूत होती. एक म्हणजे बोनस या कॉन्ट्रॅक्टमध्ये मूलभूत बदल घडवून आणणे. बोनस हा नफ्याचा वाटा नव्हे. नफा व तोटा यांच्याशी त्याचा संबंध जोडणे चुकीचे आहे. बोनस हा डिफर्ड वेज चा एक पर्याय आहे. हे एक ध्येय आणि दुसरे म्हणजे ही नवी व्याख्या सर्व सरकारी आणि निमसरकारी क्षेत्रातील कामगारांना लागू करणे.

जर आमचा हा संप यशस्वी झाला असता तर या एका व्यापक ध्येयाच्या परिपूर्तीची ती एक नांदी ठरली असती.

परंतु खेदाची गोष्ट अशी की, या लढ्यामागची ही व्यापक भूमिका किंवा पर्सपेक्टीव्ह समजून घेण्याचा प्रयत्न ना जनतेने केला ना इतर संघटनांनी ना पक्षांनी. त्यामुळे आमच्या लढ्याला विशेष प्रमाणावर सक्रिय पाठिंबा मिळाला नाही. कामगारवर्गातील ही फूट, हा संधिसाधूपणा ही मात्र या लढ्याने दृष्टीपथात आली. बाकी साऱ्या पक्षांनी आणि संघटनांनी यात केवळ बघ्याची भूमिका घेतली विशेषतः राज्यसरकार नि केन्द्र सरकारचे कर्मचारी, ज्यांचा फार महत्त्वाचा प्रश्न या लढ्याशी निगडित झालेला आहे, त्यांनी जर या संपाला सक्रीय सहाय्य दिले असते, केवळ शाब्दिक नव्हे, जर हे सर्व कर्मचारी लढाईच्या आखाड्यात उतरले असते आणि मग इतर संघटनांनीही आपली शक्ती पणाला लावली असती तर निश्चितच हा संप यशस्वी झाला असता आणि त्याचे फार दूरगामी परिणाम या सरकारी, निमसरकारी

कामगारास चाखायला मिळाले असते.

प्रश्न : एका उद्योगधंद्यात एकच युनियन असावी या प्रकारच्या मागणीबद्दल तुमचा दृष्टिकोन कोणता आहे ?

उत्तर : कामगारांच्या हिताच्या दृष्टीने हे तत्त्व अत्यावश्यक आहे मालक वर्गाला कामगारांमधे विरोधी युनियन्स उभ्या करून फूट पाडता येणार नाही आणि धंद्यामधील एका गिरणीत-कारखान्यात फायदे, सवलती त्या क्षेत्रातील सर्व कामगारांना सारख्या प्रमाणात लागू होतील आणि एकाच क्षेत्रातील विविध कामगारांमधील विषमता कमी होईल.

प्रश्न : कामगारामधे भेदी अगर फूट पाडणाऱ्या युनियन्स बांधणे याबद्दल तुमची भूमिका कोणती ?

उ : आपली संपूर्ण गॅरंटी असल्याशिवाय कोणत्याही क्षेत्रात, धंद्यात अगर गिरणीत कारखान्यात विरोधी युनियन काढणे आम्हाला नामंजूर आहे आणि हे तत्व आमच्या युनियनमध्ये अत्यंत काटेकोरपणे आम्ही अंमलात आणीत असतो.

हेच तत्व सर्व प्रकारच्या अस्तित्वातील युनियनन्समध्ये आम्ही अंमलात आणू इच्छितो आणि यामधे डाव्या किंवा उजव्या युनियन्स सी. टू. आणि शिवसेना असा मतभेद आम्ही करत नाही. युनियन्समधील वैमनस्य अथवा कामगारातील फूट यांना आम्ही जबाबदार ठरू नये याबाबत आम्ही प्रयत्नशील राहीलो आहोत व असतो.

प्रश्न : आज कामगार संघटनामध्ये अंतर्गत लोकशाही नाही व चार दोन लीडर लोकांचेच साम्राज्य तेथे असते. कामगारांना लोकशाही हक्कांची जाणीव करून देण्यात येत नाही या प्रकारची जी टीका सध्या केली जाते ती कितपत खरी आहे ?

उ. : कामगार युनियनमधे लोकशाही फार प्रमाणात नाही ही गोष्ट खरी आहे आणि थोड्या फार प्रमाणात नोकरशाहीही अस्तित्वात आहे. याची कारणं म्हणजे कामगार आणि कामगार नेत्यातील दोष.

आपला कामगार अजून सुजाण नाही. तो युनियनकडे दुकान म्हणूनच पहातो.

कामगारांमध्ये लोकशाही पद्धतीने काम करण्याचे प्रयत्न फार यशस्वी झाले नाहीत. कामगारांमधेही पुरेसा उत्साह व प्रतिसाद मिळत नाही.

आमचे लिडर लोकही या प्रकारची व्यवस्था आणण्यास फारसे उत्सुक नसतात. आमचे कामगार नेतृत्व संधीसाधू आणि आक्रमक लढाऊ कामगारलढ्याचे नेतृत्व करण्यास असमर्थ आहे.

कामगार संघटनामधील दोष दूर करणे राहोच या उलट संघटनामधील दोष या नेत्यामधे निर्माण झाले आहेत. लढयातील दूरदृष्टी, कामगार ऐक्या बाबतच्या जबाबदारीची जाणीव, एकत्र येऊन व्यापक दृष्टिने पुढील पावले उचलण्याची कुवत या नेत्यांमध्ये आज अभावानेच दिसेल डांगे–फर्नांडीस या सारख्या अध्वंयु नेत्यामधेही या प्रकारची कामगार चळवळ पुढे नेण्याची

क्षमता आणि जिद्द आहे असे दिसत नाही.

प्रश्न : कामगार लढ्यामधील तुमची तयारी आणि तुमचे डावपेच कोणते असतात ?

उ. : कामगारांचा संप किती दिवस केला यापेक्षा किती परिणामकारक केला याला माझ्या दृष्टीने जास्त महत्व आहे आजकाल किती दिवस संप केला या वरून युनियनच्या स्वरूपाचे आणि कार्यपद्धतीचे मूल्यमापन करण्याची एक फॅशन लागून गली आहे.

मी स्वत: संप किती परिणामकारक-रीत्या लढविला जाईल, या दृष्टीने विचार करूनच त्या बाबतचे आडाखे बांधतो. एका संपाचा अगर लढ्याचा पक्षाधिपत्याखालील बाकीच्या युनियन्स-मध्ये पद्धतशीर प्रचार करणे. एका क्षेत्रातील लढा त्याद्वारे जरूर पडल्यास दुसऱ्या क्षेत्रात पसरवणे, इतर संघटना व जनता यांनाही संपाची पार्श्वभूमी समजावून त्यांचा पाठिंबा व सहानुभूती मिळवणे. उदा. महापालिकेचा संप हळू-हळू टॅक्सी. हॉटेल, बेस्ट आणि एस. टी. अशा रितीने पसरून अधिक व्यापक करता येतो.

प्रश्न : संप मागे घेण्याबाबत हीच मुख्य कारणे होती का ?

कोणताही संप, विशेषत: म्युनिसिपल कामगारांचा संप फार काळ चालू ठेवणे चुकीचे असते. यामुळे १०–१५ दिवस संप चालवूनही यशाची अपेक्षा नसल्यास तो मागे घेणे अपरिहार्य आहे.

प्रश्न : म्युनिसिपल मजदूर युनियन विशेषत: चतुर्थ श्रेणी कामगार आज पूर्णपणे संघटित आहेत आणि शिवाय शहराचे संपूर्ण जीवन विस्कळीत करून टाकण्याचे सामर्थ्य त्यांच्यामध्ये आहे. अशा या सामर्थ्यवान कामगारांचा संपही फार काळ का चालू शकणार नाही ?

पब्लिक सिंपथी ही एक गोष्ट तुम्ही विसरत आहात. परवाच्याच संपात कचऱ्याच्या ढिगाबरोबर नाक दाबून धरणारे लोकांचे हात आणि ओठांची चुकचुक तुम्ही पाहिलेली नाही दिसत ? त्यामुळे ही गोष्टही नजरेआड करता करता येत नाही. अर्थात जर हा संप व्यापक प्रमाणात सर्वत्र पसरला असता तर जनतेमध्येही थोडा असंतोष निर्माण झाला असता. परंतु संघटनांमधील ऐक्याच्या अभावाचा परिणाम तुम्ही सर्वसामान्य जनतेपासूनही एकटे पडण्यात होतो.

प्रश्न : आजचे कामगार विषयक कायदे आणि ते राबवणाऱ्या संस्था (लेबर कमिशनर) या संबंधी तुमचे मत काय आहे ? कामगारांच्या दृष्टीने हे किती फायद्याचे ठरले आहेत ?

सध्याचे कायदे संघटित काम-गारांच्या, त्यांच्या संघटनात्मक हक्काच्या दृष्टीनें तरी फारसे हिताचे नाहीत. मी जरी विविध क्षेत्रातील कामगार विषयक कायद्याचा सखोल अभ्यास केला नसला तरी म्युनिसिपल कामगारांच्या संदर्भात मात्र मी असे निश्चितपूर्वकच म्हणेन की त्यांचे कायदे त्यांच्या अहिताचेच आहेत. आज म्युनिसिपल अगर सरकारी

नोकरांचा कोणताही संप नेहमीच बेकायदेशीर ठरविला जातो. विशेषत: म्युनिसिपल कामगार संघटनांच्या मान्यतेसंबंधीचे कायदे हे अतिशय किचकट आणि गुंतागुंतीचे आहेत. येथील कोणत्याही खात्यातील एका विभागामध्ये केवळ १० टक्के सभासदत्व असलेली युनियनसुद्धा मान्यतेसाठी पात्र ठरवली जाते. ही अजब व अतर्किक तरतूद विशेष म्हणजे संयुक्त महाराष्ट्र समिती महापालिकेत अधिकारावर असताना कॉ. धुमे आणि कॉ कुरणे यासारख्यांच्या कारकीर्दीत केली गेली आहे.

प्रश्न : गेल्या वर्षी महाराष्ट्र सरकारने एक कायदा विधान सभेत पास करून घेतला आहे. हा कायदा तयार करण्यापूर्वी सरकारने काही कायदे पंडित, सरकारी पक्षाचे नेते व विरोधी कामगार नेते यांची एक समिती नेमली होती. विशेष म्हणजे कॉ. जॉर्ज फर्नांडीस व कॉ. सुंदरम हेही या समितीचे सभासद होते. आश्चर्य म्हणजे या समितीने सरकारच्या शिफारशीसाठी जो अहवाल सादर केला तो एकमताने संमत केला होता. सरकारने हा अहवाल मान्य करूनच वरील कायदा केला, जो आज कामगारांमध्ये ‘काळा कायदा’ म्हणून समजला जातो. तेव्हा हा काळा कायदा तयार करण्यामागे कॉ. फर्नांडीस यांचा जो वाटा आहे, त्याबद्दल तुमचे काय मत आहे ?

या काळया कायद्यामध्ये जॉर्जचा वाटा आहे ते मात्र तांत्रिक दृष्ट्या फारसे खरे नाही. कारण त्या बैठकीच्या एकही बैठकीस तो हजर राहिला नव्हता वा समितीच्या कामकाजात त्याने भाग घेतला नाही ! (उद्गार चिन्ह आमचे)

अर्थात या समितीच्या सुरुवातीस राजीनामा देणे अगर अहवालावर भिन्न मत प्रदर्शन करणे हे पर्याय त्याला सर्वस्वी खुले होते.

प्रश्न : कामगार क्षेत्रातील ‘इंटक ‘आयटक’ ‘सी. आय. टी. यू.’ इ. वेगवेगळया संघटनांच्या भूमिका आणि स्वरूप यासंबंधी तुमची काय मते आहेत ?

या सर्व संघटनांची धोरणे अर्थातच त्या त्या पक्षांच्या धोरणांशी निगडीत झालेली आहेत

प्रश्न : ते खरे आहे. परंतु आमच्या एकंदरीत कामगार चळवळीतील त्यांच्या प्रत्यक्ष भूमिकेसंबंधी तुमचे काय मत आहे ?

इंटक, आयटक व सी. आय. टी. यू. ह्या काही खऱ्याखुऱ्या स्वतंत्र व तत्वबद्ध, कमिटेड संघटना आहेत असे मी तरी म्हणणार नाही. आयटकने काही वेळा संधिसाधूपणाची भूमिका घेऊन विरोधी पक्षांच्या ऐक्याला खो घालण्याचा प्रयत्न केला आहे, तर काही वेळा ती विरोधी पक्षाच्या बाजूलाही उभी राहिली आहे. बरेचसे पुढारी आज काँग्रेसमध्ये गेले आहेत. त्यांच्याबद्दल आज राज्यकर्त्या वर्गाची मेहेरनजर कोणावर जास्त याबद्दल सवतीचे भांडण चालू आहे. सीटू ही एक लढाऊ संघटना

आहे आणि तिने नेहमीचे कॉंग्रेस विरोधी भूमिका घेतला आहे.

एक संघटना म्हणून यशस्वी रीतीने बांधण्यात आम्ही थोडे फार अपयशी ठरलो आहो असेच म्हणावे लागेल. परंतु या दृष्टीने आमचे जोरात प्रयत्न चालू आहेत. एक लढाऊ, आक्रमक आणि कॉंग्रेस विरोधी संघटना म्हणून आम्ही सी. आय. टी. यू शी स्पर्धा करू इच्छितो.

प्रश्न : एका विशिष्ट तत्वप्रणालीचा निष्ठावंत कार्यकर्ता म्हणून ट्रेड युनियन-कडे पहाण्याचा तुमचा दृष्टीकोन कोणता ?

समाजवादी पक्षाची ध्येयें प्रस्थापित करण्यासाठी कामगार चळवळ हे एक माध्यम आहे असे मी मानतो त्या माध्यमाद्वारे जनतेपर्यंत जाणे आणि लोकांना आमच्या तत्वप्रणालीकडे आकर्षित करणे हे कामगार चळवळी-तील एक कार्यकर्ता म्हणून माझ उद्दिष्ट आहे.

श्री. दंडवते यांनी दिलेले एक उदा-हरण त्यांच्या या उद्दिष्टातील यशाबद्दल पुरेसे बोलके आहे. १०–१२ वर्षांपूर्वी म्युनिसिपल कामगारांमध्ये स्वतःच्या पक्षाची युनियन असूनही त्यामध्ये पक्षाचा राजकीय प्रभाव फारसा नव्हता. या उलट गेल्या वर्षी या युनियनच्या कार्यकारी मंडळाने समाजवादी पक्षास सपूर्ण पाठिंबा देण्याचा ठराव एकमताने पास केला.

प्रश्न : तुम्ही ट्रेड युनियन चळवळी-मध्ये केव्हा आलात ?

१९५६ साली मी म्युनिसिपल मजदूर युनियनचा खजिनदार म्हणून काम करू लागलो. ही संघटना १९५३ मध्ये कॉ. डिमेलो यांना बांधली. १९५७ च्या दीर्घ संपानंतर तिला मान्यता मिळाली. १९६२ मध्य मी युनियनचा जनरल सेक्रेटरी झालो. आज म्युनिसिपल मजदूर युनियन एक सघटित आणि भक्कम संघटना म्हणून उभी आहे.

●

: ४ :

# कम्युनिस्ट पार्टी (मार्क्सिस्ट) सी. आय. टी. यू.

## बजाज के. एल.

सी. आय. टी. यू. प्रणीत इंजिनियरिंग वर्कर्स युनियनचे एक सेक्रेटरी व मार्क्स-वादी कम्युनिस्ट पक्षाचे एक नेते कॉ. बजाज यांनी आपल्या ट्रेड युनियन कार्याची सुरुवात १८ वर्षापूर्वी मुंबईत केली. तत्पूर्वी श्री मोदीनगर तेथील साखर कारखान्यात आल्यानंतर त्यांनी तेथील संपाचे नेतृत्व केले होते. या मुंबईतील वर्षाच्या काळात त्यांनी इंजिनियरिंग, सिल्क, वूलन इत्यादी धंद्यातील वेग-वेगळ्या लहान मोठ्या युनियन्स चाल-वल्या. याच काळात कॉ. कृष्णा देसाई, रसिक, भट, मुंडेकर, यासारख्या नेत्यांशी त्यांचा जवळचा संबंध आला. या पक्षाचे

काही काळ ते सभासदही होते. थोड्याच वर्षांत एक यशस्वी आणि लढाऊ कामगार कार्यकर्ते म्हणून त्यांनी नाव कमावले.

इंजिनियरिंग वर्कर्स युनियनच्या आज जवळजवळ १३० ते १५० युनियन असून अंधेरी शाखेच्या अधिकारातील जवळ जवळ ५० ते ६० युनियन्स म्हणजे कारखाने अथवा मिल्स् अथवा वर्कशॉप्सचे कामकाज कॉ. बजाज हाताळतात.

प्रश्न : तुमचा युनियनच्या फॅक्टरीची सर्वसाधारण कामगारसंख्या किती आहे ?

: आमच्याकडे डायनाफॅक्ट कं, वझिर ग्लास वर्कस या सारख्या ५००–६०० कामगार असणाऱ्या काही फॅक्टरीज तर सरकारी ९० ते १०० कामगार असलेल्या मध्यम व लहान फॅक्टरीज आहेत.

आमच्या अनुभवानुसार त्यांच्या युनियनमध्ये सुमारे ५० टक्के तंटे प्रत्यक्ष वाटाघाटींनी सोडवले जातात. सुमारे २० टक्के तंट्यासाठी कोर्टाची पायरी चढावी लागते. १० ते १५ लढ्यात मात्र प्रत्यक्ष कृति म्हणजे संप वगैरे करावे लागतात.

प्रश्न :—दुसऱ्या युनियनमध्ये विरोधी युनियन काढणे अगर दुसऱ्या युनियन फोडून आपल्याकडे आणण्याचा प्रयत्न करणे या गोष्टी आजकाल ट्रेड युनियनमध्ये बऱ्याच चालतात. त्याबद्दल तुमची भूमिका काय आहे ? तुम्ही अशाप्रकारच्या विरोधी युनियन काढता का ?

: ज्या एखाद्या युनियनला कामगारांच्या बहुमताचा पाठिंबा आहे तिला अधिकृत म्हणून मान्यता मिळावी अशी आमची नेहमीच मागणी आहे, अर्थात हे सगळे गुप्त मतदानाने झाले पाहिजे. जरी आज ही पद्धत अस्तित्वात नसली तरीही आम्ही कोणत्याही कारखान्यामधील बहुमतातील युनियन फोडण्याचा प्रयत्न करीत नाही.

जर एखाद्या कारखान्याचे ६० ते ८० टक्के कामगार आमच्याकडे आले तर आम्ही युनियन बांधतो मग तेथे दुसरी युनियन असली तरीही.

एखाद्या डाव्या युनियनमधील ४० ते ६० टक्के कामगार आमच्याकडे आल्यास आम्ही अस्तित्वात असलेल्या युनियनला विचारात घेतो व त्यांना कल्पना देऊनच नवी युनियन बांधतो.

३० ते ४० टक्के कामगारांची युनियन आम्ही, निदान डाव्या पक्षांच्या युनियनविरोधी तरी केव्हाही बांधत नाही. परंतु तेथली युनियन जर शिवसेना अगर एखाद्या उजव्या राजकीय पक्षाकडे असेल तर ती आपल्या अधिकारात आणण्याचा आम्ही निश्चित प्रयत्न करतो. अर्थात आमच्या राजकीय भूमिकेचा यात सवाल असतो आणि युनियन हे राजकारणाचे माध्यम आहे असे आम्ही मानतो.

मात्र १० ते २० टक्के इतक्या अल्पमताने आम्ही कोणत्याही संघटनेत युनियन बांधत नाही.

प्रश्न :—तत्व म्हणून की असे करणे प्रत्यक्षात अशक्य म्हणून ?

: दोन्ही कारणे. परंतु काही लोक एवढ्या अल्पमताने सुद्धा युनियन फोड-

ण्याचा प्रयत्न करीत असतात.

अर्थात नवी भेदी युनियन बांधणे आणि एखाद्या युनियनमध्ये तुमचा राजकीय ग्रूप बांधणे, तुमचे हितचिंतक तयार करणे या दोन्ही अगदी वेगळ्या गोष्टी आहेत, असे मी मानतो. आणि दुसऱ्या प्रकारचे कार्य हे आमच्या राजकीय आणि वैचारिक भूमिकेचा एक भाग आहे असे मी मानतो.

प्रश्न : अशा प्रकारे आजपर्यंत तुम्ही किती युनियन्स घालवल्या आणि किती मिळवल्या ?

सी. आय. टी. यू. च्या स्थापनेनंतर आम्ही गमावलेल्या युनियन्स जवळ जवळ नाहीतच म्हटले तरी चालेल. परंतु आम्ही कमावलेल्या युनियन कितीतरी आहेत.

प्रश्न : युनियन्स मिळवण्यासाठी तुम्ही लोक स्वत: ठिकठिकाणी जाऊन प्रचार करता अगर दुसऱ्या कोणत्या पद्धतीने कामगारांना आकर्षित करता ?

आमच्याकडे युनियन्स आणण्याचे काम बहुतेक आमचे कामगारच करतात. एका यशस्वी युनियनच्या कामगारांचे मित्र अथवा नातेवाईक दुसऱ्या कारखान्यात, गिरणीत असतात. सी.टी.आय.यू ही एक लढाऊ आक्रमक युनियन म्हणून मानली जाते. कामगारांचे बारीक सारीक प्रश्नही, लक्षपूर्वक आणि निकडीने सोडविले जातात आणि मुख्य म्हणजे प्रत्येक कामगाराला चांगली वागणूक दिली जाते ही गोष्ट बऱ्याच संघटनांमध्ये अभावानेच दिसून येते.

प्रश्न: टी. यू. मधे आज अंतर्गत लोकशाही नाही. दोनचार लिडर लोक स्वत:च निर्णय घेतात. कामगारांना कोणत्याही गोष्टीत विचारात घेतले जात नाही. अगर प्रतिनिधीत्व खऱ्या अर्थाने दिले जात नाही अशा प्रकारची जी टीका ऐकली जाते, ती कितपत खरी आहे ?

सी. आय टी. यू. च्या सर्व युनियन्स लोकशाही पद्धतीने चालाव्यात अशी आमची भूमिका आहे आणि ती जास्तीत जास्त अंमलात आणण्याचा आम्ही प्रयत्न करीत असतो. साधारणत: दर ५० कामगारांमागे एक अशा प्रतिनिधींची जनरल कौन्सिल त्यामधून साध्या मतदानाने मॅनेजिंग कमिटी निवडली जाते.. दोन-तीन वर्षांपूर्वी एवढ्या प्रमाणात आणि पद्धतशीर लोकशाही कार्यपद्धती आमच्याकडेही अस्तित्वात नव्हती. परंतु त्यानंतर मात्र कामगारांना बराच हिस्सा युनियनच्या कामकाजामध्ये दिला जातो. प्रत्येक फॅक्टरीमधेही पाच-दहा कामगारांची फॅक्टरी कमिटी नेमलेली असते. या कमिटीमधील लोकांची नावे अर्थात आम्ही सुचवतो. कारण यासाठी लढाऊ, जास्त समज असलेले व कुशल कार्यकर्ते निवडणे आवश्यक असते. दुसरी नावे कामगारांनी सुचवली तर मात्र त्यांच्याच मतांना मान दिला जातो.

प्रश्न :—लढ्यामधे, विशेषत: संपकाळात, कामगारांना विचारून प्रत्येक निर्णय घेतला जातो का ?

होय. जवळ जवळ प्रत्येक महत्वाचा

निर्णय कामगारांशी विचारविनीमय करूनच घेतला जातो. आणि कामगारांना त्याबाबत पूर्ण स्वातंत्र्य असते.

प्रश्न – वाटाघाटीमधे कामगारांना भाग घेऊ दिला जातो का ?

बऱ्याचवेळा वाटाघाटीमधे कामगारच जास्त लोळतात. पूर्वी मालक व कामगार संस्थामध्ये वाटाघाटीमध्ये नेण्याची पद्धत नव्हती. सी. आय. टी. यू. ने आमच्याकडे ही पद्धत सुरू केली. सुरुवातीला कामगारांना हे कितपत जमेल या प्रकारची भीती आम्हाला वाटली होती व त्यामुळे या प्रकाराबद्दल आम्ही बरेच साशंक होतो. पण आमचा याबद्दलचा प्रत्यक्ष अनुभव खूपच समाधानकारक आहे.

प्रश्न – हे मघा सांगितलेले सगळे म्हणजे लोकशाही व स्वातंत्र्य वगैरे एवढ्या पद्धतशीरपणे चालू आहे ?

अर्थात नाही. ते मी आता सांगणारच होतो. ही नुसती सुरुवात आहे एक विशिष्ट तत्व टी यू चळवळीमध्ये लागू करण्याचा हा प्रयत्न आहे. स्वतःच्या लोकशाही हक्काची जाणीव अजून कामगारात निर्माण झालेली नाही. आज युनियनचे सभासद असलेले सर्व कामगार मतदान करीत नाहीत. मिटींग्ज अटेंड करीत नाहीत. युनियनची फी व्यवस्थित भरणारे कामगारही ७०-७५ टक्केच असतात.

आणि म्हणूनच बरेचसे लढे आज आर्थिक मागण्या, बोनस यासाठी असतात.

प्रश्न : तुमच्या युनियन्समध्ये राजकीय अगर सामाजिक अगर आर्थिक सोडन बाह्य मागण्यांसाठी तुम्ही संप करता का ?

संप फारसे नाही. परंतु लढे मात्र बरेच करतो. लढे म्हणजे मोर्चे काढणे वगैरे. मध्यंतरी महागाई विरोधी चळवळ, व्हिएटनाम लढ्याला पाठिंबा देणारी चळवळ या प्रकारच्या काही लढ्यांमध्ये आमचे कामगार मोठ्या प्रमाणात सहभागी झाले होते. विशेषतः दुसऱ्या कामगारांना त्यांच्या लढ्यामध्ये वा संपामध्ये पाठिंबा देण्यासाठी आमचे कामगार बऱ्याच उत्स्फूर्तपणे भाग घेतात.

प्रश्न : एका उद्योग धंद्यामध्ये एक युनियन या मागणीबाबत तुमची मते काय आहेत ?

एका उद्योगधंद्यामध्ये एक युनियन असावी आणि तिची निवडणूक गुप्त मतदानपद्धतीने घेतली जावी अशी खुली मागणी सी. आय. टी. यू. ने केव्हाच केलेली आहे. एवढेच नव्हे तर प्रत्येक युनिटमध्ये, फॅक्टरी वा कारखान्यामध्ये एक युनियन असावी आणि गुप्त मतदानाने तिची निवड करावी अशी आमची मागणी आहे.

आज वेगवेगळ्या फुटीर युनियन्स, मालकवर्गाची युनियन फोडण्याची पद्धती याला आळा बसेल. कामगारांचे फायदे, वेतनश्रेणी असंघटित व लहानसहान क्षेत्रातल्या कामगारांना लागू केले जातील.

प्रश्न : प्रत्येक युनियनमध्ये तुम्हाला वर्चस्व मिळावे म्हणून अशा वेळी तुम्ही काय प्रयत्न करणार ? कारण लोक-

शाही म्हणून अधिकारात असलेल्या युनियनशी तुम्हाला सहकार्य करावेच लागेल अगर त्यांचे आदेश पाळावेच लागतील.

आम्ही अधिकारातील युनियनच्या प्रत्येक कामगार विरोधी धोरणाविरुद्ध आवाज उठवू, कामगारांमध्ये प्रचार करू अधिक लढाऊ व कामगार हिताच्या मागण्या जोरदारपणे मांडू व अधिकाधिक कामगारांमध्ये आमचा प्रभाव पाडू.

जेव्हा तुम्हाला बहुतांशी कामगार तुमच्यामागे आहेत असा विश्वास असेल त्यावेळी एकाद्या मागणीसाठी तुम्ही आवाज उठवू शकता आणि बहुतेक कामगारांच्या पाठिंब्याची खात्री पटल्यावर तुम्ही संपाचा आदेश देऊ शकता. संपाला किती प्रतिसाद मिळतो यावर तुमची ताकद आणि स्थान उघडपणे जनतेला दिसू शकेल. अर्थात हे सारे पद्धतशीरपणे, हळूहळू प्रचाराच्या द्वारे कामगारांना अधिकाधिक जागृत करून आणि काही मान्य संकेतांचे पालन करूनच करावे लागेल

प्रश्न : आजचे कामगार–कायदे आणि प्रस्थापित कायद्याची चौकट याबद्दल तुमचे मत काय ?

कामगारांच्या संघटित चळवळीचा परिणाम म्हणून काही थोडेफार फायदे आणि कायदेशीर हक्क कामगारांना मिळाले ही गोष्ट खरी असली तरी आपल्या कायद्याच्या चौकटीचा मूलभूत पाया आणि मूलभूत स्वरूप हे कामगार विरोधी आहे आणि कामगारांच्या हक्कावर आणि संघटना स्वातंत्र्यावर प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे गदा आणणारे आहे. अनेक कामगारांच्या फायद्यांच्या कायद्यांचेही स्वरूप इतके किचकट आणि त्यांच्या अंमलबजावणीची कार्यपद्धती इतकी गुंतागुंतीची आहे की त्यांचा फायदा कमीतकमी मिळावा या अपेक्षेने ते केले आहेत असे स्पष्ट दिसून येते परंतु आपली ट्रेड युनियन चळवळ एवढ्या प्रमाणात परिपक्व झालेली नाही आणि आपल्या संघटनाही एवढ्या मजबूत आणि बलवान नाहीत. त्यामुळे कायद्याचा आधार घेणे आज तरी अपरिहार्य आहे.

प्रश्न : संपकाळात जेव्हा संप दीर्घ काळ लांबतो अशावेळी त्या कंपनीच्या कामगारांच्या मदतीसाठी तुमच्या युनियनकडे फंड वगैरे आहे काय ?

आर. जे. मेहतासारख्या लोकांकडे हजारो रुपयांचा फंड असतो कारण वेळोवेळी कामगारांकडन सक्तीने या ना त्या प्रकाराने ही युनियन पैसे घेत असते. आमचे टी. यू. चे उद्दिष्ट वेगळे असल्या कारणाने आम्हाला हे प्रकार करता येत नाहीत.

प्रश्न : कामगारांना राजकीय शिक्षण देऊन त्यांना राजकीय दृष्टया जागृत करण्यामध्ये तुमची युनियन कितपत यशस्वी झाली आहे.

आज आपला कामगार राजकीय दृष्टया फारसा जागृत नाही हे आपल्या देशातील संपूर्ण ट्रेड युनियन चळवळीचे अपयश आहे आणि त्या दृष्टीने आजही फार प्रगती होऊ शकली नाही.

आमच्या पुरते बोलायचे झाले तर

आमच्याकडून थोडे फार प्रयत्न चालू आहेत परंतु यामध्ये बऱ्याच अडचणी आहेत. युनियनच्या बहुविध कार्यामध्ये दिवसाचा सगळा वेळ अतिशय अपुरा पडतो. तरीही वेळोवेळी मॅनेजिंग कमिटीच्या सभेत वगैरे महागाई, तिची कारणे, भांडवलशाही इ. प्रश्नावर आम्ही चर्चा करीत असतो व कामगारांमध्ये जागृती निर्माण करण्याचे प्रयत्न करीत असतो. परंतु हे सर्व पद्धतशीरपणे करण्यासाठी आमच्याकडे कार्यकर्त्यांचा अभाव आहे.

प्रश्न : तुमच्या पक्षाचा ट्रेड युनियन्सवर किती कंट्रोल असतो ?

सर्व ट्रेड युनियन्स ठोकळ मानाने स्वतंत्र असतात व पक्षाचे त्यांच्या दैनंदिन अगर इतरही कार्यात नियंत्रण नसते. परंतु वेळोवेळी पक्ष युनियनच्या राजकीय भूमिकेविषयी आणि चळवळीच्या पॉलिसीविषयी सल्ला देत असतो.

प्रश्न : राजकीय शिक्षणाचे अभ्यास वर्ग वगैरे तुमच्या युनियन तर्फे चालवले जातात का ?

अंधेरी येथे आम्ही १०।१५ कामगार व इतर तरुणांचा एक अभ्यासवर्ग चालवतो व राजकीय शिक्षणाचा प्रसार करतो, यात मार्क्सवाद, अर्थशास्त्र इ. विषयावरही चर्चा केली जाते. दुसरा एक १००।१५० कामगारांचा अभ्यास वर्ग भरतो. त्यात विशेषत: युनियनच्या कार्यपद्धतीचे शिक्षण दिले जाते.

प्रश्न : तुम्ही ट्रेड युनियन चळवळीमध्ये का आहात आणि तुमचे या क्षेत्रामधील उद्दिष्ट काय ?

मी मार्क्सवादी पक्षात आहे आणि ट्रेड युनियन चळवळ हे एक प्रमुख पक्षकार्य आहे असे मी मानतो. म्हणून मी ट्रेड युनियन चळवळीत आहे. ट्रेड युनियनमधून राजकारण बाजूला ठेवावे ही केवळ बकवास आहे. जेव्हा राजकारण ट्रेड युनियन चळवळीत असणार नाही त्यावेळी मी चळवळीत आणि पक्षातही राहणार नाही.

माझ्या कामगारांना सध्याच्या शोषक समाज रचनेविरुद्ध संघर्ष करण्याकरता वेळ पडल्यास शस्त्र हातात घेऊन जेव्हा मी जागृत करू शकेन तेव्हा माझ्या उद्दिष्टात मी थोडाफार यशस्वी झालो असे मी समजेन, अशी माझी धारणा आहे. ●

: ५ :

## भारतीय कम्युनिस्ट पक्ष । ए. आय. टी. यू. सी.

### बाळकृष्ण शांताराम धुमे

प्रश्न : तुम्ही कामगार चळवळीत केव्हा व कसे आलात ?

मी चळवळीत १९४० पासून आहे. कम्युनिस्ट पक्षाचा सभासद म्हणूनच आलो. त्यापूर्वी इंजिनियर होतो व कॉंग्रेस पक्षात काम करीत होतो. मी

सुरुवातीला काच कारखान्यात संघटना काढल्या. तसेच विमान वाहतूक धंद्यातील युनियन्सचा मीच पाया घातला.

प्रश्न : ह्या सेन्टरच्या युनियन्समध्ये एकूण किती कारखाने व कामगार आहेत ?

साधारण ९० कारखाने (छोटे व मोठे) सुमारे २५ हजार कामगार.

प्रश्न : पण ह्या युनियन्सच्या महत्त्वाच्या पदावर कामगार असतात काय ? आणि किती असतात ?

सेन्टरमधल्या ५ ही युनियन्सचे उपाध्यक्ष कामगारच आहेत व एका युनियनचा अध्यक्ष एक कामगारच आहे.

प्रश्न : पण जनरल सेक्रेटरी मात्र कामगार नाहीत ?

नाहीत.

प्रश्न : बरं, युनियन्सच्या निवडणुका वगैरे दरवर्षी होतात काय ? व त्यात प्रत्येक फॅक्टरीला मॅनेजिंग कमिटीवर किती सदस्य पाठविता येतात ?

हो अगदो नियमितपणे होतात. फॅक्टरीच्या कामगारांच्या संख्येप्रमाणे दर तीस, चाळीस, पन्नास, साठ कामगारांमागे एक ह्या प्रमाणे जनरल कौन्सिलवर सदस्य निवडले जातात. या निवडणुका प्रत्येक फॅक्टरीत होतात. तसेच प्रत्येक फॅक्टरीची एक स्थानिक फॅक्टरी कमिटी बनते. जनरल कौन्सोलची बैठक होऊन मॅनेजिंग कमिटी निवडली जाते. एकेका फॅक्टरीच्या निवडणुका त्या फॅक्टरीतील गतवर्षीची कमिटीच घेते.

प्रश्न : तुमच्याकडे निवडणुका जास्त लोकशाही पद्धतीने होतात काय ?

हो तर. आमचा लोकशाहीवर विश्वास आहे. पण त्यापेक्षाही महत्त्वाचे कारण म्हणजे आम्ही कोर्टात फारसे जात नाही. त्यामुळे युनियन सुरळीत चालविण्यासाठी कामगारांच्या पाठिंब्याशिवाय जमतच नाही. शेवटी मालकांशी बोलणी करताना किंवा त्यांच्याशी संघर्ष करताना युनियनची एकजूट व ताकद हे आवश्यक असतात. हे बांधण्यासाठी आम्हाला लोकशाही पद्धतीने जावेच लागते. दिवसभर कोर्टात असणाऱ्यांना व २–४ महिन्यांतून एकदा कामगारांकडे जाणाऱ्यांना हे नाही केले तरी चालते. पण आमचे तसे नाही.

प्रश्न : म्हणजे तुम्ही 'सामुदायिक सौदा' ह्या तत्त्वावर भर देता.

होय, आम्ही जास्तीत जास्त प्रश्न वाटाघाटीने व संघर्षाच्या मार्गाने सोडवितो. तिऱ्हाईताकडे, कोर्टात जात नाही.

प्रश्न : पण ९० फॅक्टऱ्या व २५ हजार कामगारांशी तुम्ही पाच लोक संबंध कसे ठेवू शकणार ?

आमच्या प्रत्येक फॅक्टरीत आठवड्याला एकदा तरी कोणीतरी जातो, गेटवर सभा होते. ते आम्हाला करावेच लागते. त्यात आमचा बहुतेक वेळ गेला तरीही पण आम्ही जमेल तेवढे करतो.

प्रश्न : मॅनेजमेंटशी बोलणी करताना तुम्ही कामगारांना बरोबर घेऊन जाता काय ?

प्रतिनिधींना घेऊन जातो.

प्रश्न : 'खुली बोलणी हवीत, गुप्त वाटाघाटी नकोत' हे तत्त्व तुम्ही मानता काय ? वाटाघाटींना येणारे

कामगार प्रतिनिधी बोलतात काय? आणि वाटाघाटी इंग्रजीत होतात काय?

'खुल्या वाटाघाटी' हे तत्व म्हणून आम्ही मानत नाही व तसे करण्याची काही गरज नाही. कामगार प्रतिनिधी म्हणजे फॅक्टरी कमिटीचे सभासद, इतर कामगारांना साधारणपणे सगळी माहिती देतातच आणि शिवाय जनरल बॉडीला विचारल्याशिवाय आम्ही कुठल्याही करार, सेटलमेंटवर सही करीत नाही. मॅनेजमेंटशी वाटाघाटी नेहमीच हिंदीतून होतात, त्यामुळे कामगार त्यात भाग घेऊ शकतात आणि सर्वसाधारणपणे कामगार भाग घेतात. पगारवाढ, महागाईभत्ता ह्या बद्दल आम्ही म्हणजे बाहेरचे लोक बोलतो पण रजा, प्रवचारी आणि फॅक्टरीच्या एकूण व्यवस्थेबद्दल कामगारच जास्त बोलतात.

प्रश्न : हे झाले तुमच्या युनियनच्या लोकशाहीबद्दल. आता नवीन युनियन काढण्याबद्दल. तुम्ही एका फॅक्टरीत जेथे युनियन अगोदरच आहे, तेथे नवीन फुटीर किंवा विरोधी अशी दुसरी युनियन सुरू करता काय?

विरोधी किंवा फुटीर युनियनचा प्रश्न राजकीय स्वरूपाचा आहे. एखाद्या युनियनबद्दल असंतोष असल्यामुळे जर कामगार आमच्याकडे येऊन युनियन काढा असे म्हणाले तर आम्ही युनियन काढतो, किंवा साधारणपणे त्यांना आमच्या युनियनमध्ये घेतो. डाव्या पक्षांच्या युनियनमध्ये असलेले कामगार आमच्याकडे आले तर आम्ही थोडा विचार करून हे पाऊल उचलतो.

प्र. : १९६९ पर्यंत सी. आय. टी. यू. तयार होण्याच्या पूर्वी डावे कम्युनिस्ट तुमच्याबरोबरीने ह्याच सेंटरमध्ये काम करीत होते. सीटू निघाल्यानंतर तुमच्यातले संबंध कसे झाले?

ऑक्टोबर १९६९ पर्यंत आम्ही डाव्यांबरोबर सुरळीतपणे काम करीत होतो. नंतर फुटीच्या वेळेला, ज्या फॅक्टरीला सी. आय. टी. यू. बरोबर जायची इच्छा होती तिला जाऊ देण्यात आले व आम्ही तिथे फूट पाडून ती युनियन काबीज करण्याचा कधीही प्रयत्न केला नाही. मार्क्सिस्टांनी मात्र काही ठिकाणी ते करण्याचा प्रयत्न केला. आमच्या युनियनमध्ये फूट पाडता पाडता शेवटी त्या युनियन्स शिवसेनेच्या हातात गेल्या. उदा. पवईची लार्सन अँड टूब्रो पण डाव्यांनी सुद्धा हे फार वेळा केले नाही.

प्रश्न : आपण हेच आता वेगळ्या संदर्भात पाहू या. समजा एखाद्या कामगाराने चोरी केली व मॅनेजमेंटने त्याला चार्जशीट (आरोपपत्र) दिले आणि त्याने चोरी केली हे खरे आहे असे युनियनला माहिती आहे. अशा वेळी तुम्ही काय कराल?

मॅनेजमेंटसमोर त्याची बाजू युनियन उचलून धरणार नाही. त्याने चोरी केली हे सिद्ध करणे मॅनेजमेंटची जबाबदारी असते. कामगारांच्या संरक्षणासाठी त्याला जो खराखुरा साक्षी पुरावा हवा असेल तो आम्ही देऊ त्याला काढू नका, काढले तर आम्ही सर्व कामगार कारवाई करू असे आम्ही म्हणणार नाही.

प्रश्न : एका उद्योगधंद्यात एकच युनियन हे तत्व म्हणून तुम्ही मानता काय ? की एक डावपेच म्हणून ?

हो तत्व म्हणून मानतो. पण सध्या तरी हे वास्तव स्वरूपात शक्य नाही. फक्त एक स्वप्न आहे.

प्रश्न : पण त्या दृष्टीने तुम्ही काय प्रयत्न केले आहेत ? तुम्ही म्हणजे ए. आय. टी. यू. सी. ने सुद्धा ?

आम्ही नेहमीच सर्व टी. यू संघटनांना एक व्हा असे म्हणत आलेलो आहोत. राष्ट्रीय पातळीवर इंटक व हिंद मजदूर सभेशी जूट केली आहे. त्याचप्रमाणे वेगवेगळ्या उद्योगधंद्यात पगारवाढ वगैरेचे प्रश्न सोडविणाऱ्या सरकारने नेमलेल्या वेतनमंडळामध्ये आम्ही इतरांबरोबर भाग घेतो व त्या धंद्यातील कामगारांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या सर्व संघटनांची अशा प्रकारे एकी घडवून आणण्यासाठी प्रयत्न करतो.

प्रश्न : आता पुढे जाऊ. भारतात कामगारांमध्ये अनेक युनियन्स आहेत. अनेक कारखाने असे आहेत की त्यात एक पेक्षा जास्त युनियन्स आहेत. ह्यात अनेक पक्ष आहेत. थोडक्यात कामगारात फार मोठी फूट आहे. इंग्लंडसारख्या देशातसुद्धा अनेक वेगवेगळ्या राजकीय पक्षांचे लोक युनियनमध्ये काम करतात. पण तिथे अशा प्रकारची फूट नाही. आपल्याकडच्या ह्या फुटीचे कारण काय ?

आपल्याकडे कामगार चळवळीच्या बाल्यावस्थेतच भांडवलदारांनी फट पाडायला सुरवात केली. जनतेमधील राष्ट्रवादाचा व साम्राज्यविरोधी भावनांचा फायदा घेऊन कामगारांचे नेतृत्व आपल्या हातात घेण्याच्या हेतूने १९४७ मध्ये त्यांनी इंटक काढली. १९४७ नंतर कामगारवर्ग संख्येने बराच वाढला. ह्या नवीन कामगार खेड्यातून आला असल्याने त्यात मध्यमवर्गीय प्रवृत्ती होत्या. भांडवलदारांचे दुहेरी धोरण होते. एक म्हणजे लाल बावटा युनियन्सचे दमन व दुसरे म्हणजे कामगारांना कायद्याद्वारे थोडीफार सवलती देऊन सुधारणावाद्यांना कामगार चळवळ कोर्टकचेऱ्यात जास्त जास्त डांबवून ठेवण्यात मदत करणे. पार्टीच्या चुकीच्या धोरणांमुळे आम्ही सगळे १९४८–५० मध्ये तुरुंगात डांबले गेलो व ह्या काळात इंटक वगैरेंनी आपला जम बराच बसविला. त्यामुळे नवे कामगार ह्या कटाव बळी पडले व त्यांच्यात फूट पडली.

प्रश्न : आता आपण कामगार व युनियन विषयक कायद्यांकडे वळू या. त्याबद्दल तुमचे काय मत आहे.

थोडक्यात कायदा कामगार विरोधी आहे. जरी संघटित कामगारांना पैशाच्या दृष्टीने कायदा थोडाफार फायद्याचा असला तरी मूलतः तो कामगार विरोधी आहे. म्हणजे ज्या असंघटित कामगारांकडून भांडवलशाहीला सर्वात जास्त धोका आहे, त्यांना भांडवलदारांकरवी संघटित करण्यासाठी व मालकधार्जिण्या युनियन्सना मान्यता देण्यासाठी मुख्यतः कायदा काम करतो. कायद्याकरवी सरकारला अवाजवी अधिकार मिळतात

व कामगार चळवळीत कधीही हस्तक्षेप करता येतो व चळवळ तोडता येते. सरकारने वरून आपल्याला हव्या त्या युनियनला मान्यता देण्याच्या कल्पनेच्या आम्ही विरुद्ध आहोत.

प्रश्न : 'काळा कायदा' हा सरकारने नेमलेल्या कमिटीच्या अहवालावरून तयार करण्यात आला होता. ह्या कमिटीत ए. आय. टी. यू. सी.चे श्री. सुंदरम हे होते व त्यांनी ह्या रिपोर्टवर बिनविरोध सही केली. ह्या कायद्यामुळे इथल्या कामगार चळवळीची कत्तल होईल हे उघड असतानाही श्री. सुंदरम ह्यांनी असे का केले ?

सुंदरमवर त्याबद्दल ए. आय. यू. सी. च्या बैठकीत टीका करण्यात आली. ए आय टी यू सी ने नंतर सरकारला ह्या रिपोर्ट आम्हाला मान्य नाही हे कळविले. सुंदरमच्या वागणुकीबद्दल मीच प्रथम टीका केली.

एकंदरीत ही सगळी आमच्या बाजूने गंभीर स्वरूपाची चूक होती.

प्रश्न : अशा चुकांमुळेच ए. आय. टी. यू. सी. चा जोर आता कमी झाला आहे काय ?

नाही. ए. आय. टी. यू. सी. ही एक वाढती संघटना आहे. आमची ह्या वर्षीची कलकत्ता परिषद ही एक फार मोठी यशस्वी परिषद होती.

सी.आय.टी.यू.च्या बरोबर आमची पण वाढ झाली आहे. शिवसेना वगैरेंमुळे आमची वाढ मंदावली असली तरी आता शिवसेनेकडे गेलेल्या युनियन्स परत मिळायला सुरुवात झाली आहे. आमच्या सेन्टरमध्ये सी. आय.टी.यू. च्या जन्माच्या वेळी ५० फॅक्टऱ्यांचे कामगार होते. आता ९० फॅक्टऱ्यांचे आहेत. सी आय टी यू तशी फार मोठी नाही. आवाज मात्र जास्त आहे.

प्रश्न : अनेक कामगार एक युनियनमधून दुसऱ्या युनियनमधे जात असतात. ह्याचे कारण काय ?

मुख्य कारण म्हणजे कामगारांना वर्गजाणीव अजून आलेली नाही. म्हणून ते पैशाचाच विचार करतात. काही पैशाचे लालची बनतात. काही मोठ्या कंपन्यांमध्ये कामगारांना बऱ्यापैकी पगार मिळतो. त्यांना ह्या सवयी लवकर लागतात

प्रश्न : ह्या कामगारांना तुम्ही सुखवस्तू म्हणाल काय ? व त्यांचा इतरांवर परिणाम काय असतो ?

हो. आपण ह्यांना असे म्हणणे थोडेफार खरे आहे. मघाशी म्हटल्याप्रमाणे पैशाची चटक इतरांनापण लावणे हा परिणाम ह्या सुखवस्तू थर घडवून आणतो.

प्रश्न : पेट्रोलियम धंद्यातील कामगारांचे उत्पन्न गिरणीकामगारांच्या म्हणज सर्व साधारण कामगारांच्या उत्पन्नापेक्षा दुपटीने जास्त आहे. हे गेली २५ वर्षे आहे. तेव्हा अशा युनियनचे तुम्ही अध्यक्ष का ?

तुमचा प्रश्न योग्य आहे. पण ह्या अनेक छटांच्या अनेक प्रश्नांना उत्तरे शोधण्याचा तुमच्यासारखाच आम्हीपण प्रयत्न करीत आहोत. आपल्या उद्योगधंद्यातील सर्व कामगारांशी संबंध जो

आज कामगार लावू शकत नाही तो संबंध त्याला जाणीवपूर्वक जोडण्याचा आमचा प्रयत्न आहे.

प्रश्न : कामगारांची राजकीय जाणीव जागृत व विकसीत व्हावी ह्या दृष्टीने तुम्ही काय करता ?

—अभ्यासवर्ग फक्त महिंद्र अॅण्ड महिंद्र ह्यातील काही कामगारांचेच होतात. मधून मधून आम्ही सामाजिक प्रश्नांवर सभा, बैठकी घेतो. विशेषत: ह्या सेंटरवर. पण नियमित अभ्यासवर्ग मात्र नाही होत. फक्त एकाच कारखान्यात होतात.

चर्चा मंडळे वगैरे चालविणे आम्हाला आज तरी शक्य नाही. युनियन्सचे हजारो प्रश्न असतात. ते सोडवताना आम्हाला राजकीय शिक्षणाकडे लक्ष देता येत नाही. आणखी कार्यकर्ते हवेत.

प्रश्न : अनेक डाव्या युनियनिस्टांकडे डझनवारी युनियन्स असतात. त्यांना कामगार जागृतीच्या दृष्टीने एवढ्या युनियन्स झेपत नसूनही ते जास्त जास्त युनियन्स मिळविण्याचा प्रयत्न करतात. त्यांचा मुख्य हेतू पैसा मिळविण्याचा असतो काय ?

—पैसा व चळवळ ह्यामधील रेघ काढणे कठीण असते. शेवटी आम्हाला इतरांशी स्पर्धा करणे भाग असते. पैसा कमविण्याच्या दृष्टीने नाही; पण आम्हाला सदैव इतरांशी शर्यत करावी लागते. ट्रेड युनियन्सचे जगही जीवनाप्रमाणेच स्थिर नसते. सदैव बदलत असते.

प्रश्न : तुम्ही आता ३० वर्षांपेक्षा जास्त काम करता आहात. ह्या काळात तुम्हाला कामगारांमधून किती पूर्णवेळ कार्यकर्ते युनियनच्या कामात आणता आले ?

—एकही नाही. फॅक्टरी लेव्हलवर मात्र कामगारच काम बघतात.

प्रश्न : का ?

—युनियन्सचे व कायदेबाजीचे काम हे सगळे इंग्रजीतून चालत असल्याकारणाने कामगारांना युनियन चालविणे कठीण असते आणि कामगारांमधूनच कार्यकर्ते तयार करण्याचा प्रश्न सगळ्या डाव्यांना भंडावतो आहे. हा एक मोठा पेच आहे.

प्रश्न : इतर ट्रेड युनियन्सबद्दल तुमचे काय मत आहे ?

आर.जे. मेहता हा 'अमेरिकन' टाइप युनियनिस्ट आहे. अनेकदा बोनसचा पैसा वगैरे मॅनेजमेन्टकडून कामगारांना न द्यायला लावतो युनियनकडे देतो व आपले कमिशन ५–१०–१५ टक्के काढून मग कामगारांना त्यांच्या ऑफिसमधून घेऊन जाण्यास सांगतो.

शिवसेना तर संपफोडी व मालकधार्जिणी संघटना आहे.

आता भांडवलशाहीच्या चौकटीत प्रश्न सुटत नसतात हे लोकांना कळते. आहे. आंध्रप्रमाणेच इथेही भांडवलदारांचे प्रांतीयवादी डावपेच फोल ठरत आहेत. पण मॅनेजमेंट व काँग्रेसच्या पाठिंब्याने शिवसेना वर आली. नाहीतरी कामगारांना जास्त पैसे द्यावे लागणारच. तेव्हा त्याऐवजी काही

मलपृष्ठ २ वर

मुलाखती : मलपृष्ठ १ वरून

व्यक्तींना कमिशन म्हणून द्या असा विचार करत मॅनेजमेन्टने शिवसेना युनियन्सना प्रोत्साहन दिले. शिवसेनेचे युनियनवाले पैसा घेऊन (व कामगारांना त्यातला काही देऊन) चूप बसतात. डाव्यांचे तसे नसते. त्यांच्या कामगारांना जास्त पैशाशिवाय आणखी काही हवे असते. पण आता शिवसेना टिकून राहूच शकणार नाही.

प्रश्न : इंटक व एच. एम. एस्. यांचे काय ? हे कामगारांच्या हिताच्या बाजूचे लोक आहेत काय ?

तो राजकीय प्रश्न आहे. त्यावर वेगळी चर्चा करावी लागेल.

प्रश्न : सध्याचे बहुतेक कामगार पुढारी भ्रष्ट, लोकशाही न मानणारे व स्वतःला कामगारांचे बॉस समजणारे असतात ह्याचे कारण काय ?

हा सगळा अर्थवादाचा परिणाम आहे.

प्रश्न : बेकार, असंघटित व टेंपररी कामगारांच्या प्रश्नांबद्दल तुम्हाला काय म्हणायचे आहे ?

त्यांच्याबद्दलचा झगडा संघटित कामगारांनीच केला पाहिजे व सरकारला त्यांना बेकारभत्ता वगैरे द्यायला भाग पाडले पाहिजे.

प्रश्न : तीस-चाळीस वर्षांपूर्वीच्या मानाने सध्याची कामगार चळवळीची स्थिती कशी काय आहे ?

'काळा कायदा' वगैरेमुळे कामगारात खरी राजकीय जाणीव पसरवण्याच्या दृष्टीने आजची परिस्थिती जास्त अनुकूल आहे. फक्त कामगारात क्रांतिकारक राजकारण नेले पाहिजे. सध्या फक्त कामगारांमध्ये समाजवादी वर्गजाणीवेचीच उणीव आहे. २०–३० वर्षांपूर्वी राष्ट्रीय पुढारीपणाकडून ज्या अपेक्षा कामगारांना होत्या त्या आता उरल्या नाहीत, भंग झाल्या आहेत. परिस्थिती खरोखरच अनुकूल आहे. पण तरुण कार्यकर्त्यांची गरज आहे.

प्रश्न : हल्ली फारसे तरुण कामगार चळवळीत येत नाहीत ह्याचे कारण काय ?

पूर्वीच्या साम्राज्यशाही विरोधी चळवळीतून अनेक तरुण आले. आज तशी कुठलीच मोठी चळवळ नाही. त्यामुळे येत नाहीत. यावे ही आमची इच्छा आहे.

प्रश्न : तुमच्या ३० वर्षांपेक्षा जास्त कामाबद्दल तुम्हाला समाधान आहे काय ?

नाही. राजकीय दृष्ट्या मुळीच नाही. मी इंजिनियरची नोकरी सोडून फक्त बोनस व पगारवाढीबद्दल बोलायला चळवळीत आलो नाही. आज फक्त तेच करावं लागतं ह्याचं मला मुळीच समाधान नाही. ● ● ●

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर